बुधवार, १ फेब्रुवारी २०२३
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१६०
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • WEDNESDAY 1 FEBRUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-160 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

## पीएम केअर्स फंडवर सरकारची मालकी नाही

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** पीएम केअर्स फंड ही सार्वजनिक विश्वस्त संस्था असून या संस्थेची स्थापना संविधान तसेच संसदेने निर्माण केलेल्या कायद्यांतर्गत केलेली नाही, असे केंद्र सरकारने दिल्ली उच्च न्यायालयाला सांगितले आहे. वरीष्ठ वकील श्याम दिवान यांनी पीएम केअर फंडच्या कारभारात पारदर्शकतेची मागणी करत एक याचिका दाखल केली होती. याच याचिकेबाबत आज सुनावणी घेण्यात आली. यावेळी केंद्र सरकारने एक प्रतिज्ञापत्र सादर केले. या प्रतिज्ञापत्रात वरील माहिती देण्यात आली. या प्रतिज्ञापत्रात पीएम केअर्स फंड सार्वजनिक वित्त संस्थेच्या रुपात स्थापन करण्यात आलेले आहे. पीएम केअर्स फंडची निर्मिती संविधान, लोकसभा तसेच कोणत्याही राज्याच्या विधानसभेअंतर्गत करण्यात आलेली नाही. या ट्रस्टवर कोणत्याही सरकारची मालकी नाही किंवा कोणत्याही सरकारकडून याला निधी पुरवला जात नाही. ट्रस्टच्या कामकाजावर प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्षपणे केंद्र सरकार तसेच कोणत्याही राज्य सरकारचे नियंत्रण नाही, असे या प्रतिज्ञापत्रात सांगण्यात आले आहे. पीएम केअर फंडला शासकीय फंड असल्याचे दाखवण्यात आले आहे, असा दावा याचिकाकर्ते वरिष्ठ वकील श्याम दिवान यांनी केला. देशाचे उपराष्ट्रपतींसारख्या उच्चपदस्थांनी राज्यसभेच्या सदस्यांना पीएम केअर फंडमध्ये दान करण्याचे आवाहन केले होते, असा दवा श्याम दिवान यांनी केला. तर दुसरीकडे पीएम केअर फंड सार्वजनिक धर्मादाय संस्था असल्याचे म्हणण्यात आले आहे. तसेच या ट्रस्टकडून फक्त स्वैच्छिक दान स्वीकारले जाते. निधी गोळा करण्याचे काम सरकारचे नाही, असे सरकारने आपल्या प्रतिज्ञापत्रात म्हटलेले आहे.

### सरकारची न्यायालयात माहिती



## जीडीपी वाढीचा दर असेल ६.५ टक्के

### अर्थमंत्री सीतारामन : आर्थिक सर्वेक्षण अहवाल संसदेत सादर



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : येत्या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्था ६ ते ६.८ टक्के वाढेल अशी अपेक्षा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत सादर केलेल्या आर्थिक सर्वोक्षणात व्यक्त केली आहे. २०२२-२३ चा आर्थिक अहवाल संसदेच्या पटलावर ठेवला. आर्थिक सर्वेक्षणात २०२३-२४ चा जीडीपीवाढीचा दर ६.५ टक्के असेल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मागील तीन वर्षांचा विचार केला तर ही वाढ सर्वात कमी असणार आहे. नॉमीनल जीडीपी ११ टक्के राहिल असेही म्हटले गेले आहे.**

२०२२-२३ या वर्षात सेवा क्षेत्राने ८.४ टक्के वाढ नोंदवली पुढील आर्थिक वर्षात म्हणजेच २०२३-२४ मध्ये ९.१ टक्के वाढ अपेक्षित आहे. कोरोनामुळे झालेल्या तोट्याची भरपाई पूर्ण झाली आहे. करोनाच्या काळात देशाची आर्थिक घडी विस्कटली होती मात्र यावर्षी ती भरून निघाला आहे असेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. सेवा क्षेत्राला बँकांकडून होणाऱ्या वित्तपुरवठ्यातही सकारात्मक वाढ झाली आहे. ही वाढ २१ टक्क्यांची आहे.

वैद्यकीय उपचारांसाठी जगभरातून भारतातून येणाऱ्यांच्या संख्येतही वाढ झाली आहे. चांगल्या जगातील ४६ देशांमध्ये भारताचा क्रमांक दहावा आहे अशी माहिती आर्थिक अहवालात नोंदवण्यात आली आहे. भारतात थेट परकीय गुंतवणुकीचा ओघही चांगला वाढला आहे. UNCTAD च्या २०२२ च्या जागतिक गुंतवणूक अहवालात जगभरातील सर्वाधिक विदेशी गुंतवणूक मिळवणाऱ्या २० देशांमध्ये भारताचे स्थान आठवे आहे. भारतात यावर्षी ८४ अब्ज अमेरिकी डॉलर्सची थेट विदेशी गुंतवणूक झाली आहे. त्यातील एकट्या सेवाक्षेत्रात ७.१ अब्ज अमेरिकी डॉलर्सची गुंतवणूक झाली आहे.

### काय आहे इकॉनॉमिक सर्व्हे ?

देशात मध्यमवर्गीय लोकांची संख्या खूप जास्त आहे . त्यामुळे आपल्या घरांघरांमध्ये महिन्याचं बजेट कसं ठरवायचं किंवा जमा–खर्चाचा ताळमेळ कसा घालायचा यासाठी डायरी किंवा वही ठेवली जाते . वर्ष संपल्यानंतर आपण त्या डायरी किंवा वहीचा आढावा घेऊ शकतो . घरात कुठे किती पैसे खर्च झाले ? कुठे जास्त पैसे खर्च झाले ? कुठे पैसे वाचवता आले असते ? या सगळ्या प्रश्नांची उत्तरं आपल्याला मिळू शकतात . आर्थिक सर्वेक्षण हे आपल्या घरातल्या हिशोबाच्या वही किंवा डायरी प्रमाणेच असते . अर्थ संकल्पाच्या एक दिवस आधी आर्थिक सर्वेक्षण सादर केले जाते .

### अर्थमंत्री अपेक्षा पूर्ण करतील : पंतप्रधान मोदी

१ फेब्रुवारी रोजी आर्थिक वर्ष २०२३–२४ साठी देशाचं अर्थसंकल्प लोकसभेत मांडले जाईल तर आजपासून संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरुवात झाली आहे . बजेट अधिवेशनाच्या सुरुवतीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्या सादर होणाऱ्या सर्वसाधारण अर्थसंकल्पापूर्वी आज देशाला मोठा इशारा दिला . अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी पत्रकारांशी संवाद साधताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज जगात ज्या प्रकारची परिस्थिती आहे, त्यामध्ये सर्वांच्या नजरा भारताच्या अर्थसंकल्पाकडे लागल्या आहेत . त्यांनी म्हटले की मला आशा आहे की अर्थमंत्री निर्मला सीतारामन या अपेक्षा पूर्ण करतील . या अर्थसंकल्पात अर्थमंत्री सर्वसामान्यांना काही दिलासा देण्याची घोषणा करू शकतात, असे मानले जात आहे .

पंतप्रधान मोदी म्हणाले की, अस्थिर जागतिक आर्थिक परिस्थितीमध्ये, भारताचा अर्थसंकल्प सर्वसामान्य नागरिकांच्या आशा आणि आकांक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करेल, जगाला दिसणारा आशेचा किरण अधिक उजळत आहे . यासाठी निर्मला सीतारामन या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतील असा माझा ठाम विश्वास आहे . संपूर्ण जग भारताकडे ज्या दृष्टीकोनाने पाहत आहे ते आम्ही पूर्ण करू, असेही पंतप्रधान म्हणाले . पीएम मोदी म्हणाले की, आजपासून अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होत आहे . आणि ज्याचा आवाज ओळखला जातो, तो आवाज आशेचा संदेश घेऊन येत आहे . उत्साहाची नांदी घेऊन येत आहे . आज एक महत्त्वाचा प्रसंग आहे . त्यांनी म्हटले की, भारताचा अर्थसंकल्प सामान्य लोकांच्या आशा पूर्ण करण्यासाठी झटत असताना, जगाला प्रकाश देईल, जे भारताकडे आशेचा किरण म्हणून पाहत आहे . अशाप्रकारे यंदाचा अर्थसंकल्प लोकप्रिय ठरू शकतो, असे पंतप्रधानांच्या विधानांवरून समजले जाऊ शकते . पुढील वर्षी २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी मोदी सरकारचा हा शेवटचा पूर्ण अर्थसंकल्प आहे .

### चर्चेतली बातमी

## आंध्र प्रदेशची नवी राजधानी विशाखापट्टनम

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** विशाखापट्टनम हे शहर आता आंध्र प्रदेश राज्याची नवीन राजधानी असेल. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री वाय. एस. जगनमोहन रेड्डी यांनी या नवाची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री रेड्डी म्हणाले की, आंध्र प्रदेशची राजधानी विशाखापट्टनम येथे स्थलांतरित केली जाणार आहे. रेड्डी यांनी सांगितले की, ते त्यांचे कार्यालय विशाखापट्टनम येथे स्थलांतरित करणार आहेत. आंध्र प्रदेश सरकारने २३ एप्रिल २०१५ रोजी अमरावती शहर आपली राजधानी म्हणून घोषित केले होते. २०२० मध्ये राज्य सरकारने तीन शहरं राजधानी म्हणून बनवण्याची योजना आणली होती. ज्यामध्ये अमरावती, विशाखापट्टनम आणि कुरनूल या शहरांचा समावेश होता. त्यानंतर ही योजना मागे घेण्यात आली आणि अमरावती हेच शहर आंध्र प्रदेशची राजधानी म्हणून कायम राहिले.

अमरावती हे शहर कथित जमीन घोटाळ्याचं केंद्र म्हणून प्रसिद्ध झाले होते. रेड्डी यांचा पक्ष वायएसआरसीपीने आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांच्यावर जमीन घोटाळ्यासह वेगवेगळे आरोप केले आहेत. रेड्डी यांच्या पक्षाने सीबीआय तपासाची मागणी करत आरोप केले होते की, काही लोकांना आधीपासूनच नव्या राजधानीच्या स्थानाबद्दल माहिती देण्यात आली होती. त्यामुळे या लोकांनी स्वतःच्या आर्थिक लाभांसाठी राजधानीत जमिनी खरेदी केल्या होत्या. केंद्र सरकारला दिलेल्या माहितीत राज्य सरकारने म्हटले आहे की, २०१४ मध्ये अशा लोकांनी तब्बल ४,००० एकर जमीन खरेदी केली होती. दरम्यान एन. चंद्राबाबू नायडू यांनी अशा प्रकारचे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. उलट नायडू यांनी सवाल उपस्थित केला आहे की, नवीन राजधानी बनवण्यासाठी शेतकऱ्यांकडून घेतलेल्या जमिनी वायएसआरसीपी सरकार का विकत आहे.

## ‘तर्पण’ अनाथ मुलांच्या जीवनात आनंद पेरण्यासाठीच

### आ. श्रीकांत भारतीय : अनाथ मुलांचे 96 लाख रुपये शैक्षणिक शुल्क भरले




आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : अनाथांच्या प्रश्नांचे उत्तर म्हणून ‘तर्पण’ उभी आहे. अनाथांचा आनंद हाच आपला प्राण, असे समजून कार्यकर्त्यांनी एक आनंदयात्री म्हणून काम करावे. अठरा वर्षावरील अनाथ मुलांच्या पंखात बळ देण्यासाठी ईश्वरी शक्तीनेच आपली निवड केली असावी अशी भावना व्यक्त करत सर्व संचालकांनी अनाथांच्या जीवनात आनंद पेरावा, असे आवाहन आमदार श्रीकांत भारतीय यांनी केले.**




दोन वर्षात लोकांच्या सहभागातून तर्पणने शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी अनाथ विद्यार्थ्यांसाठी 96 लाख रुपयांची फीस भरली. यातुन मुलांचे शैक्षणिक आणि सामाजिक पुनर्वसन होईल अशी आशा व्यक्त केली. महाराष्ट्रात अठरा वर्षावरील अनाथ मुलांच्या शैक्षणिक आणि सामाजिक पुनर्वसनासाठी मागील दोन वर्षांपासून तर्पणच्या माध्यमातून काम केले जात आहे.

राज्यभरातील तर्पणच्या संचालक आणि कार्यकर्त्यांची तीन दिवसीय कार्यशाळा रामभाऊ महाळंगी प्रबोधनीत पार पडली. अनाथांसाठीच्या दोन वर्षातील कामाचे सिंहावलोकन करताना तर्पण चे प्रमुख आमदार श्रीकांत भारतीय यांनी समाजात अनाथ मुलांचे प्रश्न आहेत म्हणून संस्था जन्माला आली नाही तर या प्रश्नांचे उत्तर म्हणून काम करत आहे. आपले काम प्रामाणिक असेल तर समाज आणि शासन सुध्दा भक्कमपणे पाठीशी उभा राहू शकतो. याचा प्रत्यय आला. दोन वर्षात अठरा वर्षापुढील अनाथ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामासाठी तब्बल 96 लाख रुपयांची फीस भरली आहे. समाजातील दानशुरांनी विश्वासाने मदत केल्यामुळेच हे काम पूर्ण होऊ शकले. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानातील उद्देशाचा संदर्भ देऊन भारतीय यांनी अनाथांचे काम करण्यासाठी ईश्वरानेच आपली निवड केली असावी. त्यामुळे अनाथांच्या जीवनात आनंद हेच तर्पण चा प्राण आहे. त्यामुळे संस्थेत सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या राज्यभरातील संचालक आणि कार्यकर्त्यांनी एक आनंदयात्री म्हणून अनाथांच्या जीवनात आनंद पेरण्यासाठी मनोभावे सज्ज व्हावे असे आवाहन त्यांनी केले. आपल्यातील क्षमता ओळखून अधिक जोमाने अनाथांसाठी काम केल्यास या मुलांच्या सामाजिक पुनर्वसनाला अधिक बळ मिळणार आहे. अशी आशाही त्यांनी व्यक्त केली. या कार्यशाळेसाठी राज्यभरातील संचालक, कार्यकर्ते, मुलं मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महिला, बालविकास विभागाच्या सचिव आर.विमला, रविंद्र संगवी, दिलीप पोरवाल यांनीही वेगवेगळ्या विषयावर मार्गदर्शन केले. तर्पणच्या कामात अग्रेसर असलेल्या श्रेयाताई भारतीय यांच्या पसायदानाने या तीन दिवसीय कार्यशाळेचा समारोप झाला.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## माणूस घडविणारे शिक्षण हवे... स्वामी विवेकानंद




आधुनिक केसरी

शिकवणं किंवा शिकणं हे कसं असतं ते सांगताना प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ रघुनाथ माशेलकर त्यांच्या शिक्षकांचं उदाहरण दिलं होतं . त्यांची शाळा साधी मराठी माध्यमाची होती. पण त्यांना जे विज्ञानाचे शिक्षक, भूगोलाचे शिक्षक मिळाले होते, त्या शिक्षकांनी त्यांना केवळ वर्गाच्या चार भिंतीत शिकवलं नाही. भूगोलाचे शिक्षक त्यांना पर्यावरण, समुद्र इ शिकवताना सहलीला म्हणून बाहेर घेऊन जात. तेथे पर्यावरणाच्या, समुद्राच्या निरीक्षणातून त्यांचे शिक्षण घडत होते. भूगोल शिकता शिकता पक्षी जगत, वनस्पती इ बद्दल सुद्धा शिकायला मिळत असे. खरा शिक्षक तोच असतो जो विषयांची एकमेकात सांगड घालतो. मी फक्त भूगोलाचा शिक्षक आहे असे म्हणून त्याला चालणार नाही. त्यांचे विज्ञानाचे शिक्षक त्यांना साबण बनवण्याची प्रक्रिया समजावून देताना साबणाच्या कारखान्यात घेऊन गेले. तिथे मुलांनी ती सगळी प्रक्रिया आपल्या डोळ्यांनी अनुभवली. बहिर्गोल भिंगातून प्रकाशकिरण एकत्र केले की त्यांची शक्ती वाढते. ते एकवटले की कागद सुद्धा जाळू शकतात. हे त्यांच्या शिक्षकांनी त्यांना वर्गाच्या बाहेर नेऊन सांगितले. मुलांना तो प्रयोग करून दाखवला. त्यांनाही अनुभव घ्यायला लावला. दुसऱ्या एखाद्या शिक्षकाने या गोष्टी वर्गातही शिकवल्या असत्या. पण मग ती झाली असती केवळ माहिती. मुलांनी घेतला तो प्रत्यक्ष अनुभव. आणि जे ज्ञान अनुभवातून येते, ते जणू वज्रलेप होते. मग परीक्षेची भीती बाळगण्याची गरज नसते.

शिकणं ही प्रक्रिया आहे. कोणतीही प्रक्रिया म्हटलं की त्याला अनुसरून काही गोष्टी येतातच. तसं शिकणं ही प्रक्रिया जेव्हा घडते तेव्हा जो शिकतो आहे त्याला काही तरी अनुभव देणं किंवा त्याला स्वतःला काही अनुभव येणं, त्यामधून त्याला जी काही जाणीव प्राप्त होते, ती म्हणजे ज्ञान किंवा शिकण्याची प्रक्रिया म्हणता येईल. खरं तर शिकणं म्हणजे अनुभवातून शहाणं होत जाणं . हे अनुभवांती शिकणं वेगळं आणि शाळा कॉलेजात जाऊन जे आपण शिकतो ते वेगळं. प्रसिद्ध शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईनने असं म्हटलं होत की ' Experience is learning and rest is just an information . ' हे विधान खरं म्हणजे आज धाडसी वाटण्याची शक्यता आहे. पण आईन्स्टाईनने हे आपल्याला शंभर वर्षांपूर्वी सांगितलं होतं. म्हणजे आईन्स्टाईन असं म्हणतो की आपण अनुभवातून जे शिकतो तेच खरं शिकणं किंवा ज्ञान आणि बाकीचं सगळं म्हणजे माहितीचं भांडार. काही दिवसांपूर्वी मी अमरावतीच्या शाश्वत स्कुलमध्ये गेलो होतो. तिथले संचालक अतुल गायगोले हे आपल्या विद्यार्थ्यांना शिकण्याचा प्रत्यक्ष अनुभव देण्याबद्दल आग्रही असतात.

**क्रमशः**



## आनंदी पहाट

### वैचारिक बैठकीत सामील व्हावे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

विचारांचा पाया मजबूत असलेल्या व्यक्तीच्या मानसिक कळसाची उंची मोजणे सहज शक्य होतेच असे नाही. अशा व्यक्तीपेक्षा त्या व्यक्तीच्या विचारांचेच आकर्षण, कौतुक आणि आदर अधिक असल्याचे दिसून येत असते. ह्याची जाणीव आपण ठेवणे आवश्यक असते. अशी वैचारिक प्रगल्भता प्राप्त करणाऱ्यांपैकी आपणही एक असायला काय हरकत आहे, असा विचार आपल्या मनात यायला हवा. विचारवंतांच्या वैचारिक बैठकीत सामील व्हायला कसे मिळेल, ह्याच दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येणे महत्वाचे ठरते. कारण, अशा विचारवंतांच्या वैचारिक, मानसिक कळसाला स्पर्श करून येणारा प्रकाशाचा, आशेचा प्रत्येक किरण मार्गस्थ होण्यासाठी अनेकांना योग्य दिशा दाखवत असतो. दशदिशांपैकी कोणत्याही दिशेने मार्गस्थ झाले, तरीही यश प्राप्तीच्या मार्गाचे दर्शन होतच राहते. आपल्या अंतर्मनाला संस्कारच शिस्त लावत असतात. एक विशीष्ट आकार, दिशा आणि गती प्राप्त करून देत असतात. मुळातच ह्या विचारांची व्याप्ती आपण समजून घेणे सर्वप्रथम जरुरीचे असते. आपल्या प्रत्येकाच्या जीवनांत अंतर्मानावरील संस्कार खूप महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. त्याशिवाय आपल्या विचारांमध्ये परिपक्वता येतेच असे नाही. संस्काराशिवाय जीवनमूल्य शून्य ठरत असते. संस्कारच आपल्याला श्रेष्ठ बनवत असतात, उत्तम आकार देत असतात. आपल्या सर्वोत्तम जीवनाचा पाया उत्तम संस्कारांवरच अवलंबून असतो. संस्कारांशिवाय जीवन भरकटलेल्या जहाजाप्रमाणे, विमानाप्रमाणे असते, एकप्रकारे विमनस्क अवस्थेतील मन कोणतीही पातळी गाठू शकते. त्याचप्रमाणे, संस्कृती सुद्धा, संस्कारांवर आधारित असते. संस्कार म्हणजे आपल्या अंतर्मनावर सामाजिकदृष्ट्या महत्वाच्या आणि उपयुक्त ठरतील अशा चांगल्या सवयी, असे म्हणता येईल. आपल्यामध्ये यासाठी आवश्यक ते सद्गुण असणे जरुरीचे असते. अशा गुणांचा केवळ व्यक्तिगत लाभ होत नसतो, तर समाजातील प्रत्येक घटक लाभार्थी ठरत असतो.



आधुनिक केसरी

**आता या जन्माचे | सोने झाले ||**
**गंधाळला जरा | मोगरा मनाचा ||**
**अंतरी ज्ञानाचा | दीप चेते ||१||**
**गाभाऱ्यात घुमे | ॐकाराची धून ||**
**जाग निद्रेतून | आली आता ||२||**
**चिपळ्यांचे बोल | मस्तकी भिनले ||**
**मन वेडावले | अभंगात ||३||**
**भंडारी फुलला | भामरी डोलला ||**
**शब्द तुका झाला | काळजात ||४||**
**मर्म कळो आले | पूर्वसंचिताचे ||**
**आता या जन्माचे | सोने झाले ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**फक्त एकच काळजी घ्या- निसर्गातील समतोल बिघडवू नका. त्या समतोलाचे होईल तेवढे रक्षण करा.**

**‘देतो तो देव’ हीच देवाची व्याख्या असेल तर वृक्ष, पर्वत, भूमी, नदी, समुद्र किंबहुना संपूर्ण निसर्गच देव आहे.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**मन माया सुक्षम रहे, अन्तर तन महँ वास । मने निरञ्जन काल है, खावे विषयन फाँस ।।२१।। (स्वर्वेद पंचम मण्डल द्वितीय अध्याय) ०५/०२/२१ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

मनात सूक्ष्म माया असते जी शरीरात वास्तव्य करते. मनच काल-निरंजन आहे, जो जीवाला विषय-बंधनात ठेवून त्याच्या महान उद्देशाला नष्ट करतो. म्हणजेच आत्म-उत्थानाच्या मार्गावर पुढे जाऊ देत नाही.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

## बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

ब्रम्हाच्या ठिकाणी मी पणाला काही किंमत नाही. नानाविकल्पाला स्थान नाही. सर्वत्र निंदनीय असणाऱ्या व मी पणाला नाहीसे करून विवेकाने द्रुष्य बाजूला सारून कल्पनेचा खेळ थांबवून आपण स्वतः ब्रम्ह होऊनचं ब्रम्हज्ञान प्राप्त करून घ्यावे. आपले मन नेहमी कल्पनेत रमते. पण वास्तविक जगात वावरत असताना म्हणजेच द्रुष्य जगात कल्पनेला मर्यादा आहेत. ही कल्पना ब्रम्ह वस्तुला आकलन करू शकत नाही. आणि आपण जी कल्पना करतो ती तिच्या पर्यन्त पोहचू शकत नाही. कारण ब्रम्ह निर्विकल्प आहे. हा निर्विकल्प पणा येण्यासाठी पून्हा तुम्हाला शुन्यापर्यन्त पोहचावे लागते. ते साधेसोपे नाही. या साठी परमात्म्याशी एकरूप होणे गरजेचे आहे. हे आपण मान्य करू की वस्तुस्थिती अशी आहे. तरी देखील ब्रम्हाची कल्पना करू लागलो तर ते कल्पनेच्या आवाक्यात येत नाही. मनाला ते पटत नाही. गोंधळून गेल्या सारखे वाटते. कारण ब्रम्ह डोळ्यांना दिसत नाही मनाला भासत नाही मग ते इंद्रियांना दिसत नाही अशा प्रकारच्या सर्व कोंडीत सापडल्या सारखी अवस्था होते. थोडक्यात काय तर द्विधा मनस्थिती होते. आपल्या मनाला आकार पहाण्याची सवय आहे, ब्रम्हाला आकार नाही. म्हणून ब्रम्ह पहायला गेलेले मन शुन्याकार होऊन जाते. आपली कल्पना अपूरी पडते. मित्रांनो म्हणून म्हणते ब्रम्ह काही सप्तरंगी इंद्रधनुष्य नाही.

## बद्ध आणि मुक्त यातला फरक

आधुनिक केसरी

बद्ध हे जगाचे असतात. मुक्त हे जगाचे नसून एका भगवंताचे असतात. संतांची चवकशी करताना, त्याची उपासना कोणती, गुरू कोण हे पाहतात. त्याच्या आईबापांची नाही चौकशी करीत. संतांना देहाची आठवण नसते. ते आपला देहाभिमान, मीपण, भगवंताला देतात. परमात्म्यापेक्षा विषयाची गोडी ज्याला जास्त तो बद्ध. विषयाचे प्रेम कमी होणे म्हणजे मुक्तदशेच्या मार्गाला लागणे, ' मी भगवंताचा ' म्हटले की तिथे बद्धपणा संपला. आपण बद्ध आहोत हे तरी आपणच बद्ध आहोत ही भावना करून घेतली म्हणून. आपण, मूळ तेच रूप स्वयंसिद्ध असताना, सर्व इंद्रिये मिळून होणारा देह मी आहे असे म्हणतो; आणि त्यामुळे देहाला जे सुखदुःख होते ते आपल्याला झाले असे म्हणतो. आत्मा स्वतः त्यापासून अलिप्त असतो. परंतु आत्मा आणि देह वेगळा नाही असे आपण म्हणत असतो; म्हणून मी तोच देह आणि हा देह तोच आत्मा, अशी आपली भावना दृढ झालेली असते. परंतु आपण बोलण्यात मात्र ' माझा ' हात दुखावला किंवा 'माझ्या ' पोटात दुखते, असे म्हणतोच की नाही ? म्हणजे, प्रत्येक अवयव 'माझा' म्हणणारा कुणीतरी वेगळा आहे हे खरे; आपल्याला ते बरोबर समजत नाही इतकेच. मीपणा हा आपल्यात इतका बाणलेला असतो. आपले मन विषयाच्या आनंदात रंगले, म्हणून तिथे आपण आपलेपणाने वागतो.



परंतु विषयच जिथे खोटे, तिथे मन रंगूनही, ते नाहीसे झाले म्हणजे आपल्याला दुःख हे होणारच. आपण दुसऱ्यावर अवलंबून राहिलो म्हणूनही सुखदुःख होते. म्हणून , आपण त्या सर्वांपासून निराळे आहोत असे समजून वागावे. हे होण्यासाठी परमेश्वराची भक्ति करायला पाहिजे. भक्तिला जर काही आड येत असेल तर आपली देहबुद्धीच होय; आणि ती गेल्याशिवाय खरी भक्ति होणारच नाही. तरी आपण परमेश्वराचे आहोत असे समजून वागावे. जे जे होईल ते ते त्याची इच्छा म्हणून झाले असे समजून वागू लागलो, म्हणजे आपली देहबुद्धी हळूहळू कमी होत जाईल. याकरिता काही तप, याग वगैरे करावे लागत नाही. संसार सोडून वनातही जावे लागत नाही आणि विशेष आटाआटीही करावी लागत नाही. जे घडते ते ' मी केले' हा मीपणा टाकून, ' मी देवाचा आहे ' असे म्हणून, आणि जे होईल त्यात आनंद मानून राहावे, म्हणजे मीपणा सुटत जाईल. हे ' मी ' केले नाही, परमात्म्याच्या इच्छेने झाले, असे मानले म्हणजे मीपणा राहिला कुठे ?

**आजचे बोधवचन आहे - ज्याप्रमाणे, मनाने ' मी देहाचा आहे ' अशी समजून झालेल्याने आपण देहरूप बनलो, त्याचप्रमाणे मनाने ' मी भगवंताचा आहे ' असे म्हणत गेल्याने आपण भगवद् रूप बनून जाऊ.**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**सर्व सुख आम्ही भोगूं सर्व काळ । तोडियेलें जाळ मोहपाश ॥१॥**
**याचसाठी सांडियेले भरतार । रातलों या परपुरुषाशीं ॥२॥**
**तुका म्हणे आतां गर्भ नये धरूं । औषध जें करूं फळ नव्हे ॥३॥**
**एका जिवें आतां जिणें जालें दोहीं । वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥**
**नारायणा आम्हां नाहीं वेगळीक । पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥**
**तुका म्हणे जालें सायासाचें फळ । सरली ते वेळ काळ दोन्ही ॥३॥**
**हासों रुसों आतां वाढवूं आवडी । अंतरींची गोडी अवीट ते ॥१॥**

आधुनिक केसरी

बुधवार, १ फेब्रुवारी २०२३



adhunikkesari.com Adhunik Kesari

# वाचाळवीरांसाठी नवीन कायदा करावा

## अजित पवार : 'हास्यजत्रा' फेम प्रभाकर मोरे यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आम्ही सुरुवातीपासून सांगतोय महापुरुषांबद्दल सातत्याने अपमान करण्याचे काम काहीजण जाणीवपूर्वक करत आहेत. त्यातून लोकांचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न आणि महत्वाचे मुद्दे महागाई, बेरोजगारी आणि आताच्या कायदा व सुव्यवस्था, शेतकऱ्यांचे प्रश्न या समस्या असतील या प्रश्नावरून लक्ष विचलित करण्यासाठी या गोष्टी केल्या जात आहेत.
वास्तविक त्यासंदर्भात अर्थसंकल्पीय अधिवेशन होणार आहे. यामध्ये महापुरुषांबद्दल बेताल वक्तव्य करून जे वाचाळवीर नवीन समस्या निर्माण करत आहेत यासाठी सरकारने एक नवीन धोरण किंवा नवीन कायदा करावा अशी मागणी करणार असल्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.
बागेश्वर बाबा कोण आहे. त्याने संत तुकाराम महाराज यांच्याबद्दल वक्तव्य करून अपमान केला आहे हा अपमान आम्ही सहन करणार नाही. राज्यात वारकरी संप्रदायाचे मोठ्या प्रमाणात लोक आहेत. या वक्तव्याचा निषेध करतानाच अशा बाबांवर राज्यसरकारने कारवाई करावी अशी मागणीही अजित पवार यांनी यावेळी केली.



बीबीसी डॉक्युमेंटरीबाबत बोलताना आपण लोकशाहीत काम करतो. आपला भारत खंडप्राय देशात लोकशाहीला फार मोठे महत्त्व आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी फार विचारपूर्वक हे संविधान, घटना कायदा दिला आहे. त्या घटना, कायद्यात, संविधानाच्या चौकटीमध्ये बसणाऱ्या ज्या बाबी असतील त्या मिडियाने दाखवल्या पाहिजेत. त्या मिडियाने वृत्तपत्रात छापल्या पाहिजेत, लेख पण लिहिले पाहिजेत आणि ज्यातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार आहे, ज्यातून धर्मा-धर्मात तेढ निर्माण होणार आहे, जातीयद्वेष निर्माण होणार आहे, समासमाजात दुही निर्माण होणार आहे, अंतर पडणार आहे अशा गोष्टी आपल्या भारताला परवडणाऱ्या नाहीत आणि अठरापगड जाती असणाऱ्या तुमच्या - माझ्या भारतामध्ये या सगळ्यांचा आदर केला पाहिजे आणि आपल्या सगळ्या महापुरुषांनी याबद्दलचं स्पष्ट मत त्यांच्या - त्यांच्या काळात व्यक्त केले आहे आज आपण इतिहासात वाचतो आणि त्याच विचारांचे अनुकरण करुन पुढे जाण्याचा प्रयत्न आपण सर्वजण करत असतो असेही अजित पवार म्हणाले.

प्रकाश आंबेडकर यांनी मोदी – शहा यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्यावर पत्रकारांनी विचारले असता राजकीय व्यक्तीने किंवा नागरिकांने काय म्हणावे यावर केलेल्या वक्तव्याबद्दल मला प्रश्न विचारता . ते आमचं मत नाही ते त्यांचे मत आहे त्यांनी व्यक्त केले आहे त्यावर आम्ही वक्तव्य करण्याचे कारण नाही त्यावर नो कमेंट्स अशा शब्दात प्रतिक्रिया व्यक्त केली .

# शब्दांची पावती

## दैनिक आधुनिक केसरीचे वाचक लिहितात...

आधुनिक केसरी

सकाळची वेळ म्हणजे पेपर वाचत चहाचा स्वाद आणि बातम्यांचा आढावा अशी



प्रत्येकाची दिनचर्या असेल असेच गृहित धरून चलूया, जवळपास प्रत्येक रविवारच्या अंकामध्ये कवितेचं पान असतं प्रत्येक जण आपापल्या परीने कविता, लेख, अभंग असं बऱंच लिखाण पाठवून आपण त्या अंकाची वाट पहात बसतो, आपल्यासाठी तो किती आनंददायी क्षण असतो, या मागची संपादकाने आपल्या शब्दाचे बारकाईने केलेले निरीक्षण, मेहनत, दिलेला स्वतःचा वेळ, बारीक-सारीक चुका सुधारून ते आपले शब्द त्यांच्या अंकात प्रसिद्ध करतात, अशीही मंडळी आहेत अहो पेपर वाचल्याशिवाय आमची दिनचर्याच सुरू होत नाही, पेपरचा प्रत्येक काना कोपरा निरखून वाचणारे पेपर वेडे म्हणायला हरकत नाही, मी ही त्यामधूनच  एक आहे, दररोजची येणारी सदरांसह, अध्यात्म, वेगवगळ्या विषयावरील साहित्य, थोर नेत्यांबद्दलचे लेख, चालू घडामोडी वरील डॉ. सुधीर अग्रवाल, रविंद्र मुळे, अमोल पुसदकर, देशपांडे, अशी कितीतरी लेखकांचे लेख, सुगरण रेसिपी, पुस्तक परिचय, सर्व घडामोडीचा आढावा आपण या ई पेपरमधून घेतो, ज्याठिकाणी बसलो आहोत मग ते एयर पोर्ट असो, की रेल्वेमध्ये, एका सेकंदात आपल्या मोबाईलवरुन या जगभरातील घडामोडींचा आढावा या ई पेपरच्या माध्यमातून मिळतो आज ही तसंच काहीसं, नेहमीचाच तो प्रवास,सहजच WHAT'S APP OPEN केले नी 'आधुनिक केसरी' चा पेपर वाचत लांबचा प्रवास वाटणारा हा इतका जवळचा कसा? तेंव्हा हे मन ते पेपर वाचण्यामध्ये मग्न झालेले होते, अन् गांव कधी आले कळलेही नाही, बरेच जण पेपर वाचता वाचता मध्येच अशी झोपेची गोड डुलकी घेताना पाहतो, अशी ही पेपरची किमया, तेव्हा वाटलं "शब्दांची पोच पावती" ही द्यायलाच हवी...

**@कवयित्री, लेखिका**
**सौ.भाग्यश्री दायमा, जयसिंगपूर,**
**जि. कोल्हापूर**

# बीआरएसच्या नेत्यांना बाभळीचे काटे टोचले

## नांदेडच्या सभेसाठी धर्माबादमध्ये बैठक संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**बाबूराव गोणारकर**

**धर्माबाद :** तेलंगणाचे मुख्यमंत्री के.चंद्रशेखर राव यांनी तेलंगणा राष्ट्र समितीचे (टीआरएस) रूपांतर भारतीय राष्ट्र समितीत (बीआरएस) केल्यानंतर आपल्या पक्षाचा विस्तार शेजारील राज्यात करण्यास सुरवात केली आहे.त्याचाच एक भाग म्हणून पाच फेब्रुवारी रोजी नांदेड येथे जाहीर सभेचे आयोजन केले आहे. या सभेच्या पूर्वतयारीसाठी म्हणून धर्माबादमध्ये सोमवारी (ता.30) बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीसाठी तेलंगणातील आमदार शकील शाम पोरफा, सुमन बालका, लिंगारेड्डी, सदानंद, रहेमान, अमृत पाटील व धर्माबाद तालुक्यातील शंकर होट्टे, बाबुराव पाटील, लक्ष्मण निदानकर, जी.पी. मिसाळे, सुधाकर जाधव आदी उपास्थित होते.
मात्र या बैठकीत बाभळी बंधाऱ्यांच्या प्रश्नावरून बीआरएसच्या नेत्यांना कोंडीत पकडण्यात आले. महाराष्ट्र व तत्कालीन आंध्रप्रदेशमध्ये बाभळी बंधाऱ्याच्या प्रश्नावरून जवळपास एक दशक संघर्ष झाला. माजी मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांच्या सह मंत्री, खासदार व आमदारांनी धर्माबादच्या सीमेवर येऊन आंदोलने केली होती. शेवटी हा प्रश्न त्यांनी सर्वोच्च न्यायलयात घेऊन गेले. सर्वोच्च  न्यायालयाने 1 जुलै ते 28 ऑक्टोंबर या काळात बाभळी बंधाऱ्याचे दरवाजे उघडे ठेवण्याचे  तसेच एक मार्च रोजी 0.6 अब्ज घनफूट पाणी सोडण्याचे आदेश दिले.

धर्माबाद तालुक्याचा विकास करण्यासाठी महाराष्ट्र शासन खंबीर आहे .धर्माबाद तालुक्यात बीआरएस पक्षाला राजकारण करावयाच असेल तर प्रथम त्यांनी बाभळी बंधाऱ्यावर आपली भूमिका स्पष्ट करावी.    **आकाश रेड्डी येताळकर, नांदेड, जिल्हा सह संपर्कप्रमुख बाळासाहेबांची शिवसेना**



यामुळे दरवर्षी महाराष्ट्राच्या हक्काचे पाणी तेलंगणात सोडावे लागते. धर्माबादच्या काही कार्यकर्त्यांनी हा प्रश्न बैठकीत विचारल्यामुळे त्यांची कोंडी झाली. हा प्रश्न बाजूला ठेवून नांदेड येथे होणाऱ्या सभेसाठी आपण सर्वांनी तयारी करावी असे आव्हान करण्यात आले. बीआरएस पक्ष धर्माबाद तालुक्यातील नगर परिषद, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूक लढविण्यास उत्सुक आहे. मात्र त्यांना बाभळीचे काटे टोचतील असे चिन्ह आहेत.

# वाघाच्या पिंजऱ्यात शिरला नाग

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** पाच वर्षांपूर्वी सर्पदंश झाल्यामुळे महाराजबाग प्राणीसंग्रहालयातील 'जाई' नावाच्या वाघिणीला मृत्यूची वाट पत्करावी लागली. आता पाच वर्षानंतर पुन्हा एकदा त्याच घटनेची पुनरावृत्ती होता होता टळली. या प्राणीसंग्रहालयातील वाघाच्या पिंजऱ्यात चक्क नागोबाने प्रवेश केला. कर्मचाऱ्यांना ते लगेच निदर्शनास आले आणि त्यांनी नागाला बाहेर काढले. मात्र, या घटनेमुळे महाराजबाग प्राणीसंग्रहालय चालवणाऱ्या कृषी महाविद्यालयाच्या बेजबाबदार कार्यशैलीवर टीका होत आहे.
एक महिन्यापूर्वी महाराजबाग प्राणीसंग्रहालय परिसरात धामण साप दिसला. त्यालाही प्रशासनाने 'रेस्क्यू' केले. त्यानंतर आता वाघाच्या पिंजऱ्यात चक्क नागोबा अवतरले. यावेळी वाघ लहान पिंजऱ्यात असल्याने त्याचा जीव वाचला. लहान पिंजऱ्यालगतच्या खुल्या पिंजऱ्यातील छोट्या कृत्रीम पाणवठ्यावर या नागाने आपले बस्तान बसवले. कर्मचाऱ्यांच्या लक्षात ही बाब आली, पण त्याला 'रेस्क्यू' करणे इतके सोपे नव्हते.




# खुलताबाद तालुक्यातील 762 एकर अतिक्रमण औरंगाबाद वन विभागाने हटविले

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**खुलताबाद :** औरंगाबाद वन विभाग मधील खुलताबाद वनपरिक्षेत्रातील पळसवाडी वन परिमंडळ मधील निरगुडी नियतक्षेत्रातील कक्ष क्रमांक 184,185,186 मधील एकूण 127 एकर वन जमिनीवरील अतिक्रमण निष्काशन मोहीम सुरू करण्यात आली.
सदर अतिक्रमित वनजमिनीवर गहू, मका, ज्वारी, हरभरा,कापूस इत्यादी पिके घेण्यात येत होते.  स्थानिकांच्या म्हणण्यानुसार सदर जमिनीचा बाजार भाव  एकरी 8 लक्ष रुपये असून एकूण 127 एकर निष्काशीत क्षेत्राचे  मूल्य 10 कोटी 6 लक्ष रु आहे. अतिक्रमण निष्काशन कामी वन विभाग तसेच ईतरविभागाचे एकूण 244 अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते. सदर अतिक्रमण धारकांना आपले म्हणणे मांडण्याची पूर्ण  संधी देऊनच महाराष्ट्र महसूल संहिता-  १९६६ चे कलम ५३ व ५४ अन्वये  अतिक्रमण हटविण्यात आले आहे.  या कारवाईच्या वेळी मा. सत्यजित गुजर,  मुख्य वनसंरक्षक औरंगाबाद प्रादेशिक, व मा. सूर्यकांत मंकावार, उपवनसंरक्षक औरंगाबाद प्रादेशिक, यांचे प्रमुख मार्गदर्शनात, तसेच मा. अस्तिक कुमार  पाण्डेंय जिल्हाधिकारी, मनीष कलवानिया पोलीस अधीक्षक महसूल, महावितरण, आरोग्य, अग्नीशमन विभाग यांचे मोलाचे  मार्गदर्शन व सहकार्य लाभले.  सदर कारवाईच्या वेळी आनंद गायके वनपरिक्षेत्र अधिकारी नागद, दादा तौर वनपरिक्षेत्र अधिकारी औरंगाबाद, रोहिणी साळुंखे वनपरिक्षेत्र अधिकारी कन्नड, संजय भिसे वनपरिक्षेत्र अधिकारी सिल्लोड, अभय अटकळ, वनपरिक्षेत्र अधिकारी जालना दक्षिण, अनिल मिसाळ वनपरिक्षेत्र सोयगाव अण्णासाहेब पेहरकर वनपरिक्षेत्र अधिकारी खुलताबाद सुशील नांदवटे वनपरिक्षेत्र अधिकारी स्ट्राईक फोर्स, स्वप्निल पवार परिविक्षाधीन वनपरिक्षेत्र अधिकारीसह वनपाल, वनरक्षक व वनमजूर उपस्थित होते.

## मनसेचा दावा

आधुनिक केसरी

मुंबई महानगर पालिका निवडणुकांची जोरदार चर्चा सध्या शहराच्या राजकीय वर्तुळात चालू आहे. पालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी भाजपा आणि शिंदे गटासोबतच महाविकास आघाडीतील तिनही पक्षांनी कंबर कसली आहे. त्यात मनसे, वंचित बहुजन आघाडी आणि एमआयएमनंही मुंबई पालिकेतलं राजकीय अस्तित्व वाढवण्यासाठी कंबर कसलेली असताना मनसेकडून सातत्याने शिवसेनेच्या काळातील पालिकेच्या कारभारावर टीका केल्याचे पाहायला मिळाले आहे. आता तर मनसेने थेट ईडीलाच पत्र पाठवले असून यंदा आपल्या हाती भक्कम पुरावा लागल्याचं या पत्रात नमूद करण्यात आलं आहे.
मनसेकडून सातत्याने करोना काळात मुंबई महानगर पालिकेकडून मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे आरोप करण्यात आले आहेत. यात कोविड सेंटरमधील वेगवेगळ्या सेवांच्या कंत्राटामध्ये घोटाळा झाल्याचा आरोप सातत्याने होत आहे. मात्र, आत्तापर्यंत घोटाळ्यांच्या आरोपांची चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या मनसेने आता त्यासंदर्भातला पुरावा हाती आल्याचे सांगितले आहे. त्याबाबत पत्रामध्ये उल्लेख करण्यात आला आहे. मनसेकडून आर्थिक गुन्हे शाखेच्या सह पोलीस आयुक्तांना पाठवलेल्या पत्रामध्ये याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे. करोना काळा पालिकेत सत्ताधारी असलेल्या शिवसेना युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून मोठा घोटाळा केला गेला. करोना काळात चौकशीची मागणी होत होती. पण कंत्राटाची चौकशी करता येणार नसल्याचे पालिकेने सांगितले होते. मनसेने सुरुवातीपासून यासंदर्भात आवाज उठवला आहे.
पण यावेळी घोटाळ्याचा भक्कम पुरावा आमच्या हाती लागला आहे, असे मनसेने पाठवलेल्या पत्रात नमूद केले आहे. करोना काळात कोणताही अनुभव नसलेल्या कंपनीला वेगवेगळी कंत्राटे देण्यात आली. त्यात मालाड व रिचर्डसन कुडास येथे करोना सेंटर्स उभारले होते. या सेंटरमध्ये वेगवेगळ्या कंपन्यांच्या माध्यमातून जेवण, लाँड्री, सेनिटायझर पुरवठा अशी कंत्राटे युवासेना पदाधिकारी वैभव थोरात यांनी तयार केलेल्या ठक्कर अड पवार कंपनी, शिवसेनी एंटरप्रायजेस, शिवचिदंबरम फार्मा, रमेश अँड असोसिएट, अर्का कंपनी, देवराया एंटरप्रायजेस, जय भवानी एंटरप्रायजेस व ग्रीन स्पेस रिएल्टी या कंपन्यांना देण्यात आले. या कंत्राटांमागे कुणाचा सहभाग होता, याची चौकशी होणे गरजेचे आहे, असे पत्रामध्ये नमूद करण्यात आले आहे.

## साहित्यातील नवा वाद


आधुनिक केसरी



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

**वादा शिवाय कुठलेही साहित्य संमेलन होऊ द्यायचेच नाही असा नियम आहे की काय ,माहिती नाही. आता तर संमेलन सुरू व्हायला बराच अवधी असताना नव्या वादाला निमित्त मिळाले आहे. तेही सरकारनेच या वादाला वात लावण्याचे काम केले आहे. अनघा लेले यांनी केलेल्या श्री गांधी यांच्या अनुवादित पुस्तकाला दिलेला राज्य पुरस्कार रद्द करून, ते पुरस्कार देणाऱ्या समितीला बरखास्त करून, सरकारने स्वतःचे नवे मानदंड निर्माण केल्याचे दिसते. हा निर्णय घेणाऱ्या मंत्री, अधिकारी मंडळींनी मूळ पुस्तकं वाचले की नाही कोण जाणे.**

बहुधा नसावे. कारण ही निर्णय घेणारी मंडळी मुळातच इतकी विद्वान असतात की त्यांना साहित्य वाचनाची गरज भासत नसावी. जसे चित्रपट न बघता त्याला विरोध होतो. इतिहास न अभ्यासता त्याही क्षेत्रात दिवे पाजळले जातात.तसेच हे प्रकरण असावे. कारण जर पुस्तकात, किंवा अनुवादात काही आक्षेपार्ह असते तर यापूर्वीच आक्षेप का घेतले नाहीत? साहित्यात कोणत्या गोष्टीवर आक्षेप घ्यायचा, कशावर बंदी आणायची याला काही नियम आहेत का? साहित्यात समाजाचे प्रतिबिंब असते असे समजतात.समाजात सुष्ट दुष्ट दोन्ही प्रवृत्ती असतात.नीती बरोबर अनीती असते.भ्रष्टाचार असतो. क्रौर्य असते. या सगळ्या भावना साहित्यात विविध माध्यमातून चित्रित होणे अपेक्षित असते.
ज्या पुस्तकावर आक्षेप घेतल्या जातोय त्यात तुरुंगातील मुळ लेखकाच्या आठवणी आहेत. अनुभव कथन आहे.असे अनुभव कथन यापूर्वी अनेकांनी केले आहे. कुठल्याही विचार प्रवाहाशी व्यक्तीची बांधिलकी असू शकते. जोपर्यंत तुमच्या कलाविष्कारांनी समाजाचे नुकसान होत नाही, समाजात तेढ माजत नाही, असंतोष पसरविल्या जात नाही, तोपर्यंत कलाकृतीला आक्षेप घेण्याचे काही कारण असू नये. इथे तर सरकारने नेमलेल्या समितीनेच पुरस्काराची निवड,घोषणा केली आहे. म्हणजे सरकार स्वतः आमची चूक झाली, आमचा निर्णय चुकला हे कबूल करते आहे.सध्याचे अनेक मंत्री, अन् मुख्यमंत्री हे आधीच्या सरकारचा भाग होते हे विशेष! यावरून मंत्र्याच्या सामूहिक निर्णय क्षमतेवर, जबाबदारीवर आक्षेप घेता येतो. आता अनेक जण पुरस्कार वापसी करणार, समितीचे राजीनामे देणार.. हेही नाटक नेहमीचे. समितीच्या अध्यक्षांनी राजीनामा दिलेला नाही हे विशेष. म्हणजे समितीतच मतभेद आहेत.मग त्यांच्या आधी घेतलेल्या निर्णयावर विश्वास कसा ठेवायचा ही प्रश्न उरतोच. एकूणच हे पुरस्कार कसे दिले जातात,समिती सदस्यांच्या नेमणुका कोणत्या निकषावर होतात,अंतिम निर्णय कसे, कोणत्या निकषांवर घेतले जातात हेही आता तपासण्याची गरज आहे. पूर्वी जी नावे पुरस्कारासाठी घोषित व्हायची ती साहित्य वर्तुळात माहितीची,गाजलेली असायची.सहसा पुरस्काराबद्दल वाद होत नसत.पुरस्कार चर्चेचा विषय नसत. आता तसे नाही. पुरस्काराच्या देखील कहाण्या चर्चिल्या जातात! आता येत्या साहित्य संमेलनात या विषयावर काय भूमिका घेतली जाते हे बघावे लागेल.
कारण लाखो( आता करोडो) रुपये खर्चून साजरा होणाऱ्या या सोहळ्याने नेमके आतापर्यंत काय साध्य झाले,काय साध्य होते हा संशोधनाचा विषय. तेच ते कवी,तेच ते रटाळ परिसंवाद,ज्याचे पुढे काही होत नाही ते ठराव,अन् ठराविक राजकारणी पुढाऱ्यांचे वर्चस्व, हे अन् असेच चालते संमेलनात. ढासळत चाललेली वाचन संस्कृती,बंद होत चाललेली, झालेली दर्जेदार मासिके, जी मासिके उरली आहेत त्यांची ढासळलेली प्रकृती, पुस्तकं प्रकाशन व्यवसायाला आलेली मरगळ, विशिष्ट प्रकाशकांची मात्र चंगळ,लेखक, प्रकाशक, संपादक यांच्यातील झाकली मूठ स्वरूपाचे आर्थिक व्यवहार, लेखन स्वातंत्र्य, या व अशा विषयावर मात्र कुणाला चर्चा करावीशी वाटत नाही. आजकाल काही लिट फेस्ट चे आयोजन केले जाते. त्यात मात्र विविध विषयावर चर्चा,प्रश्नोत्तरे,संवाद होतात. ज्यांचा दर्जा चांगला असतो. आपल्याकडे सुध्दा साहित्य संमेलनाचे स्वरूप बदलायला हवे. त्यात विद्यार्थ्यांचा, भाषा संशोधकाचा,वाचकाचा सक्रिय सहभाग हवा.सरकारचे अनुदान मिळाले तरी ते त्यांचे कर्तव्यच असते असे समजून,त्याच्या सहभागावर, राजकीय लाभ घेण्यावर अंकुश हवा. त्यांनीच संमेलन हायज्याक करणे चुकीचे. त्या ऐवजी तरुण विद्यार्थ्यांचा, समिक्षकाचा, प्रकाशक, वाचकाचा सक्रिय सहभाग वाढायला हवा. लेखन स्वातंत्र्य, एकूणच अभिव्यक्ती स्वातंत्र्य हवेच कलाकाराला. त्यात तडजोड नको.
साहित्यातले अनेक प्रकार आज मागे पडत चालले आहेत. अनेक वर्षात गाजलेली, लक्षात राहणारी, काळजात घर करणारी कादंबरी वाचायला मिळालेली नाही. चांगल्या कवितांसाठी दिवाळी अंकांची वाट बघावी लागते. मासिके बंद पडल्याने नियमित चांगल्या कथाही वाचायला मिळत नाहीत. नाटकाच्या संहिता देखील प्रसिध्द होत नाहीत.प्रकाशकाचे गणित तर कळेनासे झाले आहे. त्यांचे ठराविक ठोकताळे असतात. जो प्रकार खपतो तोच ते प्रसिध्द करणार.तेही बहुतेक वेळा लेखका कडूनच निर्मितीचा खर्च घेऊन. आपल्याकडे कॉपी राईट, लेखकाचे स्वामित्व अधिकार, याकडे कुणी गांभीर्याने बघत नाही. ज्याचे नाव झाले आहे त्या मोजक्या लेखकांना तुटपुंजे मानधन मिळते.पण फक्त लेखनाच्या मानधनावर जगणे,संसार करणे,गाडी बंगला बांधणे शक्य नाही कुणालाच. प्रत्येकाची पोटा पाण्याची वेगळी सोय(नोकरी,व्यवसाय) असते. अर्थात याला काही अपवाद लेखक आहेत.. पण ते हाताच्या बोटावर मोजण्याइतके. कारण विषय वैविध्यपूर्ण असल्याने, शैलीमुळे त्यांची पुस्तके गाजतात. अशा लेखकांची साहित्यिक म्हणून गणना झाली नाही तरी त्यांना काही फरक पडत नाही. लेखकाला कसेही करून आपण लिहिलेले प्रसिध्द व्हावे याची घाई झालेली असते. त्याचा फायदा प्रकाशक घेतात.कारण लेखन हा धंदा नाही. तर प्रकाशन हा धंदा आहे.तिथे व्यवहाराचे गणित सांभाळावे लागते. एरवी वर्षानुवर्षे पुस्तकं गोदामात पडून राहिली तर त्याचा काय उपयोग?आता ऑनलाईन विक्री सुरू झाल्याने थोडी परिस्थिती सुधारली असली तरी ड्रेसेस, खानपान, शानशौक यात हजारोंची उधळपट्टी करणारा मराठी माणूस महिन्याला, वर्षाला किती रुपये पुस्तकं, (तेही मराठी), खरेदीसाठी खर्च करतात हे तपासून पाहिले पाहिजे. प्रकाशकाला सरकारी ग्रंथालय खरेदीवर अवलंबून राहावे लागते. तिथेही चिरीमिरी दिल्याशिवाय काम होते की नाही शंका आहे. समाज कल्याण विभागाच्या ग्रंथ खरेदीचे एक प्रकरण नुकतेच मीडियाने चव्हाट्यावर आणले आहे. विशिष्ट प्रकाशकांची ग्रंथ खरेदी, त्याच त्या प्रकाशकाच्या पुस्तकांना पुरस्कार हे चित्र दिसतेच आहे.



वृत्तपत्रांनी तर रविवार पुरवणी तून साहित्य आउट केले आहे. कथा, कवितांना आजकाल क्वचित स्थान मिळते. पूर्वी रविवार पुरवणी साहित्याने नटलेली असे. कोणती नवी पुस्तके वाचावी यासाठी पुरवणीत प्रसिध्द होणारे पुस्तकं परीक्षण मार्गदर्शक ठरायचे. आता पुस्तकं परीक्षण प्रसिध्द होण्यासाठी लेखक किंवा प्रकाशकाला वृत्त पत्राला पैसे द्यावे लागतात म्हणे!! संपादक मंडळी तर सातवे आसमानपर असल्या सारखी वागतात. लेखकाला निर्णय कळविण्याचे साधे सौजन्य देखील दाखवीत नाहीत. निदान स्वीकृत लेखनाबद्दल,प्रसिध्द झाल्याचे तरी कळवावे. पण तेही नाही. लेख प्रसिध्द झाल्याचे वाचका कडून कळते. लेखक, संपादक, प्रकाशक यांच्यातील हा कोरडेपणा अनाकलनीय आहे. पूर्वी ही मंडळी एकमेकांना सांभाळून घेणारी होती.कौतुक करणारी होती. अनेक संपादक नवे लेखक शोधत. त्याच्याकडून लिहवून घेत. प्रोत्साहन देत.आता आम्ही साहित्य प्रसिध्द करतो म्हणजे लेखकावर उपकार करतो अशी भावना दिसते. पूर्वी दिवाळी अंक म्हणजे साहित्याची मेजवानी असे. दर्जेदार कथा, काहीत नव्या कादंबऱ्या, उत्तम कविता वाचायला मिळत. आता दिवाळी अंक पायलीला पन्नास अशी फक्त संख्या वाढ झाली.दर्जा मात्र काही मोजके अपवाद सोडता, पार घसरला. इथेही अनेक संपादक मानधनाच्या बाबतीत ठेंगा दाखवतात. अगदी प्रतिष्ठित दिवाळी अंकाचे संपादकसुध्दा अपवाद नाहीत. डी टी पी वाला, प्रिंटर, चित्रकार, मुखपृष्ठ वितरक, मार्केटिंग यासाठी पैसे मोजतील. पण लेखकाला मात्र ठेंगा.. कुणाला हे अती वाटेल, विचित्र वाटेल. पण कटू सत्य आहे. साहित्य संमेलनात यावर चर्चा का होत नाही. लेखक,प्रकाशक, संपादक स्पष्टपणे आपापली बाजू का मांडीत नाहीत? तिथे तरी भी चूप मेरी भी चूप असे बोटचेपे धोरण.. असे का? आता तर साहित्य, नाटक, चित्रपट, मालिका यावर कुठल्याही कारणाने विरोध करून,त्याचे राजकारण करण्याचा नवा प्रघात सुरू झालाय. त्यासाठी मीडिया सोबतीला आहेच. कारण चर्चेसाठी त्यांनाही मसाला हवा असतोच. साहित्य क्षेत्रातील मग गट पडतात. भिंती उभ्या राहतात. समाज दुभंगला जातो. हे थांबायला हवे. निकोप समाजाला सुदृढ साहित्य व्यवहाराची गरज असते. कुठल्याही साहित्य कृतीला विरोध करण्याआधी त्यावर साधक बाधक चर्चा हवी. साहित्यात राजकारण नको. येत्या साहित्य संमेलनात या दृष्टीने काही पावले उचलली जातील, अध्यक्ष न्यायमूर्ती असल्याने न्याय करतील अशी आशा करू या.

## पहिली महिला अंतराळवीर कल्पना चावला

आधुनिक केसरी

**आज १ फेब्रुवारी, भारतीय वंशाची अमेरिकन अंतराळवीर कल्पना चावला यांचा स्मृतिदिन. २० वर्षापूर्वी त्यांच्या कोलंबिया या यानाला पृथ्वीवर परत येत असताना अपघात होऊन त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या सोबत सहा अंतराळवीरांचा चमू देखील होता त्यांचा देखील या अपघातात दुर्दैवी अंत झाला. कल्पना या अंतराळात जाणाऱ्या भारतीय वंशाच्या पहिल्या महिला अंतराळवीर होत्या . त्यांचा जन्म १७ मार्च १९६२ रोजी हरयाणातील कर्नाल येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव बनारसीलाल चावला तर आईचे नाव संयोगीता असे होते.**

त्यांच्या वडिलांचा औद्योगिक वस्तू निर्मितीचा व्यवसाय होता आणि आई गृहिणी होती. कल्पना चावला यांचे शालेय शिक्षण टागोर बाल निकेतन या विद्यालयात झाले. अभ्यासात हुशार असणाऱ्या कल्पना चावला यांनी १९८२ साली पंजाब विद्यापीठातून एरोनिटीकल अभियांत्रिकी पदवी मिळवली. त्यांनी १९८४ साली अमेरिकेच्या टेक्सास विद्यापीठातून एरोनिटीकल उच्च अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करून कोलोरॅडो विद्यापीठातून एरोस्पेस अभियांत्रिकी विभागातून १९८८ साली डॉक्टरेट पदवी प्राप्त केली. त्यांचे अंतराळवीर होण्याचे स्वप्न होते. ते पूर्ण करण्यासाठी त्या नासा या अमेरिकेतील अंतराळ संशोधन संस्थेत भरती झाल्या. १९८८ मध्ये त्यांनी नासातील एम्स रिसर्च सेंटर ओव्हरसेट मेथडसच्या उपाध्यक्षा म्हणून काम पाहिले. तिथे त्यांनी कॉम्प्युटीशनल फ्ल्यूईड डायनॅमिकमध्ये जागेवरच उभे उड्डाण आणि जमिनीवर उतरणे या विषयांवर संशोधन केले. त्यानंतर त्यांना ग्लायडर्स, सील्पेन्स तसेच एक किंवा अनेक इंजिन असलेली विमाने याच्या व्यावसायिक वैमानिकांना प्रशिक्षण देण्याचा परवाना मिळाला. १९९१ साली त्यांना अमेरिकेचे नागरिकत्व मिळाले. नागरिकत्व मिळाल्यावर त्यांनी १९९५ साली नासामध्ये अस्ट्रोनोट कॉर्प्स होण्यासाठी अर्ज केला. त्यांना त्यासाठी नासाने त्यांना प्रवेशही दिला. त्यांची मार्च १९९६ मध्ये पहिल्या उड्डाणासाठी निवड झाली. त्यांची पहिली अंतराळ मोहीम १९ नोव्हेंबर १९९७ रोजी चालू झाली. त्यांनी अंतराळात १०.६७ दशलक्ष किमी प्रवास केला. हे अंतर २५२ वेळा पृथ्वीला प्रदक्षिणा घालण्याऐवढे होते. कल्पना चावला यांना २००० साली त्यांच्या दुसऱ्या उड्डाणासाठी एसटीएस १०७



साठी देखील निवड झाली परंतु ही मोहीम तांत्रिक अडचणीमुळे लांबली जात होती. त्या १६ जानेवारी २००३ रोजी एसटीएस १०७ मोहिमेसाठी जाण्यासाठी कोलंबिया अंतराळ मोहिमेवर आल्या. या मोहिमेत कल्पना चावला यांना सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात प्रयोग करणे ज्यामध्ये ते आणि त्यांच्या चमुला ८० प्रयोग करावयाचे होते त्यात पृथ्वी आणि अंतराळ विज्ञान, अद्ययावत तंत्रज्ञान निर्मिती अंतरळवीरांचे आरोग्य आणि सुरक्षा या विषयांचा समावेश होता. आपली मोहीम फत्ते करून १ फेब्रुवारी २००३ रोजी हे अंतराळ यान कोलंबियाच्या टेक्सास येथे पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताना आणि जमिनीवर उतरताना दुर्दवी अपघात झाला. या दुर्दवी अपघातात कल्पना चावला आणि त्यांच्या चमुचा दुर्दैवी अंत झाला. त्यांच्या मृत्यूनंतर जगभर हळहळ व्यक्त करण्यात आली. त्यांना मरणोत्तर कॉंग्रेशनल स्पेस सेवा पदक, नासा स्पेस फ्लाईट तसेच नासा विशेष सेवा पदकाने गौरविण्यात आले. जगभरातील विविध विद्यापीठांनी त्यांच्या नावे विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्या जाहीर केल्या. ५ फेब्रुवारी २००३ साली भारताच्या पंतप्रधानांनी हवामान विषयीच्या उपग्रहाला कल्पना १ हे नाव दिले. त्यानंतर सोडण्यात आलेल्या उपग्रहालाही कल्पना २ हे नाव देण्यात आले. हरियाणा सरकारने कल्पना चावला यांच्या नावाने ज्योतिसार, कुरुक्षेत्र येथे प्लेनेटेरियम सुरू केले. नासाने सुपर कॉम्प्युटरला कल्पना चावला यांचे नाव दिले. कल्पना चावला यांनी आपल्या धैर्य, चिकाटी, जिद्द आणि बलिदानाने देशाचे नाव उज्ज्वल केले. कल्पना चावला या आज आपल्यात नसल्या तरी त्यांच्या स्मृती आजही आपल्या मनात कायम आहे. कल्पना चावला यांचे कार्य आजच्याच नाही तर येणाऱ्या पिढीसाठीही प्रेरणादायी आहे. पहिल्या महिला अंतराळवीर कल्पना चावला यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# कोंडिबा टोपणनावाच्या कोणत्या करामती ?




श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**राजा नीळकंठ बढे हे संपादक, चित्रपट अभिनेते, गद्य लेखक, नाटककार, कादंबरीकार, कथाकथनकार आणि गायक असले तरी त्यांची खरी ओळख मराठी कवी आणि गीतकार अशीच होती. या विदर्भाच्या माणिक-मोतीविषयी त्यांच्या जयंतीप्रित्यर्थ अलककार- श्री कृ. गो. निकोडे गुरूजींचा माहितीपूर्ण व प्रेरक लेख वाचकांच्या सेवेत. राजाभाऊ बढे यांचे त्यांच्या बकुल नावाच्या मोठ्या भावावर अतोनात प्रेम होते. भाऊ वारल्यावर त्यांनी धाडिला राम तिने का वनी या नाटकातले घाई नको बाई अशी, आले रे बकुळफुला हे गीत रचले होते.**

मुंबईतील कवी राजा बढे चौक त्यांच्या नावावर आहे. नागपूरच्या महाल पेठेतील सीपी ॲन्ड बेरार महाविद्यालयासमोरील चौकासही राजा बढे यांचे नाव दिले आहे. महाराष्ट्राचा प्राचीन राजा हाल सातवाहन यांच्या काव्यांचे संकलन असलेल्या गाथा सप्तशतीचा मराठी अनुवाद हा राजा बढे यांच्या लेखनाची अत्युच्च कार्यसिद्धी समजली जाते. राजा नीळकंठ बढे यांचा जन्म दि.१ फेब्रुवारी १९१२ रोजी विदर्भात नागपूर येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण छिंदवाडा येथे तर माध्यमिक शिक्षण नागपूरच्या टिळक विद्यालयात झाले. सन १९३५मध्ये त्यांनी पंजाब विद्यापीठातून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली. पुढची पाच वर्षे अशीतशीच घालवून त्यांनी पुण्याच्या दैनिक सकाळमध्ये उमेदवारी केली. एका वर्षानंतर ते नागपूरला परतले. नागपूरच्या दैनिक महाराष्ट्रमध्ये ते वर्षभर सहसंपादक होते. त्याचवेळी राजा बढे हे नागपूरच्या बागेश्वरी मासिकाच्या संपादक मंडळात होते. तिथून निघून बढे यांनी साप्ताहिक सावधानमध्ये मावकर-भावे यांच्याबरोबर काम केले. दरम्यानच्या काळात ते नागपूरच्या एका कॉलेजात दाखल झाले. सन १९३९ साली बीएच्या वर्गात असताना त्यांनी कॉलेज सोडून दिले. ते पदवीधर झाले नाहीत. मात्र कॉलेजमध्ये असताना त्यांनी कोंडिबा या टोपणनावाने बरेचसे स्फुटलेखन केले. आई-वडिलांच्या निधनानंतर मोठा भाऊ म्हणून लहान भावंडांची जबाबदारी पालनपोषण यांतच सर्वस्व मानून राजा बढे स्वतः अविवाहित राहिले.

राजा बढे हे सन १९५६ ते १९६२ या कालखंडात आकाशवाणीवर निर्माता म्हणून काम करीत होते. या नोकऱ्यांच्या धरसोडीत त्यांचे कॉलेजशिक्षण राहून गेले. मुंबई आकाशवाणीवरच्या नोकरीनंतर त्यांनी आकाशवाणीला छोटे छोटे माहितीपट करून दिले. चित्रपटात काम करावे, या विचाराने ते सन १९४० साली पार्श्वनाथ आळतेकर यांच्याकडे गेले. त्यांचे शिष्यत्व पत्करून त्यांनी त्यांच्या सिरको फिल्म्समध्ये दोन वर्षे उमेदवारी केली. व्हॉईस कल्चरचे धडे त्यांनी आळतेकरांकडून घेतले. दोन वर्षांनी ते नागपूरला परतून प्रकाश स्टुडिओमध्ये रुजू झाले. बंधू बबनराव यांच्या मदतीने त्यांनी स्वानंद चित्र ही संस्था उभी केली आणि रायगडचा राजबंदी हा संभाजी महाराजांच्या जीवनावरील चित्रपट काढला. राजा बढे यांना संस्कृत काव्याचा आणि उर्दू शायरीचा गाढा अभ्यास होता. तरीही त्यांच्या कवितेतील भाषा बोजड नव्हती. गीत, गझल याप्रमाणेच चारोळी हा रचनाप्रकार त्यांनी हाताळला. कोंडिबा हे टोपण नाव वापरून



काही राजकीय वात्रटिका त्यांनी लिहिल्या. मुंबईच्या विविधवृत्तात त्या प्रकाशित होत असत. स्वातंत्र्यवीर सावरकर हेच त्यांचे दैवत होते. त्यांचे राष्ट्रप्रेम त्यांच्या क्रांतिमाला-१९५२ या संग्रहातून वेळोवेळी दिसून येते. त्यात २१ कविता आहेत. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील देशभक्तिपर गीते आहेत. प्रत्यक्ष सावरकरांनी प्रस्तावनेत- आपण स्वतःच नामवंत, सुप्रतिष्ठित प्रतिभासंपन्न साहित्यिक असल्याने माझ्या प्रस्तावनेची गरज नाही, असे गौरवोद्गार काढले होते. कथाकथनाचे कार्यक्रम आज सर्वत्र होतात, त्याचे खरे बीज रोवले राजा बढे यांनीच. सन १९६४ साली मुंबईत त्यांच्या पुढाकाराने प्रथमच कथाकथनचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात पु.ल.देशपांडे, ग.दि.माडगूळकर यांनी प्रथमच त्यांच्या कथा कथन केल्या होत्या.

बढे यांची अनेक गाणी रेकॉर्ड झाली होती. अशावेळी जेव्हा प्रकाश पिक्चर्सच्या सावरकरांकडे राम-राज्य चित्रपटासाठी गाणी लिहिण्याची मागणी केली, तेव्हा त्यांनी ती चटकन मान्य केली होती. दिल्लीला असताना राजा बढे यांचा दि.७ एप्रिल १९७७ रोजी अकाली मृत्यू झाला.

!! जयंती सप्ताहात राजा बढे यांना व त्यांच्या हरहुन्नरी कर्तबगारीस मानाचा मुजरा !!

# 'लकी चार्म' सोनाक्षी सिन्हा आता छोट्या पडद्यावर



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**सोनक्षी बॉलिवूडमध्ये फारशी यशस्वी ठरलेली नसली तरीही तिच्या नावावर काही हिट चित्रपट आहेत. परंतु अलिकडच्या काळात ती बिगबजेट चित्रपटांमध्ये दिसून आलेली नाही. खूप दिवसांनी सोनाक्षी सिन्हा 'निकिता रॉय एंड द बुक ऑफ डार्कनेस' या चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटाद्वारे तिचा भाऊ कुश सिन्हा फिल्मी दुनियेत पाऊल ठेवत आहे. सोनाक्षी सिन्हा मागील काही काळापासून झहीर इक्बालसोबतच्या रिलेशनशिपवरून चर्चेत आहे. झहीर अन् सोनाक्षीने अलिकडेच स्वत:च्या या प्रेमाच्या नात्याची जाहीर कबुली दिली आहे.**

झहीर हा एका ज्वेलर्सच्या कुटुंबाशी संबंधित असून सलमान खानचा तो चांगला मित्र आहे. झहीरने स्वतःचे बॉलिवूड पदार्पण सलमान खानचा चित्रपट 'द नोटबुक'द्वारे केले होते. झहीर आणि सोनाक्षी आता 'डबल एक्स एल' या चित्रपटात एकत्र दिसून आले आहेत. तिने दबंग' 1 आणि 2 बरोबरच 'राउडी राठोड' ,'सन ऑफ सरदार', 'आर राजकुमार' यासारखे सुपरहिट चित्रपट दिले आहेत. या चित्रपटात आधुनिकता आणि रेट्रो लुक यांचं अफलातून मिश्रण सोनाक्षीने सादर केलं. मात्र या चित्रपटांमध्ये ती फक्त शोभेची बाहुली म्हणूनच वापरली गेली. अभिनय तिच्या वाट्याला आलाच नाही.

सोनाक्षी सिन्हा अमेजन प्राइम वीडियो च्या दहाड़ या वेब सीरिजमधून ओटीटी मध्ये पदार्पण करणार आहे. बर्लिन इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्ये दहाड़चा प्रीमियर होणार आहे. या चित्रपट महोत्सवात प्रीमियर होणारी ही पहिली भारतीय वेब सिरीज आहे. दहाड ही आठ भागांची गुन्हेगारी मालिका आहे. ही कथा राजस्थानमधील एका छोट्या शहरावर बेतलेली आहे. सोनाक्षी सिन्हा सब इन्स्पेक्टरच्या भूमिकेत आहे. सोनाक्षीने स्थानिक पोलीस उपनिरीक्षक अंजली भाटी यांची भूमिका केली आहे. सार्वजनिक शौचालयात अनेक महिलांचा रहस्यमयरीत्या मृत्यू झाल्यामुळे प्रकरणाचा तपास अंजलीकडे जातो. सुरुवातीला हे मृत्यू आत्महत्येचे वाटतात, पण जसजसे प्रकरण पुढे सरकते तसतसे अंजलीला सीरियल किलरचे असल्याचे जाणवते. यानंतर पोलिस आणि मारेकरी यांच्यात मांजर आणि उंदराचा खेळ सुरू होतो.

सोनाक्षी सिन्हाचा चित्रपट प्रवास आश्चर्यकारक आहे. एसएनडीटीमधून फॅशन डिझायनिंगचा कोर्स केल्यावर तिला या विषयाची इतकी गोडी लागली की तिने याच क्षेत्रात झोकून द्यायचं पक्कं केलं. काही फॅशन ब्रॅंडसाठी रॅम्प वॉक केला. 'मेरा दिल लेके देखो' या चित्रपटासाठी कॉस्च्युम डिझायनर झाली. या क्षेत्रात वावरत असताना अचानक तिला अरबाज खान भेटला. त्यांना 'दबंग'साठी नायिका हवी होती. आणि सोनाक्षी सिन्हा मध्ये त्याला अपेक्षित नायिका सापडली. मात्र याच सोनाक्षी सिन्हाला चित्रपटात यायसाठी तब्बल तीस किलो वजन कमी करावं लागलं. पण ते सिन्हानं केलं. चित्रपट हिट झाला आणि सोनाक्षीचं नाणं चाललं.

सोनाक्षी लहानपणी फार मस्तीखोर होती. बंदुकीसारखी तेजतर्रार होती. स्विमिंग, व्हॉलीबॉल, टेनिस, फुटबॉल अशा बऱ्याच खेळात तिचा वावर होता. लव-कुश या आपल्या जुळ्या दोन भावांसोबत तिची खूप मस्ती चाले. मारामारी चालायची. शाळा-कॉलेजमध्ये तिच्या नादाला कोणी लागायचे नाही. अगदी टॉमबॉईश होती. त्यामुळे तिची आई- पूनम सिन्हा नेहमी म्हणायची,' हिच्यात मुलीचा एकही गुण शोधूनही सापडत नाही. सुरुवातीला सोनाक्षीला खेळाडू व्हायचं होतं. पण नंतर डिझायनिंग आवडायला लागलं आणि आता अभिनय.

पण तिचे चित्रपट गाजले असले तरी तिच्या अभिनयाची झलक मात्र अजून कुठल्या चित्रपटात दिसली नाही. विशेष म्हणजे सोनाक्षीच्या कारकिर्दीत 'दबंग' ची तुलना अन्य कुठल्याही तिच्या चित्रपटाशी होऊ शकली नाही. या चित्रपटातील ' थप्पड से डर नहीं लगता साब,प्यार से लगता है' या तिच्या डॉयलॉगने अक्षरशः धुमाकूळ घातला. तरीही या



चित्रपटात तिच्या वाट्याला फारच कमी दृश्य आली. 'दबंग' हा पूर्णतः सलमानमय होता. 'दबंग 2' मध्ये तर तिचे अस्तित्वच नव्हते. काहीजण म्हणतात की, 'दबंग' मुळे हिंदी चित्रपट सृष्टीला देशी ठसक्याची नायिका मिळाली. ग्लॅम-डॉलसच्या गोतावळ्यात साडी आणि सलवार कमीजमधली सोनाक्षी 70-80 च्या दशकातल्या नायिकांची आठवण ताजी करत एक नवा ट्रेंड सुरू करू पाहत होती. त्यात तिला बऱ्यापैकी यश मिळालं सुद्धा. मात्र अभिनय तिच्या वाट्याला आलाच नाही. म्हणजे या चित्रपटांमध्ये तो नव्हताच. निव्वळ मनोरंजन हाच या चित्रपटांचा उद्देश. अक्षय कुमार, अजय देवगण, शाहिद कपूर, सलमान खान यांच्या प्रभावशाली देमार चित्रपटांमध्ये सोनाक्षीचा सहभाग नायकाची प्रियेसी आणि नाचण्या -गाण्यापुरताच होता. मात्र चित्रपटांनी करोडोंची कमाई केल्याने 'लकी चार्म' ठरवत तिचं ' मिस 100 करोड' असं नामाकरण झालं होतं.

महत्त्वाचं म्हणजे तिची लक्षात राहावी, अशी भूमिकाच नाही. 'वन्स अपॉन अ टाइम इन मुंबई' मध्ये बऱ्यापैकी महत्त्वाची भूमिका मिळूनही तिला स्वतःचा प्रभाव पाडता आला नाही. ज्या रेट्रो लुक मुळे तिच्याकडे कौतुकाच्या नजरा वळल्या, त्या लुकचा तिच्याच चाहत्यांना कंटाळा येत चालला. अशा वळणावर सर्वसाधारणपणे शरीरप्रदर्शन ,बोल्ड दृश्यं, चुंबन दृश्यं याचा आधार घेण्याचा प्रयत्न केला जातो.मात्र या गोष्टीला सोनाक्षी बळी पडली नाही. त्यामुळे तिच्या कारकिर्दीला नायकाचाच भक्कम टेकू लागतो, हे स्पष्ट झालं. विशेष म्हणजे तिला नायकही तसेच भेटले.

स्वतःच्या बळावर चित्रपट चालवा, असा तिचा प्रयत्न झाला,पण तो अयशस्वी झाला. 'लुटेरा' काही चालला नाही. मात्र तिच्या पाखी या बंगाली मुलीच्या भूमिकेचे कौतुक झालं. 'इसी बहाने क्यूँ ना मैं भी दिल का हाल जरा संवार लू...' अशी सुरेल साद घालत एकीकडे आजारपण आणि अपयशी प्रेम याच्याशी झुंजत हेलकावे खाणारी सोनाक्षीचा पाखी हावभाव, दिसणं, वावरणं, संवादफेक सर्वच बाबतीत उजवी होती. खरे तर अभिनयासाठी नावाजले जाणं कलाकारांच्या आयुष्यात अतिशय महत्त्वाचं असतं. दीपिका पादुकोण, प्रियांका चोप्रा, विद्या बालन, आलिया भट्ट आदींसाठी खास संहिता लिहून घेतली जाते, चित्रपटांचा डोलारा स्वतःच्या खांद्यावर वाहून नेण्यासाठी या नायिका सज्ज असतात. याचं गांभीर्य सोनाक्षीच्या कारकिर्दीत अभावानेच बघायला मिळालं.

'अकिरा', 'नूर', 'हॅप्पी फिर भाग जायेगी' आणि 'खानदानी शफखाना' हे तिन्ही चित्रपट सोनाक्षीच्या व्यक्तिमत्त्वाभोवती फिरत होते. पण समीक्षा आणि तिकीटबारी दोन्हीपैकी एकवरही हे चित्रपट चमकली नाहीत. ॲक्शन आणि कॉमेडी या तिच्या आवडत्या शैलीतील चित्रपट असूनही त्यात प्रेक्षकांना वेगळेपण आढळलं नाही.

'बुलेटराजा', 'तेवर', 'ॲक्शन जेक्शन', 'वेल कम टू न्यू यॉर्क' ,'फोर्स 2', 'इत्तेफाक' अशा चित्रपटातून सोनाक्षीचा फायदा तर झाला नाहीच,पण उलट अपयश पदरी पडून ती मागे खेचली गेली. करण जोहरचा 'कलंक' सुद्धा तिला फायद्याचा ठरला नाही. 'मिशन मंगल'ला यश मिळालं असलं तरी या चित्रपटाचे श्रेय कुणा एकाला जात नाही. या चित्रपटात अक्षय कुमार, विद्या बालन हे कलाकार होते. यापुढच्या काळात सोनाक्षीला अभिनय करायला मिळायला हवा,तरच ती या क्षेत्रात टिकून राहणार आहे. आगामी चित्रपट आणि वेबसिरीजमध्ये तरी तो दिसून यायला हवा.

# युवा पिढीने चांगल्या कार्यात शौर्य आणि चमकोगिरी दाखवावी

आधुनिक केसरी

सद्या मोबाईलने सर्वांनाच वेड लावले आहे असे म्हणायला हरकत नाही कारण अलिकडेच रिल बनवून सोशल मीडियावर पोस्ट करण्याचे फॅड चांगलेच वाढले आहे कोण कशाची रील बनविल यांची खात्री देता येत नाही अनेकजण थरार अनुभवत रिल शूट करीत असल्याचे दिसते अशीच एक दुर्दैवी घटना शाळकरी मुलांच्यावर बेतली आहे पाथरी तालुक्यांतील डाकूपिंप्री येथे प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी एकाच दुचाकीवरुन चार विद्यार्थी जात असताना वाटेत त्यांनी रिल बनवणे सुरु केले असताना त्यांच्या वेगात असणाऱ्या दुचाकीला अज्ञात वाहनाने धडक दिली यामध्ये काहीजण गंभीर जखमी झाले तर काहींना प्राण गमवावा लागला इयता नववीमध्ये शिकणारी अल्पवयीन मुलांचा अपघाती जखमी अथवा निधन होणे ही घरच्यांसाठी खूप वेदनादायी असून हृदय पिळवटून टाकणारी घटना आहे चित्रपट असो अथवा मालिका हे बनवत



असताना दिग्दर्शक सहाय्यक, डमी, सुरक्षेची साधने घेवुन साहसी दृश्य चित्रित करतात हि गोष्ट नजरेआड करुन तरुण - तरुणी चमकोगीरीच्या नादात असल्या घटनांना बळी पडतात यावरुन लहान मुलांच्या हातात मोबाईल तत्सम सोशल माध्यमांचे किती डोक्यात फॅड गेलेलं आहे हे काळीज हेलावणाऱ्या घटनेवरुन दिसून येत आहे आणि यामुळे अपघात कसे घडतात याच दुसरं उदाहरण म्हणजे परभणी येथे एक चमुकला मोबाईल पाहत विहिरीत पडला होता त्यानंतर हा दुसरा अपघात झाला आहे अशा घटना देशभर घडत असतात याला अटकाव कधी बसणारं ? याचं मात्र उत्तर अनुत्तरीत आहे त्यामुळे कुठं तरी पालकांनी मोबाईलच्या अनुषंगाने मुलांवर नियंत्रण ठेवणे गरजेचे वाटते शिवाय मुलांच्या हातात वाहन देत असताना त्यांचं वय काय आहे आणि ही वाहने चालवताना वाहतुकीच्या कोणकोणत्या नियमांचे उल्लघंन करतात याकडेही पालक,पोलिस,परिवहन विभाग, सजगतेने लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे या अपघाताच्या निमित्ताने पुन्हा एकदा समोर आले आहे !

**राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

# देशात हर घर संविधान साक्षरतेची गरज



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**देशात "हर घर तिरंगा" हा नारा देत भारतीय स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यात आले. हर घर तिरंगा हा उपक्रम घेण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतल्याने त्यास सर्वच स्तरातून चांगला प्रतिसाद मिळाला. शासन प्रशासन स्तरावरून तसेच अनेक सामाजिक संघटना आणि विविध पक्षाचे राजकीय पदाधिकारी नेते मंडळी यांच्या कडून सुद्धा जनतेपर्यंत तिरंगा पोहचविण्यासाठी विशेष प्रयत्न ही करण्यात आले होते.**

विविध जाती धर्माची लेबले लागलेल्या नागरिकांमध्ये भारतीय अमृत महोत्सवी वर्षात भारतीय असल्याचा एक अनोखा भाव जागृत झाला. देशाबद्दलचं प्रचंड असे प्रेम ओसंडून वाहताना पाहायला मिळाले.हेच प्रेम आता आपल्याला आपल्या संविधाना प्रति म्हणजेच आपल्या बुद्धीत संविधान रुजवून व जागृत करून घेण्याची वेळ आली आहे.संविधान टिकेल तरच आपले हक्क अधिकार टिकणार आहेत.त्यामुळे संविधानाबाबत साक्षरता निर्माण करून घेणे गरजेचे आहे.संविधानानुसार या देशात कोणत्याच शक्तींना किंवा हुकूमशाहीला हुकूमत गाजविता येणार नाही.ही लोकशाही असली तरी इथे हुकूमशाहीचे अस्तित्व निर्माण होता कामा नये.याचीच काळजी आपल्याला घ्यावी लागणार आहे.हे संविधानच ह्या हुकूमशाहीस ब्रेक लावू शकते.त्यामुळे आपल्याला आपले संविधान हे लोकांपर्यंत घेऊन जाणे गरजेचे बनलेले आहे. आजच्या परिस्थितीत संविधानास बगल देत संविधानाच्या विरोधात कामकाज केले जात आहे.इथे लोकशाही आहे असे म्हणतच संविधानाचे उल्लंघन होत आहे.हे आजच्या परिस्थितीकडे पाहिले तर नक्कीच याची जाणीव होत आहे. ज्या संविधानाने आपल्याला हक्क आणि अधिकार मिळवून दिले. त्या संविधानास प्रति आव्हान देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न होत आहे.संविधानानेच आपल्याला माणूस म्हणून जगण्याचे आणि त्याच बरोबर त्यास स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्याचा अधिकार मिळवून दिला आहे.परंतु या अस्तित्वालाच नष्ट करण्याचे प्रयत्न होऊ लागलेले आहेत.देशाचा राष्ट्रध्वज तर प्रत्येकाच्या घरात तर गेलाच गेला. परंतु त्याच राष्ट्रध्वजासोबतच हा देश लोकशाही प्रधान देश आणि हे संविधान मजबुत होण्यासाठी
घरोघरी संविधान जाणे अपेक्षित आज.संविधानाची साक्षरता करणे गरजेचे आहे. आपला राष्ट्रध्वज हा झोपडपट्टी पासून ते मोठ मोठ्या बंगल्यावर सुद्धा फडकला.आपला भारत देश, देशासाठी शहिद झालेल्या शुरवीर सैनिकांना मानवंदना देत असताना आपल्या राष्ट्रध्वजास आपण सलामी दिली. राष्ट्रध्वज हा आपला मान,सन्मान,अभिमान आहेच.राष्ट्रध्वजाप्रति प्रत्येक नागरिकामध्ये आदराची भावना असायलाच हवी.आपण स्वतःला भारतीय म्हणून घेण्यासाठी आपल्याला १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी या दिनाचीच वाटच पाहावी लागते. ह्या दोनच दिवशी अख्खा भारत देश हा भारतीय होतो. देशभक्ती,राष्ट्रप्रेम अगदी ओसंडुन वाहताना पाहायला मिळत असते. मग तद्नंतर प्रत्येक जण आपापल्या जातीत जाऊन बसतात.घरा घरावर ध्वज फडकला, राष्ट्रभक्तीचे गोडवे गायले गेले.हे सगळं झालं. परंतु आपली लोकशाही एखादा उपक्रम राबवून किंवा इव्हेंट्स घेतल्या सारखा करून देशाची लोकशाही मजबूत होणार नाही.
संविधानाचे महत्व आणि त्याची अंमलबजावणी प्रामाणिकपणे होऊन प्रत्येका मध्ये संविधानाची साक्षरता व्हायला हवी. आपला देश आणि आपल्या देशाचे भारतीयत्व हे एखाद्या उपक्रमा पर्यंतच मर्यादित न राहता त्यास व्यापक असे स्वरूप येणे आवश्यक आहे. जात, धर्म घेऊन पुन्हा द्वेष सुरूच राहणार असेल तर




हे आपल्या लोकशाहीस घातक ठरेल.खोटी देशभक्ती अंगात संचारलेल्या लोकांना तसेच देशविरोधी कामे करणाऱ्या लोकांना खऱ्या देशभक्तिचे काहीच देणे घेणे नाही.देशभक्तीचे ढोंग घेऊन जनतेला झुलवत ठेवण्याचे अनेक प्रकार आजही आपल्या देशात होत आहेत.
देशाबद्दल आम्हाला खरच प्रेम आहे का? देखावा आणि दिखावा करण्याची जी वृत्ती आमच्यामध्ये आज सुद्धा आहे.इव्हेंट पुरते राष्ट्रभक्तीचे धडे गिरवण्याचे प्रकार केले जात आहेत.लोकाना त्यातच अडकून ठेवले जात आहे.घरोघरी राष्ट्रध्वज फडकवून काहीच साध्य होणार नाही.इथे भारतीय संविधानाची मूल्ये सत्यात उतरविण्यासाठी संविधान घरोघरी पोहचविले पाहिजे. संविधानास अनुसरून जनजागृतीचा जागर करण्यासाठी पुढाकार अपेक्षित आहे. जात, धर्म,पंथ यांना बाजूला ठेवून केवळ भारतीयत्व म्हणून देशाला एकसंध ठेवणारी भूमिका हवी. देशातील सर्व जाती धर्मातील लोकांना एकत्र ठेवण्याच्या भूमिकेतून लोकांकरिता सकारात्मक निर्णय घेत त्यांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.अन्याय, अत्याचार, गुलामगिरी, हुकूमशाही
हे प्रकार संविधानास मान्य नाही. परंतु हे सर्व प्रकार आजही लोकशाही देशात घडत असताना राजकीय नेते सत्तेत येतात तेव्हा या प्रकारास आळा घालण्यास कोणत्याही उपाययोजना करत नाहीत. संविधानास ह्या गोष्टी मान्य नाहीत. परंतु संविधानाची अंमलबजावणी सत्तेत जाऊन स्वतःला हुकूमशहा समजणारी लोकं प्रामाणिकपणे करत नाहीत. सत्तेचा दुरुपयोग होतोय, सत्तेच्या चाव्या हातात असलेल्या लोकांच्या विरोधात आवाज उठविणे ही अवघड होऊन बसले आहे.नुसती बघ्याची भूमिका घेण्याची वेळ येऊ लागली आहे.सत्तेचा दुरुपयोग करत जे वाटेल ते करण्याची मानसिकता ही सत्तेतील लोकं करत आहेत.
आज अनेक कुटूंबांना जगायचे कसे म्हणून हा प्रश्न उपस्थित राहिलेला आहे.परिवर्तनाच्या दिशेने जात असताना इथल्या प्रत्येक घरामध्ये लोकशाहीचा उदय दिसायला हवा.धार्मिक मुद्दा घेऊन एका विशिष्ट धर्माचे राष्ट्रीयत्व करायला निघालेल्या लोकांना हे संविधान आणि ह्या संविधानाच्या मूल्यांची आठवण करून द्यावी लागणार आहे.भारतीय संविधान हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक आहे.एकीकडे ह्याच राष्ट्रीय एकात्मतेला बाधा येईल असे काम करायचे आणि दुसरीकडे मात्र आम्हीच खरे देश प्रेमी असल्याची प्रमाणपत्र वाटत बसायचे.सत्य आणि वास्तव जनतेसमोर मांडणाऱ्या लोकांना देशद्रोही घोषित केले जाते आहे.आजही अनेक वादग्रस्त विधाने करून धार्मिक द्वेषगिरी निर्माण करण्याचा प्रयत्न होत असताना अशा लोकांना मात्र खरे देशप्रेमी समजले जाते आहे.आज सत्तेचा दुरुपयोग करून मोठ्या राजकीय खेळ्या खेळल्या जात आहेत.पुढील पंचवार्षिक आपल्याच हातात कशी काय राहील,लोकांना कशात अडकून ठेवायचे यासाठी अनेक प्रकारचे उपक्रम हाती घेऊन जनतेला स्वतःच्या प्रश्नांपासूनच लांब ठेवले जाते आहे.प्रत्येक घरावर तिरंगा फडकुन देशातील जनतेच्या समस्या सुटू शकत नाहीत.त्यासाठी आपल्याला संविधानाची ताकतच जनतेपर्यंत घेऊनच जाणे गरजेचे आहे. आजही देशातील कित्येक लोकांना गरिबी, दारिद्र्य,बेरोजगारी, बेघर अशा परिस्थितीतून जावे लागत आहे.
आज भारतीय संविधानानुसार देशाचा राज्य कारभार पाहिला जात असला तरी ते संविधान प्रमाणिक पणे राबविणारी यंत्रणा स्वतःच्या सत्तेचाच दुरुपयोग करत आहे.त्यामुळे देशातील प्रत्येक नागरिकाला संविधान साक्षर करणे गरजेचे आहे.सत्तेवर बसलेल्या प्रत्येकास याची जाणीव असायला हवी की हे जे काही आहे.हक्क अधिकार आहेत ना हे सर्व भारतीय संविधानाने दिलेले आहेत.
आता हर घर तिरंगा पोहचला आता संविधान पोहचविण्याची वेळ आलेली आहे.देशातील खेडो पाड्यातून,शहर, गल्लो गल्लीतून संविधान साक्षरतेचा नारा द्यायला हवा.प्रत्येक घरामध्ये संविधान पोहचवून संविधान साक्षरता अभियान राबविणे हेच आपल्या खऱ्या खुऱ्या लोकशाहिस जिवंत ठेवू शकते.कारण हे संविधानच इथल्या प्रत्येक प्रश्नाला,जनतेच्या समस्यांना सोडविण्यास सक्षम आहे.प्रजासत्ताक म्हणजेच आपले संविधान आणि हेच संविधान इथल्या जनतेचे हित जपणारे आहे. हे हित अबाधित राहण्यासाठी हर घर संविधान जायलाच हवे.

# व्यसनाधीनता सामाजिक कीड

आधुनिक केसरी



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301


आदर्श हा पिढीदर पिढी वाढत असतो किंवा कमी होत असतो . विद्यमान पिढी पुढच्या पिढीला काय आदर्श देतो हे येणार्या पिढीच मुळ भागभांडवल असतं . भागभांडवल हेच भावी दिशा ठरवते .मग आपण आपल्या येणार्या पिढीला सुदृढ आरोग्या संपदा मानसिक स्थैर्य प्रदान करण्यासाठी निरोगी पिढीच्या निर्मिती मध्ये निर्व्यसनी समाज व्यवस्था हि मोठी उपलब्धता आहे. हि उपलब्धता निर्माण करण्यासाठी सगळ्यांचं योगदान असलच पाहिजे. आपण व्यसनाच्या आहारी जाऊन आपलं आयुष्य उध्वस्त व्हावं असं मनोमन कोणालाही वाटत नाही . स्वतःलाच खोटा धीर देत देत मनाचं खोटं खोटं समाधान करण्याच्या नादात आपण कधी मनाचे गुलाम होऊन व्यसनी होतो याचा थांगपत्ता लागत नाही. पत्ता लागल्यावर सुद्धा तिथुन बाहेर पडण्याची ताकद क्षमता आपल्या मध्ये उरत नाही.हि मात्र दुर्दैवी बाब आहे. चुकुन हुकुन जरी व्यसन जडल असलं तरी त्यांचं नियंत्रण आपल्यावर निर्माण होण्या अगोदरच त्याला नमस्कार करता आला पाहिजे. जर असं झालं नाही तर मग मात्र आपण गुलाम बनतो.एकदा का गुलाम झालो कि मग शिल्लक उरत काय. मर्यादा हाच प्रत्येक बाबीवर अंतिम उपाय असतो. मर्यादा पालन करा मर्यादित रहा कहीही अहितकारक होणार नाही. दैनंदिन जीवनावर मजबूत पकड घट्ट प्रभाव निर्माण करणारी बाब म्हणजे व्यसन. हेच व्यसन अनेक प्रकारच असल्याने  त्याचे काही परिणाम चांगले येतात तर काही परिणाम खूप वेदनादायक असतात. कुटुंब समाज आणि स्वतः व्यक्ती, पर्यायाने देश या सर्व घटकांवर एकाच वेळी प्रभाव करून कौटुंबिक सामाजिक व व्यक्तिगत स्वास्थ्य बिघडणारा एकमेव विघातक आजार व्यसनाधीनता हि किडच आहे एकदा लागली कि पर्याप्त नुकसान केल्या शिवाय नष्ट होत नाही. सामाजिक पातळीवर असतील अथवा कौटुंबिक पातळीवर व्यसनाधीनतेचे परिणाम हे विघातक असतातच. व्यसनाधीनता ही किड सहजासहजी दुर्लक्षित करून चालणार नाही. सामाजिक स्वास्थ्य टिकवून ठेवण्यासाठी ही किड मुळासह संपुष्टात येण गरजेच आहे. आयुष्याची, कुटुंबाची,समाजाची देशाची दुरवस्था होऊ देयची नसेल तर या भयानक किडी पासून आपल्याला आपलं स्वतःचं व आपल्या कुटुंबाचं संरक्षण करता आलाच पाहिजे.आणि संरक्षण करत असताना आपण व्यापक जनजागृती करत इतरांना सुद्धा यापासून दूर राहण्यासाठी जे जे काही शक्य होईल असं योगदान दिले पाहिजे. अज्ञान हेच कोणत्याही व्यसनाधीनतेच मुळ असतं. आपल्यावर आध्यत्मिक ज्ञानाचा प्रभाव असले ,सत संगत असेल .तसेच नियंत्रित मर्यादित जीवनशैलीचा अंवलब असेल तर कोणत्याही विघातक बाबीचा आपल्या जीवनशौलीवर व आपल्यावर फार काही उल्लेखनीय परिणाम होणार नाही तसंच यत्किंचितही आपलं अहित होणार नाही.दैनदिन जीवन जगत असताना सुख दुःखांच्या सीमारेषेवर असणार्या प्रत्येक बाबीचा आनंद घेत असताना किंवा दुःखांचा अघात झेलताना मनाला दुबळ करुन व्यसनाच्या आहारी जाऊ देऊ नये हिच आध्यत्मिक ज्ञानाची शिकवण आहे. जीवनातील अनेक बाबी आपल्या मनाविरुद्ध घडल्या तरी सुद्धा आपण आपलं जीवन प्रभावित होऊन वाम मार्गाने जाऊ दिलं नाही पाहिजे तसेच कोणत्याही व्यसनाचा आधार न घेता स्वतःला मजबूत केल पाहिजे.पण विद्यमान परस्थिती मध्ये समाजात जी व्यसनाधीनता वाढली आहे. त्याकडे सुद्धा दुर्लक्ष करून चालणार नाही उलटपक्षी प्रत्येकाने लक्ष देवून हे प्रमाण कमी कस करता येईल. आणि शेवटी व्यसनाधीनता संपुष्टात कशी येईल यासाठी प्रयत्न करण गरजेचे आहे.हि प्रत्येकाची राष्ट्रीय जबाबदारी आणि कर्तव्य आहे. चांगल्या सवयी लावा, चांगली संगती करा वाईट लोकांचा विचारांचा प्रभाव आपल्यावर होऊ न देता स्वतःला सदैव सकारात्मक ज्ञान मार्गावर असु तर सर्व विकारांवर प्रभावी उपाय असुन कोणतही व्यसन आपल्या आजूबाजूला फिरकणार नाही जर आपण स्वतःला सदैव सकारात्मक ज्ञान मार्गावर मार्गस्थ ठेवलं तर आपण आपला बचाव व्यसनाधीनतेपासुन करू शकतो.

# आठवणीतील पाटील

आधुनिक केसरी


**पूर्वी गाव हे कुटुंब असायचे. पाटील हे गावाचे कुटूंबप्रमुख असायचे. पाटील ही एक पदवी आहे. पाटीलकी ही काही एवंविशिष्ट जातीपूरती मर्यादित नव्हती. वंशपरंपरेने पाटीलकी थोरल्या मुलाकडे असायची. न्यायपूर्ण वर्तणूकमुळे अनेक पाटील हे इतिहासात अजरामर झाले.पाटलाचे व्यक्तिमत्व उदारमतवादी असायचे. त्यांचे राहणीमान रुबाबदार असायचे.**

पांढरशुभ्र धोतर, परीटघडीचा पांढराशुभ्र कुर्ता,



डोक्यावर लालजरीचा फेटा, पायात काळा बूट एकंदरीत त्यांचे राहणीमान प्रभावशाली व दिमाखदार असायचे. बोलताना शब्दात व आवाजात दरारिपणा असायचा. गावाचे प्रमुख या नात्याने गावातील सुख दुःख ते स्वतः चे मानीत. गावाचा विकास, गरिबाच्या अडीअडचणी याची जाण त्यांना असायची. गावात मंदिरे, शाळा बांधण्यात पाटलाचा प्रामुख्याने सहभाग असायचा. पंचक्रोशीत पाटलाचे नाव सर्वांना माहीत असायचे. पाटलाचे व्यक्तिमत्त्व हे आदर्श असायचे. निर्व्यसनी, प्रमाणिकपणा, सदविवेक बुद्धी यांचा समुच्चय त्यांचा वागण्यातून दिसून येत असे. राजा तशी प्रजा त्याप्रमाणे स्वतःचे व्यक्तिमत्व जेवढे सुदंर व चांगले राहील याचा ते व्यक्तिगत प्रयत्न करायचे. चांगल्या विचाराची समाजभान ची समाजसेवेची शिकवण ही त्यांच्या वाडवडीलकडून त्याच्यात रुजवली जायची. पाटलाच्या वर्तणूकिवर त्या गावाचें मूल्यमापन होत असे. त्यामुळे पाटलावर एक प्रकारची सामाजिक जाणिव लहानपणापासून त्यांच्यावर होत असे. गावातील महसूल आणि फौजदारी आशा दोन्ही वर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी पाटलावर असायची. गावातील लग्नसमारंभ जत्रा अगर कोणताही सण पाटलाचा मान पहिला असायचा. गावात कोणी नवीन व्यक्ती आला तर पहिली खबर पाटलाला जायची. गरिबाच्या अडचणी समजावून घेणे त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणे वेळेप्रसंगी स्वतः आर्थिक व इतर मदत करणे कोणतीही अपेक्षा न ठेवता उदारमताने पाटील मदत करायचे. गावावर कोणतेही संकटं आले ते निवारण करण्यात पाटलाचा मोठा वाटा असायचा. गावातील भांडण तंटे हे पाटलाच्या मदतीने सोडवत असत. त्यात न्याय निवडायची प्रमुख भूमिका पाटलाला करावी लागायची. पाटलाचा शब्द हा अंतिम शब्द असायचा. तो निर्णय सर्व जण पाळायचे. गावातील भाडणे वेशीच्या बाहेर जात नसत.

पाटलाचा वाडा चिरेबंदी मोठा असायचा त्यात आड, लादण्या, परसअंगण, तुळशीवृंदावन, बैठक असायची. बैठकीत सतत वर्दळ असायची. पाटील बैठकीत बसलेकी कमीत कमी पाच सहा गावातील माणस त्याच्या सोबत गप्पा मारत बसलेले असायची. चहा, जेवण पाटलासोबत पाटलाच्या घरीच होत असत.
पाटलाच्या मुला मुलींना सुद्धा लहानपणा पासून आदर्श राहणीमान ठेवण्याची त्यांच्या घरातूनच




संस्कार होत असत. पाटलाची पत्नी होणे हे मोठे प्रतिष्ठेचे व मानाचे स्थान असायचे. पाटलाच्या पत्नीला पाटलीणबाई म्हणायचे. पण पाटलीणबाई फक्त नावाच्या म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण सकाळी 5 वाजल्यापासून ते रात्री 10 वाजेपर्यंत फक्त राबराब राबणे फक्त आणि फक्त कष्ट त्यांच्या अंगी असायचे. घरी नेहमी 10 माणसे बाहेरचे जेवण्यास असायचे. त्यांचा स्वयंपाक करायचा, भांडी धुणी भरपूर कामे घरीच असत. कारण घरकामाला ग्रामीण भागात मजूर त्यावेळेस भेटत नसत. त्यावेळेस आता सारख्या घरात फरश्या नसायच्या. सर्व खोल्या सारव्याच्या, झाडून घेईच्या अशी बरीच कामे स्वतः ला करावी लागत. शेतात काम करणारे मजूर सालकरी यांच्या जेवणाची व्यवस्था पाटलीणबाई ला करावा लागायची. त्यांचा स्वयंपाक करून वेळेवर शेतात पाठवण्याची जबाबदारी त्यांच्यावर असायची. घरी शेतात रखवाल करण्यासाठी कुत्रे पाळत त्यांना पण भाकरी करून पाठवावे लागत. दूध दुपते याची देखभाल त्यांनाच करावी लागत. त्यातून सवड मिळाली तरच देवदर्शन व कोणाच्या घरी कार्यक्रम असेल तर जाणे गरजेचे असायचे. पाटलीणबाई ह्या स्वतः शेतात पूर्ण लक्ष द्यायच्या त्यामुळे पाटलाला गावाचा कारभार पाहण्यास वेळ मिळत असे. पाटलाचे व्यक्तिमत्त्व चतुरस्त्र असायचे. काळा नुसार ग्रामीण भागातील व्यक्ती चे राहणीमान बदलत गेले आहे. वतनदार पाटील याचे प्रमाण कमी झाले आहे. नविन प्रशासकीय बदलामुळे शासकीय मानधनावावर पाटलाची नेमणूक करण्यात येत आहे. पण पूर्वीच्या पाटलाची आत्ताच्या पाटलांची बरोबरी होणे अशक्य आहे. पाटीलकी ही रक्तात व संस्कारातून होत असते.

**– प्रमोद कुलकर्णी, मुंबई.**
**संवाद- 7249205507**

# हभप साहेबराव बापू काळे: संतांचे विचार पोहचविणारे कीर्तनकार

आधुनिक केसरी

**वैकुंठवासी कीर्तनकार हभप साहेबरावबापू काळे यांना न कळत्या वयापासून अनुभवता आलं, बघता आलं, आमच्या घरी बाबासंमवेत तासनतास आध्यात्मिक आणि विविध विषयांवर त्यांच्या मैफिली मला न कळत्या किशोरवयीन वयात ऐकता आल्या. आणि त्या वयात देखील हभप वैकुंठवासी साहेबराव बापू काळे यांच्या विद्वतेचे दर्शन मला वेळोवेळी झाले. प्रख्यात,नामवंत कीर्तनकार म्हटलं की त्यांच्या ताब्यात असलेली भली मोठी चार चाकी गाडी, किमान 50 हजारांपासून तर लाखापर्यंतचे मानधन, त्यांच्या कीर्तनाची होणारी जाहिरातबाजी, कुणाचा वाढदिवस अथवा पुण्यस्मरण, अथवा निवडणुका जवळ आल्या की, लोकांची गर्दी जमविण्यासाठी केल्या गेलेले कीर्तनाचे आयोजन, हे असलेच चित्र आजकाल सर्वत्र दिसते आहे.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

"माणूस जन्माला रिकाम्या हाताने येतो आणि जातांना देखील तो रिकाम्या हाताने जातो" हे तत्वज्ञान वेगवेगळे आध्यात्मिक दाखले देऊन कीर्तनातून सांगणारा महाराज ऍडव्हान्स पैसे घेतल्याशिवाय कीर्तनाला येत नाही, हे आजचे चित्र असतांना देखील त्या काळात मिळेल त्या वाहनाने, बैलबंडी ने अथवा मोटारसायकलवर जाणारे हभप साहेबरावबापू काळे हे व्यक्तिमत्वच आगळं वेगळं होतं. सहा साडे सहा फुटाची उंची, कपाळावर शोभून दिसणारं चंदन,डोक्यावर त्यांना शोभणारा फेटा, उंचपुरा बांधा,धष्टपुष्ठ शरीरयष्टी,देखणं रूप. गोरा रंग,तितकेच चेहऱ्यावर तेज, त्यांचं साधं बोलणं किंवा गप्पांची महफील देखील किर्तनासारखी लाघवी आणि अभ्यासपूर्ण असायची. त्यांचे कीर्तन खेड्यापाड्यातील अशिक्षित,शेतकरी,मजूर वर्गासह उच्चशिक्षित लोकांना देखील भावणारे असेच होते. जीवनाचे तत्वज्ञान कीर्तनाच्या माध्यमातून सांगतांना त्यावेळी वेगवेगळ्या दृष्टांताच्या माध्यमातून कीर्तनाला आलेल्या भाविकांना ते खिळवून ठेवायचे. अवघड अभंगाचा अर्थ अधिआकधिक साधा सरळ करून सांगण्याची त्यांची हातोटी जगावेगळी होती. कमालीचे वक्तृत्व, प्रचंड विदवत्ता, कीर्तनाची आगळी वेगळी शैली,कीर्तन करत असतांना ते स्वतः तर कीर्तनात दंगुण जात मात्र उपस्थित जनसागराला देखील ते दंगवून सोडत. सोबतीला टाळ वाजविणारे, भजन म्हणणारे सहकारी यांना देखील ते दमवून टाकत. कीर्तनात ते स्वतः एव्हडी पाऊली खेळायचे की, लोकं देखील उठून उभे राहत पावली खेळायला लागायचे आणि त्यावेळी किर्तनाने एक वेगळीच उंची गाठलेली असायची.लोकं तल्लीन होऊन पाऊली च्या ब्रम्हनादात गुंग होऊन जायची.त्यावेळी हभप साहेबराव बापू जणू काही समाधी अवस्थेत गेल्या सारखे स्वतः देखील हरवून जात आणि हरिनामात गुंग होऊन जातं होते. अलीकडचे कीर्तनकार स्वतःचे अंग कधी हलवत नाहीत,पूर्वी सारख्या पाऊल्या आता कीर्तनात बघायला मिळत नाहीत.

वास्तविक महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. या वैचारिक भूमीला सुपीक बनविण्याचे महत्त्वाचे योगदान हे वारकरी संप्रदायाचे आहे.वारकरी संप्रदायाने समाजाला वैरभाव विसरायला लावत समता शिकविली,बंधुभाव शिकविला.

**उच्चनीच काही नेणें भगवंत, विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म| भेदाभेद भ्रम अमंगळ**

हा एकतेचा विचार दिला. हाच एकात्मतेचा संदेश हभप साहेबराव बापू काळे यांनी समाजाला दिला. कीर्तनाला त्यांनी कधी 'व्यवसाय' होऊ दिलें नाही. त्यांच्या कीर्तनात शरीराला ब्रम्हरुप करण्याचे सामर्थ्य होते. साहेबराव बापू काळे हे तपस्वी होते. कीर्तनातून ते लोकांच्या ह्रदयाचा अचूक ठाव घ्यायचे. त्यांनी कधी स्वतःची दवंडी पिटवून घेतली नाही. त्यांना व्यावसायिक होता आलं नाही. आणि स्वतःभोवती त्यांना कधी आरती ओवाळून घेता आली नाही.वास्तविक हभप साहेबराव बापू काळे यांनी जर नोकरी केली असती तर ते मोठ्या हुद्यावरून ते सेवानिवृत्त झाले असते.१९२० चा जन्म असलेल्या साहेबराव बापू यांचे शिक्षण त्या काळातील दहावी. ज्या काळात 7 वा वर्ग झाला की शिक्षक म्हणून नोकरीवर लागता येत होतं. त्या काळात त्यांना सेकंड लेफ्टनंट म्हणून त्यांचे नामांकन झाले होते.त्यांना ट्रेनिंग साठी सातारा पाठविल्या गेले होते.त्याकाळी इंग्रजाकडील



नोकऱ्या सोडून लोकं परत येत होती.स्वातंत्र्याच्या लढ्याने चांगलाच जोर पकडला होता.आणि आपण इंग्रजाच्या हाताखाली काम करायचे नाही म्हणून ते परत आले.पिंपळगाव उंडा ह्या गावात जन्मलेले हभप साहेबराव बापू काळे यांचे शिक्षण ब्रम्हपुरी, साखरखेर्डा आणि नंतर नागपूर येथे झाले होते.

**देवाची पूजा हे भुताचे पाळण|मत्सर तो सीण बहुतांचा||**
**रुसावे फुगावे आपुलियावरी|उरला तो हरी सकळ ही||**
**तुका म्हणे संतपण या चि नावे|जरी होय जीव सकळांचा||**

या पठडीतले ते संत होते.इतरांचा जीव तो आपला जीव अस त्यांचं वर्तन होतं. इतरांना दोष न देता प्राणीमात्रांचं पालन करणं, हीच त्यांची देवपूजा होती. हभप बी जे लाकडे सर यांच्या सारखे पदव्युत्तर शिक्षण घेतलेले कीर्तनकार, रा ना पवार सारखे शिक्षण तज्ञ, हभप सरकटे गुरुजी, अशी कैक नावे आहेत की जे साहेबराव बापू काळे यांना गुरुस्थानी मानत. वारकरी महामंडळाचे राज्य अध्यक्ष असलेले हभप प्रकाशबुवा जवंजाळ यांच्या सारखे सुज्ञ,अभ्यासू कीर्तनकार,हभप शिवाजीराव ठेंग,हभप हाडे गुरुजी अशी कैक कीर्तनकार,ज्यांनी आध्यात्मिक चळवळ जिवंत ठेवली, संतांचे विचार समाजापर्यंत जे पोहचवत आहेत अशा किर्तनकारांनी त्यांचा आदर करत होते.शिक्षण व नोकरी सोडल्यानंतर अडतदार झालेले आणि तब्बल 12 वर्ष अडती चा व्यवसाय केल्यानंतर हभप साहेबराव बापू काळे आध्यात्मिक क्षेत्राकडे वळले आणि निस्वार्थपणे सेवा करत अनेकांचे संसार त्यांनी उभे केले, अनेकांना व्यसनापासून दूर करत त्याच्यात आध्यात्मिक गोडी निर्माण केली. कीर्तनाच्या माध्यमातून समाजात गोडवा पेरत असतांना समाजप्रबोधनाचे काम केले.लोकांना अंधश्रदा न दाखवता सश्रद्धता शिकविली. 89 वर्षाचे आयुष्य ठणठणीतपणे जगलेल्या बापुनी 2009 साली हे जग सोडले. त्यांना जाऊन आज तब्बल 14 वर्षाचा कालावधी झाला पण आज देखील अभ्यासू आणि निस्वार्थ कीर्तनकार म्हणून साहेबराव बापू काळे यांचे नाव आध्यात्मिक क्षेत्रात आदराने घेतल्या जाते.त्यांचा कीर्तनाचा वारसा आज त्यांचे नातू नेत्रतज्ञ डॉ विकास बाहेकर हे चालवत आहेत. नेत्रतज्ञ असलेले आणि वैद्यकीय क्षेत्रात नावलौकिक असलेल्या त्यांच्या या नातवाने खऱ्या अर्थाने त्यांचा हा कीर्तनाचा व अध्यात्माचा वारसा चालवला आहे,हे याठिकाणी विशेष उल्लेखनीय.

परंतु ज्या परिस्थितीत हभप साहेबराव बापू काळे यांनी कीर्तनाच्या माध्यमातून समाजसुधारणेचा वसा घेतला होता,त्या निस्वार्थ सेवेचा वारसा आजच्या तथाकथित नामांकित किर्तनकारांना चालवता आला तरच खऱ्या अर्थाने संतांच्या विचारांची जपणूक होईल.

# बंदा रुपाया

आधुनिक केसरी



सौ आरती राजाराम
परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

राहणं, गणवेश, दोन वेळचे जेवण, कशासाठी पण पदरमोड करावी लागत नाही निदान वेळेत ती ही मोजकीच फी !... काय रे " वेळेत शाळेची फि भरयाला जमणार आहे का? तुमच्या वडीलांना आजच्या आज निरोप दिला आहे..... नाही तर परिक्षेला बसू देणार नाही मी .... हेडमास्तरांच्या आवाजाने मुलं कावरीबावरी झाली पण जगदेवच्या डोळ्यातून धारा सुरू झाल्या....

"जगदेव नागू कातकरी" सावळा ,नाकी डोळी नीटस,तरतरीत आठवीतला मुलगा ! तालुक्याच्या शाळेत शिकायला म्हणून आपल्या मित्रांसोबत तिथंच वसतीगृहात राहत होता.

तालुक्याच्या जवळच्या पाड्यावर च्या मुलांच्या शिक्षणाची परिस्थिती फारच विदारक होती. शासकीय आश्रम शाळेत कातकरी मुले टिकतच नसत. अगदी फारच कमी मुले असायची. आई-वडील वीट भट्टीवर काम करणारे, एका ठिकाणाहून दुसरीकडे जाणारे, व्यसन करणारे, त्यामुळे मुलांच्या शिक्षणाची आबाळ होत असे. हे सगळं असताना जगदेवला मात्र शिक्षणाची ओढ होती. शाळा शिकून मोठं व्हायचं होतं.....

हेडमास्तरांनी निरोप दिल्यामुळे जगदेव चे वडील पाड्यावरच्या दोघा तिघांबरोबर आले त्यांना फी भरण्यासंदर्भात सांगितले व चार दिवसांनी होणाऱ्या परीक्षेला बसू देणार नाही हे पण सांगितलं पेक्षा बजावलं... मास्तरांचं बोलणं खाली मान घालून मुकाट पण ऐकून घेत सगळी मंडळी निघाली पण जगदेवच्या वडिलांची पावलं परत फिरली आणि मास्तरांना म्हणाली जरा दों दिस पोरग्याला वस्तीवर नेवू का? तसे मास्तर म्हणाले आहो चार दिवसांवर परीक्षा आहे. तुम्ही नेण्याच्या काय गोष्टी करतायं...... कसंनुसा चेहरा करत हातापाया पडत पोरग्याची मायला लय सयं येतेयं तींन हातरूण धरलयं......असे कारण सांगून नागूने जगदेवला घरी नेण्याची परवानगी मिळवली. जगदेव पण खुश झाला, मायची भेट होईल,या आनंदात बरोबर जायला निघाला. दोन डोंगराच्या मधून असलेल्या पाऊलवाटा तुडवत दोघ बाप लेक निघाले.... साधारण सात आठ किलोमीटर चालल्यावर वस्ती दिसू लागली. तोपर्यंत संध्याकाळ झाली होती. मिणमिणत्या दिव्यात खोपटात चुलीपुढं बसलेली आई दिसताच जगदेव पटकन तिच्या कुशीत शिरला... हात पाय धुऊन येणाऱ्या बापाकडे बघत मायनं पाणी भरून लोटी दिली. तबकडीत नागलीची पेज प्यायला दिली.तेवढयात तालुक्याच्या ठिकाणची माणसं वस्तीवरील प्रत्येक घरात जाऊन चौकशी करत मदत देतायत तुझ्या खोपटात येतील हे सांगता नागूचा मित्र जानू आला.....

टकुऱ्यागणिक मदत म्हणून पाचशे रुपये, डाळ, तांदूळ, ज्वारी अशी मदत द्यायला ती माणसं येत होती.तशी नागूला कुणकुण लागल्याने त्याने जगदेवला शाळेतून आणलं होतं आई आजारी आहे सांगून ......त्याला पंधराशे रुपये मिळाले होते. पैसै मिळताच त्याला विटभट्टीवाला मालक आठवला !आती जगदेवला मास्तर आपल्या फिचा प्रश्न तरी सुटला ह्या विचाराने डोळे लकाकले.... त्यानं भितभितच बापाला मास्तरांच्या फिबद्दल बोलण्याची आठवण करून दिली. नागूच्या डोक्यात विटभट्टीचा धूर तर जगूच्या परिक्षेचा हॉल..... भट्टीवाला मुस्काड फोडेल ...दोन हजाराऐवजी पंधराशे?.... पाचशेसाठी हातापाया पडू ! जगू हे अडीचशे मास्तरांना दे, पुढच्या महिन्यात बघू असं सांग ! त्याला निरूत्तरीत करत झोप आता बघू सकाळी..

परिक्षेच्या फीचा विचार करत करत झोप लागली....तांबडा फुटायच्या आधीच जगू उठला. पाड्याशेजारच्या दामले काकांच्या शेतात रताळ्याचे पिक जोमाने उगवलं होतं.... जगूने अंधारातच भराभरा रताळी उपसली. जवळपास वजनात दहापंधरा किलो भरली असती.ते रताळ्याचे ठिकं घेऊन तालुक्याच्या गावात काळ्यापिवळी वाल्याला दोन किलो रताळी देऊन पोचला देखिल.... वसतीगृहाच्या आसपासच्या घरात दोन, तीन, पाच, एक

**क्रमशः**

# निवृत्तीनंतर मुदतवाढ नकोच



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**राज्यातील वाढती बेरोजगारी ही मोठी समस्या आहेच यात दुमत नाही.सोबतच सरकारी नौकऱ्या सुध्दा अल्पशा आहेत त्यामुळे या स्पर्धेच्या युगात त्या मिळणे दिवसेंदिवस कठीण होत आहे. अशा परिस्थितीत सरकारी अधिकारी किंवा कर्मचारी यांना मुदतवाढ (एक्स्टेंशन) देणे म्हणजेच बेरोजगारीला नव्याने आमंत्रण दिल्या सारखे होईल.**

सरकारी कर्मचारी किंवा अधिकारी निवृत्त होण्याच्या एक वर्ष अगोदरच ती जागा भरायला हवी जेणेकरून नवीन व्यक्ती निवृत्त होणाऱ्या व्यक्ती पासून संपूर्ण कामकाज शिकु शकेल. अशाप्रकारे निवृत्त होणाऱ्या व्यक्ती पासून कोणत्याही सरकारी कामात अडथळा किंवा अडचणी निर्माण होणार नाही याचीही पुर्वतयारी संबंधित विभागाची असायला हवी. त्याच पध्दतीने नवीन व्यक्तीला तयार करणे अत्यंत गरजेचे असते.आपण जर नवीन व्यक्ती तयार करणार नाही तर जुन्या लोकांची मनमानी अवश्य दिसून येईल व संबंधित विभागाला नाईलाजास्तव त्या कर्मचाऱ्यांना किंवा अधिकाऱ्यांला निवृत्तीनंतर मुदतवाढ द्यावीच लागेल ही पध्दत बंद होणे गरजेचे आहे.निवृत्तीनंतर आठव्यांदा मुदतवाढ (एक्स्टेंशन) दिल्याची घटना दैनिक लोकमत, मुंबई दिनांक ४ जानेवारी २०२३ च्या वृत्तपत्रात निदर्शनास आली.

मुख्यमंत्री कार्यालयात महासंचालक"वॉर रूम-पायाभूत सुविधा प्रकल्प" म्हणून राधेश्याम मोपलवार यांच्या नियुक्तीला उच्च न्यायालयात जनहित याचिकेव्दारे आव्हान देण्यात आले आहे. कायद्यातील प्रक्रियांचे पालन न करताच मोपलवार यांना आठव्यांदा मुदतवाढ दिल्याचा आरोप याचिकेव्दारे करण्यात आला आहे. ही याचिका आझाद समाज पार्टीचे महासचिव क्रांतिलाल सहाने यांनी ॲड.तोसीफ शेख यांच्या व्दारे उच्च न्यायालयात दाखल केली आहे. मोपलवार यांची नियुक्ती करतांना सरकारने कोणतीही प्रक्रिया राबविली नसल्याचा दावा याचिकेव्दारे करण्यात आला आहे. मोपलवार यांची मुदतवाढची नियुक्ती योग्य की अयोग्य हे कायद्याच्या चौकटीतून ठरेल. परंतु निवृत्ती नंतर आठ वेळा मुदतवाढ सरकारने किंवा संबंधित



विभागाने दिली ही दुर्भाग्यपुर्ण बाब आहे. यदा कदाचित मोपलवार यांची नियुक्ती नियमांच्या चौकटीतून सुध्दा होवू शकते याला सुध्दा नाकारता येत नाही. परंतु राज्यात अधिकारी व ऑफिसर लेव्हलचा मोठा शिक्षित युवा वर्ग राज्यात असतांना पुन्हा-पुन्हा मुदतवाढ देणे योग्य नाही असे मला वाटते. अशा पध्दतीची मुदतवाढ सुरूच रहाली तर महाराष्ट्रातील प्रत्येक सरकारी कर्मचारी किंवा अधिकारी वर्ग मुदतवाढ मागू शकते याला नाकारता येत नाही. ही बाब त्यांच्यासाठी वावडी सुध्दा ठरणार नाही. त्यामुळे सरकारी क्षेत्रात कर्मचारी किंवा अधिकारी यांची मुदतवाढ सरकारने बंद करावी असे मला वाटते. परंतु हे नियम सुरक्षा विभागाकरीता बंधनकारक नसावेत. कारण सुरक्षा विभागात काम करणारा कर्मचारी किंवा अधिकारी यांची मुदतवाढ ही अत्यंत महत्त्वाची आणि गोपनीय असते. महाराष्ट्र सरकारला विनंती करतो की सरकारी कर्मचारी किंवा अधिकारी यांना मुदतवाढ नकोच यामुळे बेरोजगार युवक व सर्वसामान्यांमध्ये रोष निर्माण होवू शकतो.त्यामुळे सरकारी कर्मचारी किंवा अधिकारी यांच्या मुदतवाढीचे प्रावधान कायद्यामध्ये असेलही यात दुमत नाही. परंतु त्यात सुधारणा करून निवृत्तीनंतरची मुदतवाढ बंद करावी यामुळे बेरोजगार तरुणांना रोजगार मिळण्यास मोठी मदत होईल व नवीन परिवारामध्ये आपल्याला खुशीचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येईल.



डॉ. ज्ञानेश्वर मुळे

# जागतिक मराठी संमेलन, 'शोध मराठी मनाचा'

आधुनिक केसरी

**जागतिक मराठी अकादमीचे 18 वे जागतिक मराठी संमेलन 'शोध मराठी मनाचा' या कार्यक्रमाच्या उद्घाटन सोहळ्याचे उद्घाटक आणि महाराष्ट्राचे लाडके नेते आदरणीय श्री. शरदचंद्रजी पवार साहेब, सन्माननीय अतिथी, साहित्य रसिक मा. श्री. सुशीलकुमारजी शिंदे, जागतिक मराठी भूषण पुरस्कार 2023 चे मानकरी मा. प्रमोद चौधरी, माझे मित्र श्री. मोहन आगाशे, मा. भाई जयंत पाटील, मा. हितेंद्र ठाकूर, मा. नागराज मंजुळे, मा. अरुण फिरोदिया, मा. हणमंतराव गायकवाड, देश विदेशातील निमंत्रित, कलाकार, कवी, साहित्यिक, या भव्य कार्यक्रमाचे निमंत्रक, स्वागताध्यक्ष, डॉ. पी. डी. पाटील, अध्यक्ष रामदास फुटाणे, सचिन ईटकर, बंधू भगिनी, सर्वांना अभिवादन!**

सर्वप्रथम या संमेलनाच्या अध्यक्षपदाचा सन्मान दिल्याबद्दल मी आयोजकांचा मनःपूर्वक आभारी आहे. सध्याच्या काहीशा गोंधळाच्या, काहीशा दिशाहीन अशा वातावरणात जगभरातील मराठी व्यक्तींना एका छताखाली आणण्याचं शिवधनुष्य दरवर्षीप्रमाणे या वर्षीही आयोजक पेलत आहेत; ही अभिनंदनीय गोष्ट आहे. या संमेलनाचा आवाका प्रचंड आहे. गीत, संगीत, नृत्य, सिनेमा, आरोग्य, चित्र, शिल्प, साहित्य, शिक्षण, व्यंग, राजकारण अशा अनेक प्रांगणातील 'मार्तंड जे तापहीन' ते या ठिकाणी जमले आहेत. एका अर्थाने सर्व क्षेत्रातील तेजाची बेटे या ठिकाणी उपस्थित आहेत.

हे 'जागतिक संमेलन' आहे आणि संमेलनाचे मुख्य सूत्र 'शोध मराठी मनाचा' हे आहे. या निमित्ताने काही प्रश्न समोर येतात. 'मराठी मनाचा शोध घेता येईल का?' ते तर ब्रह्मदेवालाही कळणार नाही. शिवाय शोध घ्यायचा कसा? कोण घेणार? या आधी कुणी असा शोध घेतला होता का? मुख्य म्हणजे अशा शोधाला लागणारे पर्यावरण आज महाराष्ट्रात आहे का? आपण आपल्या बलस्थानांचा अभिमान बाळगतो तर मग वैगुण्यांवर पण मोकळेपणाने बोलता येईल का? आजचे आपले राजकारण, समाजकारण, अर्थकारण अशा मनमोकळ्या संवादाला पूरक आहे का? मराठी माणूस 'जागतिक' दृष्टी बाळगून आहे का? इस्रायल मधला मराठी, तंजावरचा मराठी, पानिपत रोहतक मधला मराठी, अमेरिकेतला मराठी आणि कोल्हापूर आणि नागपूरचा मराठी वेगवेगळा की एकच? जागतिक मराठी कुणाला म्हणायचे? या जागतिक मराठी अकादमीने 1991 ला पुलंच्या अध्यक्षतेखाली आणि 1996 साली इस्रायलमध्ये प्रभाकर देवधरांच्या अध्यक्षतेखाली संमेलन पार पाडले. त्यानंतर 2004 पासून जवळ जवळ नियमितपणे झालेली संमेलने विदेशात सोडा, देशातसुद्धा महाराष्ट्राच्या सीमेबाहेर गेली नाहीत. मला वाटतं वेळ आलेली आहे. पुढचं संमेलन राज्यबाहेर घेऊ या. जमलंच तर देशाबाहेर घेऊ या. तसं केलं नाही तर मराठी पाऊल पुढं पडणार तरी कसं? आजच्या घडीला महाराष्ट्राला खरंच कशाची गरज असेल, तर ती राष्ट्रीय दृष्टिकोन आणि जागतिक दृष्टिकोन यांच्यासह मराठी मातीत पाय घट्ट असलेल्या मराठी मनाची. अशी मनं नेमकी कशी तयार करता येतील, याचा शोध म्हणजे जागतिक मराठी मनाचा शोध. राजर्षी शाहूंचं वर्णन 'उत्तम माणसं पेरण्याचं आणि त्यांचं पीक घेण्याचं काम करणारा राजा' असं आम्ही कोल्हापूरकर करतो. गांधीजींनी एकेकाळी राष्ट्रीय पातळीवर ते काम केलं. आजच्या काळात ते काम आपण कसं करायचं या शोधकार्यालाच मराठी मनाचा शोध म्हणता येईल. या शोधाचा पहिला भाग म्हणजे महाराष्ट्राचे आणि मराठी माणसाचे राष्ट्रीय पातळीवर आणि प्रादेशिक पातळीवर नेमके स्थान कोणते आहे, याचा थोडक्यात मागोवा घेणे.

महाराष्ट्र राज्याची निर्मिती आणि नव्या सीमारेषा मराठी प्रदेशाचा संकोच करणाऱ्या ठरल्या, ही वस्तुस्थिती आहे. आजही न सुटलेला महाराष्ट्र - कर्नाटक प्रश्न हे त्याचे फक्त एक उदाहरण आहे. पण या पलीकडची वस्तुस्थिती जाणून घ्यायची असेल तर मराठी माणूस मोठ्या संख्येने कुठे आहे, तेही पाहणे गरजेचे आहे. मराठा साम्राज्याबरोबरच 17-19 व्या शतकात मराठी माणसाचा अवकाश वाढला. सत्ताधाऱ्यांबरोबरच त्याकाळात सर्वसामान्य मराठी माणसाचेही मोठ्या प्रमाणात स्थलांतर केले. होळकर, शिंदे, गायकवाड, पवार आणि पेशवे यांच्या मागोमाग लष्करातले लोक, व्यापारी, बलुतेदार, भटजी आणि अन्य लोकही बाहेर गेले. भारतभर मराठी माणसांची वस्ती वाढत गेली. आजही याच्या ठळक खुणा बडोदा, इंदूर, ग्वाल्हेर, बुंदेलखंड, तंजावर, पानिपत, सोनिपत, इथे दिसतात. पानिपत युद्धानंतर बलुचिस्तानमध्ये युद्धकैदी म्हणून नेले गेलेले हजारो मराठे आजही 'बुगटी' मराठी म्हणून ओळखले जातात. हे पाकिस्तानमधील मराठे आजही 'आईला' आईच म्हणतात. इतकेच काय 'मराठा या तो मारता है, या मरता है।' हा हिंदी डायलॉग या समाजात लोकप्रिय आहे. त्यांचे विवाहही मराठी रिवाजाप्रमाणे होतात.

प्रश्न असा आहे की महाराष्ट्राबाहेरच्या या मराठी माणसासाठी महाराष्ट्राने काय केले? दिल्ली, कानपूर, हैदराबाद, बेंगलोर या सर्व ठिकाणी मराठी माणसांची संख्या विपुल आहे. ती सहज लाखोंच्या घरात आहे. पण स्वातंत्र्यानंतर आणि विशेषतः महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर महाराष्ट्राने या बांधवांकडे दुर्लक्षच केले, असे नव्हे तर त्यांच्यावर अन्याय केला आहे. या सर्व मराठी लोकांची संख्या दोनेक कोटी सहज असावी. या मराठी माणसाची भाषा, संस्कृती, इतिहास आणि महाराष्ट्राशी असणारी नाळ टिकवण्यासाठी महाराष्ट्राने काय केले आहे ? दिल्लीत शंभर वर्षांचा इतिहास असलेली नू. म. विद्यामंदीर आहे. तिथले सातशे आसनांचे नाट्यगृह मोडकळीस आले आहे. एकेकाळी तिथं बृहन्महाराष्ट्राच्या अंतिम फेरीतील नाट्यस्पर्धा होत असत. तिथं फिरता रंगमंच आहे. आता या शाळेत मराठी शिक्षक आहेत, पण शिकायला विद्यार्थी नाहीत. तुलनेनं तेलगू, तमीळ, आणि कन्नड शाळांमध्ये गर्दी तर आहेच पण या शाळा अत्याधुनिक सोयींनी युक्त आहेत. मी जशी या मराठी शाळेला भेट दिली आहे तशीच कानपूरमधल्या मराठी शाळेला भेट दिली. आजही तिथं मराठी मुलं शिकताहेत. पण मराठी ऐवजी हिंदी शिकताहेत. तमीळनाडूमध्ये तंजवारसह आसपासच्या जिल्ह्यांमध्ये लाखो मराठी राहतात. तंजावरचं मराठी बोलायला आणि ऐकायलाही मधूर आहे. उदा. 'याची किंमत काय?' हे विचारतांना तंजावरचा मराठी 'येजड मोडल् केवडे ?' म्हणून विचारेल. पण आज या मराठीला आणि तिथल्या पूर्वाश्रमीच्या राजघराण्यातील छत्रपतींच्या वंशजांनाही अनेक आव्हाने असली तरी महाराष्ट्राचे तिथे अजिबात लक्ष नाही. अलीकडच्या काळात पानिपतमध्ये उभारलेल्या छोट्याशा स्मारकाशिवाय अन्यत्र अनेक ऐतिहासिक स्थळांवर महाराष्ट्राची आठवण देणारे फलक किंवा स्मारक दिसत नाही. झाशीची राणी, तात्या टोपे, वगैरेंचे पुतळे त्या त्या राज्यांनी उभारले आहेत, पण अनेकांना या व्यक्ती मूलतः मराठी आहेत याची कल्पनाही नाही. त्या भागात छत्रपती शिवजींचा इतिहास आजही अगदी अल्प असा आणि तोही मुगल साम्राज्याच्या संदर्भात शिकवला जातो. सांगलीतील विटा, आटपाडी भागातून हजारो लोक देशभराच्या प्रमुख शहरांमध्ये सोने वितळवण्याचे काम करत असतात. ही सगळी मंडळी सर्वसामान्य कुटुंबातून आलेली असली, तरी स्वतःच्या दुष्काळी भागातील त्यांचे आर्थिक योगदान फार मोलाचे आहे. त्यांना आपण सन्मान देऊ ना देऊ, त्यांची नोंद तरी घेऊ या. अशा प्रकारे महाराष्ट्राबाहेरच्या मराठी माणसाला उपेक्षित ठेवणे हे हेतुपुरस्सर झाले नाही, तर एकंदरीतच महाराष्ट्र आत्मकेंद्री आणि अंतर्मुख झाल्यामुळे अशी उदासीनता आली आहे.

**अध्यक्षीय भाषणाचा सारांश**

जे महाराष्ट्राबाहेरच्या बृहन्महाराष्ट्राचे तेच अनेकार्थांनी विदेशातल्या मराठी माणसांचे. साधारणतः 1830 पासून 1920 पर्यंत अनेक मराठी लोक शेतमजूर म्हणून मॉरीशस, फिजी, द. आफ्रिका व पूर्व आफ्रिका या देशात गेले. पण ते उत्तर भारतीय भोजपुरी प्रदेशातून गेलेल्या जनतेच्या तुलनेने कमी होते. मॉरीशस सोडल्यास इतरत्र ही मराठी मंडळी बऱ्यापैकी इतर भारतीयांच्यात मिसळून गेली. मॉरीशसमध्ये आजही एक लाखापेक्षा जास्त मराठी भाषक, महाराष्ट्राची संस्कृती, लोककला, लोकगीते, व परंपरा महाराष्ट्रातील जनतेपेक्षा अधिक तळमळीने जपून ठेवत आहेत. या कार्यक्रमालाही तिथून गोविंद असन्त हे माझे मित्र आले आहेत. याशिवाय स्वातंत्र्यानंतर मराठी भाषक ज्यू मोठ्या प्रमाणात इस्रायलला गेले. आज त्यांची संख्या 80 हजाराच्या आसपास असून तिथल्या भारतीयांमध्ये त्यांची संख्या सर्वाधिक आहे. गेल्या काही दशकांमध्ये मराठी माणूस जगभरात विशेषतः अमेरिका, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, कॅनडा, जपान आणि तुरळक प्रमाणात इतरत्रही दिसतो. या मराठी माणसांशी थेट संपर्क महाराष्ट्र सरकारही करत नाही आणि मराठी जनताही. इतर भारतीय समूहांच्या तुलनेने मराठी माणूस विदेशातही शिस्तप्रिय, कष्टाळू, शिक्षित, गुन्हेगारीपासून अलिप्त व स्थानिक समाजात उत्तम प्रकारे मिसळूनही स्वतःची मराठी ओळख टिकवून ठेवत आहे. पण हेही खरे, भारतीय समुदायांच्या उदा. गुजराती, केरळी, पंजाबी, तेलगू, तमीळ, भोजपूरी, मध्य प्रदेशी या प्रादेशिक समूहांच्या तुलनेत मराठी माणसांची संख्या कमी आहे. याची कारणं अनेक आहेत. केरळ, आंध्र प्रदेश, तेलंगणा, पंजाब, इत्यादी राज्यांमध्ये एन.आर.आय. मंत्री आहेत आणि विदेशातील व्यक्तींना मदत करण्यासाठी विविध योजना आहेत. हे मंत्री नियमितपणे विदेशात आपल्या प्रदेशातील नागरिकांना भेटतात. त्यांचे प्रश्न सोडवायला मदत करतात. त्या राज्यात गुंतवणुकीसाठी राज्य सरकार त्यांना प्रोत्साहन देते. महाराष्ट्र याबाबतीत उदासीन आहे. आखाती देशात कामासाठी जाणाऱ्या 65% भारतीयांचे मुंबईहून उड्डाण होते. पण त्यात मराठी माणूस 5% ही नसतो. बहुतेक सगळे नोंदणीकृत व अवैध भरती एजंट अमराठी आहेत. विदेशातील मराठी लोकांना मराठी पाठ्यपुस्तके, महाराष्ट्र सरकारची मदत, नियमित सांस्कृतिक कार्यक्रम मिळाले तर त्यांचा मराठी भाषा व महाराष्ट्र दोहोंशी संपर्क वाढेल.

क्रमशः



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# कविमनाचे यथार्थ काव्यरूप :'प्रतिबिंब'

आधुनिक केसरी

**कविता "म्हणजे वाचकांचा आवडता लेखन प्रकार , कविता लिहिणारा कवी "जुना आहे की नवोदित ? हे प्रश्न दुय्यम असतात, कविता आपल्या मनाला रिझवते , कविता मनात पिंगा घालते, फेर धरते थोडक्यात काय तर ..कविता वाचकांच्या मनावर शब्दांचे -प्रतिभेचे मोहक असे गारुड करते ." असे म्हणावेसे वाटते .**

अशी कविता कुणालाही कधी ही भेटत असते , आणि अशी कविता मला ही नुकतीच भेटली ती डॉ.मधुरा जोशी यांच्या "प्रतिबिंब "कविता संग्रहात. या कवितेने अशीच सुंदर अनुभूती दिली. प्रतिबिंब" संग्रहाचा हा परिचय - मित्र हो - आपल्या कवितेविषयीच्या भावना "दर कवी गणिक बदलत असतात . कविता संग्रहाच्या मनोगतातून, प्रत्यक्ष कवितेतून त्या व्यक्त होत असतात, यातूनच कविता म्हणजे काय ? याची वेगवेगळी प्रचीतीआपणास या कविमनाला जाणून घेतांना येत असते , असे मला वाटते. प्रतिबिंब संग्रहाच्या कवयित्री - डॉ.मधुरा जोशी या उत्तम लेखिका आहेत हे प्रतिबिंब -संग्रह वाचून कळून येते . या संग्रहात -
एकोण-सत्तर (६९) कविता ,आणि शेवटी आठ (८) स्फुट लेख आहेत .
जेष्ठ साहित्यिका डॉ. माधवी वैद्य "यांची प्रस्तावना "या कविता- संग्रहास असणे " हा एक मोठाच प्लस -पॉईंट या कवितांचा आहे.
त्या म्हणतात - सगळ साधं ,सोपं ,सरळ ,समजण्यासाठी सुकर असे हे लेखन आहे ". सृष्टीचे सौंदर्य पाहण्याची दृष्टी आहे आणि मुख्य म्हणजे "मनात जपलेला मूल्यभाव आहे . म्हणूनच या ताण-तणावाच्या वातावरणात आणि जगण्याच्या गोंधळलेल्या परिस्थितीत हा कविता संग्रह मनाला आनंददायी वाटणाऱ्या विचारांची एक झुळूक घेऊन येतो आणि पावसाच्या पहिल्या सारी अंगावर झेलतानाचासुखद अनुभव देऊन जातो.
डॉ. दत्तात्रय तापकीर यांनी ही या कवितेबद्दल अभिप्राय दिलाय - ते म्हणतात -
" वाचकांच्या मनात लीलया संप्रेषित होण्याची क्षमता डॉ.मधुरा जोशी यांच्या लेखनात निश्चितच आहे . "भाव उत्कट असले की आशय घनता आणि अर्थ घनता आपोआप लेखनात अवतरते. मित्र हो - हा महत्वाचा हा लेखन -गुण विशेष " , कवी-मित्रांना उपयुक्त -मार्गदर्शक ठरेल.
संग्रहातील अनेक कवितांच्या आरंभी कवयित्रीचे प्रास्तविक वाटावे असा मजकूर आहे , तो नसता तरी चालले असते कारण ही कविता सहजतेने मनापर्यंत पोचते .
काही कवितांचे अंश उदाहरण म्हणून देतो आहे...
निसर्ग -कविता वाटावी
अशी ही एक रचना
..पारिजात " (पृ...३४ )...

**"तयापरी आयुष्य असावे**
**परिसर गंधित करीत जावे**
**जरी रिती ही झालो ओंजळ**
**आठवणींचा राहो दरवळ**
॥



2. मानवी-स्वभाव आणि वृत्तीवर व्यक्त होणारी ही कविता .."पैलतीर ..(पृ..४४ )
" किती वळविले मन तरी वळता वळेना
मीपणाचा हा विळखा अहंकारी सर्प सोडेचना
खुळ्या देहाला जन्माचे खरे इंगित कळेना
पैलतीर आला तरी ऐलतीर सोडवेना ...,
3. मैत्री कशी असावी ? ही कल्पना नवी आणि अभिनव वाटणारी आहे..
(मैत्र पृ..६५ ).. मैत्री असावी डिंका समान घट्ट चिकटणारी कधी नसावी अळवावरील निसटणाऱ्या थेंबापरी 4. एकट " ( पृ...४६ ).. गर्दीत आणि गोंगाटात राहण्याची सवय झालेल्या माणसाला ही कविता काही सुचवू पहाते ..

**पिसासारख एकट तरंगून बघ**
**मोरासारख एकट नाचून बघ**
**स्वतःकडे एकदा नव्याने बघ ॥**

निसर्ग आणि कवीचे दृढ नाते असते, या आशयाच्या अनेक कविता आहेत , सामाजिक भान असले कि वर्तमानातीलसमस्या आणि प्रश्न यावर कवीचे व्यक्त होणे हे अपरिहार्य असते , मानवी स्वभाव , त्यावर अचूक भाष्य करणारी कविता लिहिणे हे कवयित्री डॉ.मधुरा जोशी यांचा विशेष काव्य-गुण आहे असे म्हणावेसे वाटते .
उदा- "कविता " (पृ.१ ), लेक " (पृष्ठ २ ), मन " (प्र.१४ ), कळी "(पृ.२७ ), "स्त्री (पृ.३८ ), राधा "( पृ.४८ ), संसार "(पृ..६० ),पौर्णिमा (पृ.७६ ), नाते "(पृ.८४ ), या काही कवितांचे उल्लेख करावेसे वातातात .
दुसऱ्या भागात ८ स्फुट लेख आहेत. चिंतन -प्रचुर असे हे गद्य लेखन छान जमून आलेले आहे. कवयित्री आणि लेखिका या शिवाय डॉ.मधुरा जोशी यांच्याबद्दल विशेष सांगण्यासारखे अजून काही आहे ..ते म्हणजे -
शिक्षण क्षेत्रात -अध्यापन करणाऱ्या या कवयित्री "कृषी उत्पादन करणाऱ्या "मधुर प्रोडक्ट्स "या कंपनीच्या प्रोप्रायटर" म्हणून कार्यरत आहेत.
प्रतिबिंब " हे स्व-प्रकाशन आहे ", या एका संग्रहावर कवयित्रीने थांबू नये ..हा प्रवास पुढेही चालू असू द्यावा "
यासाठी डॉ.मधुरा जोशी यांना हार्दिक लेखन -शुभेच्छा .

**पुस्तक- परिचय लेख-**
**ले- अरुण वि.देशपांडे .**
**संपर्क - 9850177342**
**"प्रतिबिंब "(काव्य-संग्रह )**
**- डॉ.मधुरा जोशी -पुणे.**
**संपर्क -9422083141**
**पृ.१०८ , मूल्य- रु.१९०/-**
**स्व- प्रकाशन**



# आयुष्य ही एक शाळाच!

आधुनिक केसरी

आपलं आयुष्य ही एक शाळाच आहे.या शाळेत आपण कसे जगतो यावरच आपले जीवन अवलंबून असते. आपले आई वडील लहानाचे मोठे करतात, वाढवतात, चांगले संस्कार देतात.पुस्तकी शाळा संपली की आयुष्याची शाळा चालु होते. ही शाळा कधीच संपत नाही.



संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. ७७२१०४५८४५

आपल्या आयुष्यात गेलेले दिवस परत येणार नाही. आणि येणारे दिवस कसे असतील ते सांगता येत नाही. त्यासाठी आयुष्यात हसत हसत जगता आले पाहिजे. ईथल्या शाळेत रोज दिवस उजाडतो, तसाच मावळतो देखील आणि आपल्या आयुष्यात नवनवे आव्हान घेऊन येत असतो. तसेज रोज नवे अनुभव देऊन जात असतो. आयुष्याच्या शाळेत दुःख, हाल अपेष्टा भोगाव्या लागणारच आहे. इथे कुणाची सुटका नाही. जे माणसं या शाळेत टिकून राहतील, संघर्ष करतील तीच जिंकणार आहेत हे शाश्वत सत्य आहे.आयुष्याच्या शाळेत खडतर परीक्षांचा सामना करावा लागणार आहे. अनेक खाच खळगे येणार आहेत. आयुष्याच्या शाळेत कधी कधी वाईट दिवसांना सामोरं जावं लागेल त्याशिवाय चांगल्या गोष्टी आपल्या हाती लागणार नाही.

हे लक्षात ठेवा. आयुष्याच्या शाळेत आपलं आयुष्य कमी कमी होत चाललंय कधी कधी, कूठे कसे काय होईल हे सांगता येत नाही. हे कोणालाच सांगता येत नाही. आयुष्याच्या शाळेत एक वेळ हरवलेल्या वस्तू सापडतील पण एक गोष्ट अशी आहे जी आपल्या हातात नाही ती म्हणजे आपलं आयुष्य जगात सर्व सुख मिळेल . पण आपलं आयुष्य पुन्हा नाही मिळवू शकत. आयुष्याच्या शाळेत जन्मापासून ते मृत्यूपर्यंतचा प्रवास हा प्रत्येकाला करावाच लागतो. खरं म्हणजे आयुष्य ही शाळाच आहे. आयुष्याच्या शाळेत काही क्षण एकांतात घालवा . बघा तिथेच आपल्याला आयुष्याचे उत्तरे मिळतील. ज्याला आयुष्याच्या शाळेचा अर्थ कळाला. त्याला जीवनचा अर्थ कळाला असे म्हटले तर वावगे ठरू नये.

# प्रतिकूल परिस्थितीत बंजारा समाजाचा देश -धर्मासाठी संघर्ष : योगी आदित्यनाथ

## धर्मांतरण विरोधी कायदा व्हावा : पू. बाबूसिंग महाराज

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** प्रतिकूल परिस्थिती बंजारा समाजाने देश आणि धर्मासाठी संघर्ष केला असून हा समाज वीरांचा समाज असल्याचे प्रतिपादन उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केले. ते अ. भा.हिंदू गोर बंजारा लबाना नायकडा समाज कुंभ 2023 च्या समारोप प्रसंगी बोलत होते. गोद्री येथे 25 ते 30 जानेवारी दरम्यान आयोजित करण्यात आला होता. 30 रोजी कुंभाचा सहावा आणि अंतिम दिवस होता. सहा दिवसीय बंजारा कुंभात १२ लाख भाविक सहभागी झाले.
यावेळी धर्मसभेच्या व्यासपीठावर योग गुरु रामदेवबाबा ,मुख्यमंत्र्यांनी एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री ना देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ , श्री शंकाराचार्य सदानंद सरस्वती महाराज ( श्री द्वारका शक्ती पिठाचे), महामंडलेशवर जनार्धन स्वामी, बाबूसिंग महाराज, गोपाल चैतन्य महाराज, धर्मजागरण प्रमुख शरदराव ढोले, भैय्याजी जोशी , आदी उपस्थित होते .
11.30 वाजता रामदेवबाबा यांचे गोद्री येथे आगमन झाले. तेथे पू .संत धोंडीराम बाबा व पू .आचार्य श्री चंद्रबाबा यांच्या मंदिरात जाऊन त्यांनी दर्शन घेतले. व्यासपीठावर मान्यवरांचे स्वागत पारंपरिक लोकगीतांनी झाले. यावेळी सुरेश महाराज यांनी आपले मनोगत व्यक्त केले.
याप्रसंगी श्री शंकाराचार्य सदानंद सरस्वती महाराज,श्री शारदा शक्ती पिठ यांनी आपल्या मार्गदर्शनात भारतात



हिंदू धर्म टिकला तर राष्ट्रवाद टिकेल ,हिंदू आणि हिंदुत्व वेगळे नाही. बंजारा समाजाच्या पूर्वजांनि हिंदू धर्मासाठी त्याग केला आहे, धर्म परिवर्तन करतांना त्यात कोणते दोष पाहिले आणि धर्मांतरित होताना त्या धर्मात कोणती वैशिष्ट्ये पाहिली याचा विचार करावा. देशात चार मठ हिंदू धर्माच्या रक्षणासाठी आहेत असे प्रतिपादन केले.
योगगुरू रामदेवबाबा यांनी आपल्या उपदेशात माता - पितामध्ये परमेश्वर बघा , सनातन धर्मात भेदभाव नाही. भेदभाव केला असता तर इसाई एक पाऊलही भारतात टाकू शकले नसते. इस्लामने क्रूरतेने अनेकांना मुस्लिम बनविले. क्रूरतेने मुलींच्या शरीराचे अनेक तुकडे केले आहे. यांना अशा वर्तुणुकीची संधी पुन्हा देऊन नका. जे म्हणतात " इस्लाम महान आहे पण ज्यांनी इस्लाम वाढविला त्यांचे वंश संपले ". हिंदू धर्म विश्व् धर्म आहे. सनातन नित्य आहे जे कधीही मिटणार नाही. जल , धरती व वायू आपला धर्म बदलू शकत नाही तर आपला धर्म कसा काय कुणी बदलू शकतो. इस्लामने केलेले पाप धुण्याची हि संधी आहे. गावातील एक व्यक्ती गरीब झाला तर गावकऱ्यांनी त्याला मदत करा. पातंजली च्या माध्यमातून ५ लाख लोकांना रोजगार मिळाला असून आणखी ५ लाख लोकांना रोजगार देणार आहे . योग करा , समाजातून व्यसनाधीनता बाहेर काढा , राम , कृष्ण व शिवयाची आराधना करा . योग्य केल्याने आजार दूर जातील असे सांगितले.
गोपाल चैतन्य महाराज यांनी आपल्या उपदेशात तांडे सुधारणा व्हावी, महाराष्ट्र राज्यात बंजारांना जसे आरक्षण दिले आहे तसे अन्य राज्यातही आरक्षण मिळावे.
उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आपल्या भाषणात सर्व कामना पूर्ती ,सिद्धी प्राप्ती साठी कुंभ असतो भारत माता रक्षणासाठी बंजारा समाजाचे व्यापक कार्य आहे. भारतात जन्म घेणे दुर्लभ आणि त्यातच मनुष्य जन्माला येणे दुर्लभ आहे. सनातन धर्म मानवता कल्याण मार्ग प्रशस्त करतो. सनातन धर्म म्हणजे मानव धर्म .
भारत जगातील ५ वि सर्वात मोठी अर्थ व्यवस्था राष्ट्रपती भवनातील मुघल गार्डन चे नामांतर होऊन अमृत गार्डन झाले. ५०० वर्षांपासून परीक्षेत असलेलं राम मंदिर पुढील वर्षी पूर्ण होणार आहे.



# प्रल्हाद राजाराम वाणी यांना २५ हजारांचे बक्षीस

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची बस २५वर्षे विना अपघात चालऊन जनमानसात महामंडळची प्रतिमा उंचावली त्या प्रित्यर्थ येथील बस चालक प्रल्हाद राजाराम वाणी व त्यांच्या पत्नी कमल प्रल्हाद वाणी यांना २५ हजार, रोख, तसेच स्मृती चिन्ह, साडी, चोळी प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला.
औरंगाबाद विभागाचे व्यवस्थापक आर.एम.मोईन, जिल्हा नियंत्रण अधिकारी आर.पी. क्षीरसागर, जिल्हा वाहतुक अधिकारी पी. ए.अहिरे, एम.ए. माटे, एस. के.कोकाटे यांनी सदरील मान सन्मान केला.
वाणी यांना मिळालेल्या या मानाच्या पुरस्कारबद्धल येथील जेष्ठ पत्रकार घनश्याम वाणी, सेवानिवृत्त गट शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत,पोलीस अधिकारी सोपानराव निकम, बापू गावडे वैजापूर बस आगाराचे व्यवस्थापक नेरकर यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# श्रीक्षेत्र लासलगाव येथे श्री संत ज्ञानेश्वर माऊली मंदिर प्राणप्रतिष्ठा

आधुनिक केसरी न्यूज

**रामभाऊ आवारे**
**निफाड : इवलेसे रोप लावियेले द्वारी तयाचा वेलू गेला गगनावरी ||**
या संत वचनाप्रमाणे विश्व माऊली ज्ञानोबारायांची मंदिर लासलगाव येथे व्हावी या दृष्टिकोनातून लासलगाव ब्राह्मण सेवा मंडळाच्या पुढाकार व सहकार्यातून लासलगाव पुण्य नगरीत श्री संत ज्ञानेश्वर माऊली मंदिरात मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्याचे आयोजन बालाजी नगर, भक्तवत्सल बालाजी मंदिराच्या पुढे, कोटमगांव रोड, लासलगाव येथे मंगळवार ३१ जानेवारी ते शुक्रवार ३ फेब्रुवारी या कालावधीत करण्यात आलेले आहे. तरी या मंगल सोहळ्यास आपण सहकुटूंब सहपरिवार सहभागी होऊन कार्यक्रमाचा आनंद द्विगुणित करावा व महाप्रसादाचा अवश्य लाभ घ्यावा लासलगाव ब्राह्मण सेवा मंडळाच्या वतीने करण्यात



आले आहे. मंगळवार ३१ जानेवारी रोजी दुपारी ३ ते ६ ज्ञानेश्वर माऊली भव्य मिरवणुक, शोभा यात्रा, बुधवार १ फेब्रुवारी स.९ ते १२ प्रायश्चित्त, गणेश पुजन, पुण्याहवाचन, मातृका, नांदिश्राध्द , दुपारी २ ते ५ जलाधिवास, अग्निमंथन, नवग्रह हवन, सायं पुजन आरती, गुरुवार २ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते १२ स्थापित देवता अभिषेक, शांतिक, पौष्टिक, कुटिर होम प्रधान देवता हवन, दुपारी ३ ते ५ मुर्तीन्यास, स्नपन विधि, धान्याधिवास, शैय्याधिवास, मुर्ती लोकपाल हवन, सांज पुजन आरती, शुक्रवार ३ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते ४ या वेळेत स्थापित देवता प्रातः पुजन, कर्मशिला, ब्रम्हशिला स्थापन, पराय हवन, | उत्तरांग हवन, महाबलि दान, परमपुज्य श्री गणेशगिरिजी महाराज श्री संत जनार्दन स्वामी आश्रम, श्री क्षेत्र निफाड व ह.भ.प. काशीनाथ महाराज यांच्या हस्ते दुपारी १२.३६ मि., कलशारोहण, मुर्तीप्राणप्रतिष्ठा सोहळा, पुर्णाहुती, महाआरती, महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी लासलगाव सह परिसरातील सर्व भाविकांनी या ज्ञानामृताचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.



# विठ्ठल कारखान्यावर निमंत्रित संचालकांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** वेणूनगर- गुरसाळे येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना येथे रविवार दि. २९.०१.२०२३ रोजी मा. संचालक मंडळाच्या सभेमध्ये कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत धनंजय पाटील यांनी पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांचा राजवाडा समजला जाणाऱ्या आपल्या कारखान्याला मार्गदर्शन व सल्ला मिळावा या उद्देशाने या संचालक मंडळावर निमंत्रित संचालक नियुक्त करण्याची आपल्या कारखान्याची प्रथा आहे असे सांगितले. याबाबत सर्व संचालक मंडळाचे एकमत होऊन पुढील मान्यवरांची निमंत्रित संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली. सर्वश्री धनाजी ज्ञानेश्वर खरात, रा. सोनके, सचिन अरूण शिंदे (पाटील), रा. आंबे, तानाजी विष्णु बागल, रा. गादेगांव, उमेश बाळु मोरे, रा. चळे, अंगद उध्दव चिखलकर, रा. पांढरेवाडी, अशोक महादेव घाडगे, रा. मुंढेवाडी, गणेश भिका ननवरे, रा. आव्हे, समाधान तुकाराम गाजरे, रा. शेळवे, ता. पंढरपूर यांना निमंत्रित संचालक म्हणून निवडीचे पत्र देऊन त्यांचा सत्कार कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत धनंजय पाटील व कारखान्याचे मार्गदर्शक श्री बी. पी. रोंगे सर यांनी केला. या निमंत्रित संचालकांच्या निवडीमुळे पंढरपूर तालुक्यामध्ये कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत धनंजय पाटील यांनी दिलेले वचन पाळणारे चेअरमन असा विश्वास निर्माण होऊन आनंद व्यक्त होत आहे. या निवडीने शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने न्याय देणारा चेअरमन म्हणून त्यांची ओळख निर्माण होत आहे. सदर प्रसंगी बोलतांना कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत धनंजय पाटील म्हणाले की, श्री विठ्ठल कारखान्याची निवडणुक ही आपली पहिलीच निवडणुक असल्यामुळे आपणास सहकार्य केलेल्या आपल्या श्री विठ्ठल परिवारातील तळागाळातील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पुढील येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, मार्केट कमिटी अशा वेगवेगळ्या निवडणुकांमध्ये निवडून आणून त्यांना सन्मानीत करून न्याय देण्याचे आश्वासन दिले. तसेच कारखान्याचा गळीत हंगाम सन २०२२-२३ चालु असुन आपले कारखान्यास ऊस पुरवठा सुरळीत होण्यासाठी दि.०१.०२.२०२३ पासून कारखान्याकडे गळीतास येणाऱ्या सर्व ऊसास प्रती मे. टन रू.१००/- ची वाढ देऊन पहिला हप्ता रु. २४०० /- (दि.०१.०२.२०२३ पासून) देणेचा निर्णय कारखान्याचे मा. संचालक मंडळाने याप्रसंगी घेतलेला आहे.

# माघी यात्रेसाठी पंढरपूर नगरपरिषद सज्ज

## लोखंडी पोलवर 200 वॅट एलईडी दिवे; वाळवंटामध्ये 45 नळ

आधुनिक केसरी न्यूज

ज्योती खिलारे
पंढरपूर : अवघ्या महाराष्ट्राची आध्यात्मिक राजधानी असलेल्या श्री क्षेत्र पंढरपूर येथे दि. 01 फेब्रुवारी रोजी माघी यात्रा भरत असून येणा-या लाखो भाविक वारकऱ्यांना सेवा सुविधा पुरविण्याकामी पंढरपूर नगरपरिषदेची यंत्रणा सज्ज झालेली आहे.
यात्रेकरुंना यात्रा कालावधीमध्ये अनेक सुविधा देण्यात येणार आहेत. नगरपरिषदेने स्टेशन रोड, प्रदक्षिणा रस्त्याचे व शहरातील इतर रस्ता दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत. तसेच अर्बन बँक ते नाथ चौक, सावरकर पुतळा ते महाद्वार, मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्ग, अंबाबाई पटांगण, चंद्रभागा वाळवंट येथील अतिक्रमण काढण्यासाठी विशेष मोहिम हाती घेण्यात आली असुन पोलीस प्रशासनाच्या मदतीने अतिक्रमण काढण्याचे काम चालू आहे. तसेच वाळवंटात येणाऱ्या यात्रेकरुंना वाहनांची वाहतूकीची सोय व्हावी म्हणून जुना पुल ते पुंडलिक मंदिर व या मुख्य रस्त्याला लागून नदीपर्यंत उपरस्त्याची आखणी करण्यात आली आहे. तसेच पुंडलिक मंदिर ते दगडी पुलापर्यंत 9 हायमास्ट दिवे, प्रत्येक घाटासमोर असलेल्या लोखंडी पोलवर 200 वॅट एलईडी दिवे लावण्यात आले असुन सदर दिव्यांचा प्रकाश संपुर्ण वाळवंटात पडणार आहे. त्याचप्रमाणे यात्रेकरुंच्या सोईसाठी संपूर्ण दर्शन बारी मार्ग, 65 एकर मध्ये 160 एलईडी दिवे व 6 हायमास्ट बसविण्यात आले आहेत. तसेच 65 एकर मध्ये असलेल्या 1800 शौचालयामध्ये



विजेची व्यवस्था करण्यात आलेली आहे.
अनिल नगर येथील पाण्याच्या टाकीवरुन स्वतंत्र पाईप लाईन द्वारे यात्रेकरुंना पिण्याचे पाणी मिळावे या हेतूने नदीच्या वाळवंटामध्ये 45 नळ बसविण्यात आले आहेत. तसेच वाळवंटात विशेष स्वच्छता मोहिम राबविण्यात आली आहे. यात्रेपूर्वी संपूर्ण वाळवंट दोनवेळा स्वच्छ करण्यात आले आहे. तसेच उघड्यावर शौचास बसू नये म्हणून विशेष टीम नेमण्यात आली आहे. तसेच नदी पात्र, पत्राशेड दर्शनबारी, 65 एकर, मंदिर परिसरात व शहरात आगीची दुर्घटना होऊ नये म्हणून 24 तास अग्निशमन वाहन उभे करण्यात आले आहे. पत्रा शेड, नविन अग्निशमन केंद्र, चंद्रभागा नदी वाळवंट तसेच मंदीरा भोवती आग लागल्यास अग्निशमन वाहनास त्वरीत पाणी उपलब्ध व्हावे म्हणुन मंदीराच्या दक्षिण बाजुस फायर हायड्रेट उभा केला आहे.

# महावितरणची प्रस्तावित वीज दरवाढ आपणच रोखू शकतो

## चंदुलाल बियाणी : हरकती मांडून दरवाढ थांबवा

आधुनिक केसरी न्यूज



**परळी :** महावितरणने एका जाहीर सूचनेद्वारे राज्यातील सर्व प्रकारच्या विज ग्राहकांच्या वीज दरावाढीचा प्रस्ताव अधिक्षक अभियंता (वीज दर नियमक कक्ष) यांच्यासमोर मांडला असून येत्या काळात राज्यातील वीज ग्राहकांना मोठ्या दरवाढीचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. प्रस्तावित दरवाढीच्या संदर्भात महावितरणने हरकती आणि आक्षेप मागविल्या असून एक वीज ग्राहक म्हणून आपणच हरकतीद्वारे ही दरवाढ रोखू शकतो असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड जिल्हा उपाध्यक्ष चंदुलाल बियाणी यांनी व्यक्त केले आहे. दरम्यान, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील वीज ग्राहकांसाठी जनजागृती अभियान राविण्यात येत असून ग्राहकांनी हरकतीद्वारे आपला आक्षेप नोंदवावा, असे आवाहन चंदुलाल बियाणी यांनी केले आहे. राज्यातील वीज ग्राहकांच्या समस्या जशास तशा असतांना, वीज चोरी आणि गळती थांबविण्यात अपयश आलेले असताना तसेच महावितरणमधील भ्रष्टाचार रोखण्यात अपयश आलेल्या महावितरणने आपले नुकसान भरुन काढण्यासाठी वीज दरवाढ करण्याचा प्रस्ताव समोर ठेवला आहे. या दरवाढीला आम्ही कडाडून विरोध करित असून आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनानुसार राज्यातील वीज ग्राहकांसाठी आक्षेप नोंदविण्याबाबत रा.कॉ.चे जिल्हा उपाध्यक्ष चंदुलाल बियाणी यांनी वीज ग्राहकांना आवाहन केले आहे. या संदर्भात एक महितीपत्र आणि आक्षेप, हरकत कशी व कोठे नोंदवावी याबाबत 50 हजार माहिती पत्रके वितरीत करण्यास सुरुवात केली आहे. सध्याचा वीज दर रुपये 3.36 प्रति युनिट असून पुढील 2 वर्षात तो रुपये 4.50 ते 5.10 रुपये प्रति युनिट होऊ शकतो. सदरची दरवाढ स्विकारली गेली तर वीज ग्राहकांच्या खिशाला मोठी झळ बसणार आहे. 15 फेब्रुवारी पर्यंत या संदर्भातील आक्षेप, हरकती नोंदविणे आवश्यक असून अधिक्षक अभियंता, प्लॉट न. जी-9, 5 वा मजला, प्रकाशगड, प्रो. अनंत काणेकर मार्ग बांद्रा (पुर्व) मुंबई-400051 येथे टपालाने पाठवावे किंवा SUGGESTIONS.MTR2022@ MAHADISCOMIN येथे ईमेल द्वारे पाठवावे असे आवाहन चंदुलाल बियाणी यांनी केले आहे. 50 हजार माहिती व आक्षेप पत्र राज्यभरात वितरीत करण्यात येत असून सोबतच विविध प्रकारच्या प्रसार माध्यमांवर त्याची प्रत जनहितार्थ दिली जात आहे. आपणच आपली वीज दरवाढ याद्वारे रोखणार असून प्रत्येक वीज ग्राहकाने विनाविलंब आपली हरकतपत्रे संबंधीताकडे पाठवावीत असेही आवाहन चंदुलाल बियाणी यांनी केले आहे.

# प्रसार माध्यमांद्वारे व्यक्तिमत्त्व विकास साधावा : प्रा.डॉ. मस्के

आधुनिक केसरी न्यूज




**पिंपळनेर :** प्रसार माध्यमे हे सामाजिक क्रांती करणारे असतात. ते लोकशिक्षक आणि मार्गदर्शकही असतात. ते व्यक्तीमत्त्व विकासही घडवून आणणारे असतात. परंतु आजच्या युवकांनी प्रसार माध्यमांच्या आहारी न जाता विचारपूर्वकच हाताळणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन बोपखेल येथे राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबिराच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रमुख वक्ते प्रा. डॉ. सतीश मस्के यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. के.डी.कदम हे होते. विचार मंचावर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.सी.एन.घरटे, सहाय्यक कार्यक्रमाधिकारी प्रा.एस.एन.तोरवणे तसेच प्रा.पी.एम.सावळे व सुनील पवार आदी उपस्थित होते.

कर्म. आ.मा.पाटील कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबिराप्रसंगी बोपखेल येथे प्रमुख वक्ते म्हणून ' प्रसारमाध्यमे आणि युवक ' या विषयावर बोलताना डॉ. सतीश मस्के यांनी दवंडी, सनई चौघडा याच्या माध्यमातून प्रसारमाध्यमाचा सुरू झालेला प्रवास सांगुन आत्ताच्या वृत्तपत्रे, दूरचित्रवाणी, व्हाट्सअप,फेसबुक,ट्विटर, इंस्टाग्राम आदिविषयी माहिती दिली. एकेकाळी या प्रसारमाध्यमाने देशात प्रचंड मोठी क्रांती केली आहे. बदल घडवून आणले आहेत. हल्लीचा तरुण मोबाईल द्वारे प्रसारमाध्यमाचा योग्य वापर करताना दिसत नाही. त्यामुळे तो आपल्या व्यक्तिमत्व विकासापासून कोसो दूर राहत आहे. तो त्याच्या आहारी जाऊन आपले जीवनही संपवून टाकत आहे. हल्लीचे प्रसारमाध्यमेही कशी बदलत आहेत. काहीअंशी ते सत्यापासून दूर जाताना दिसत आहेत याविषयीही त्यांनी सांगितले. श्रवण, वाचन, भाषण व लेखन ही भाषिक कौशल्येही आजच्या युवकांनी प्रसारमाध्यमासाठी व व्यक्तिमत्व विकासासाठी अवगत करणे गरजेचे आहे. अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य प्रा. के.डी. कदम यांनी प्रसारमाध्यमाविषयी व आजच्या युवकाविषयी माहिती सांगून 'आभाळाची आम्ही लेकरे काळी माती आमुची आई' हे गीत सादर केले. प्राचार्य प्रा. के.डी.कदम यांचा परिचय नंदा सुर्यवंशी यांनी व प्रमुख वक्ते प्रा. डॉ. सतीश मस्के यांचा परिचय वैभव सुर्यवंशी यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कैलास सोनवणे यांनी केले व आभार दर्शन पगार यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.सी.एन.घरटे, प्रा.एस.एन.तोरवणे, प्रा. पी. एम.सावळे आदींनी परिश्रम घेतले.

# आसाराम बापूला जन्मठेपेची शिक्षा

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** एका महिला अनुयायीवर बलात्कार केल्याप्रकरणी गुजरातच्या गांधीनगर न्यायालयाने सोमवारी (३० जानेवारी) आसाराम बापूला दोषी ठरवले होते. दरम्यान, आज न्यायालयाने याप्रकरणी आसाराम बापूला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. विशेष म्हणजे आसाराम बापूला यापूर्वीदेखील एका प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. २०१३ मध्ये सुरतमधील दोन बहिणींनी आसाराम बापू आणि नारायण साई यांच्याविरोधात बलात्काराची तक्रार दाखल केली होती. २००२ ते २००५ दरम्यान नारायण साईने वारंवार तिच्यावर बलात्कार केल्याचे लहान बहिणीने तक्रारीत सांगितले होते. सुरतमधील आसारामच्या आश्रमात राहात असताना तिच्यावर बलात्कार झाला, असे पीडित मुलीने सांगितले होते. दुसरीकडे, मोठ्या बहिणीने तक्रारीत आसारामवर बलात्काराचा आरोप केला होता. अहमदाबाद येथील आश्रमात आसारामने तिच्यावर अनेकवेळा बलात्कार केल्याचे पीडितेने सांगितले.

# खासदार खाताय काजू मांडा गरिबांची बाजू!

## राष्ट्रवादीचे राणजित भोसले यांचा आयुक्तांवर प्रश्नांचा पाऊस

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** मालमत्ता कर संदर्भात खासदारांना कमीचा मालमत्ता कर व सामान्य धुळेकर जनतेला वर्षा नावावर लुटमार. खासदार यांच्या घराला 8355 रु. घरपट्टी व इतर छोट्या घरांना 32254 रु. घरपट्टी अजब भाजपाचा गजब कारभार आयुक्त व खासदार यांनी उत्तर द्यावे व शहरातील जनतेची दिशाभूल मोठा भ्रष्टाचार होत आहे असे रणजित भोसले यांनी निवेदनद्वारे सांगितले.

मालमत्ता कर व घरपट्टी बाबत धुळे महानगरपालिकेचा सुलतानी कारभार चालू आहे. भाजपची सत्ता असलेली धुळे महानगरपालिकेने हुकूमशाही पध्दतीने धुळे शहरातील 10 गावांमध्ये मालमत्ता व घरपट्टीमध्ये अवाढव्य वाढ केली आहे असे रणजीत राजे भोसले म्हणाले. जनतेला तीन ते चार पटीने मालमत्ता व घरपट्टीच्या नोटीसा दिल्या. अवाजवी घरपट्टी वसुल करुन मनपा एकप्रकारे जनतेकडून पठाणी वसुली करीत आहेत असे रणजीत राजे म्हणाले यांचा प्रश्न आहे की, आदरणीय खासदार मा.श्री. डॉ.सुभाष भामरे साहेब यांच्या प्लॉटचे क्षेत्रफळ 5000 स्वे. फूट असून बांधकाम जवळपास दुमजली 12 खोल्या आहेत. सदर बंगला दुमजली असून त्यामध्ये दवाखाना, मेडीकल, औषधी डिलरशीप म्हणजे कर्मिशियल, व्यावसायिक बांधकाम आहे. तरी त्यांना फक्त वर्षाला संपूर्ण 8355 रुपये मालमत्ता कर व घरपट्टी आहे. (बांधकाम क्षेत्रफळाला तसे तर फक्त 5443 रुपये घरपट्टी आहे.) त्या व्यतिरिक्त वलवाडी परिसरातील एका घराचे क्षेत्रफळ 1500 स्वे. फुट असून 7 रहिवाशी खोल्या आहेत. त्याठिकाणी कुठल्याही प्रकाराचे व्यावसायिक काम नाही तरी त्या घराला 32254 रु. कर आकारला आहे. एवढा अन्याय का..? हा अजब भाजपाचा गजब कारभार कुठून आला. हेही खासदार साहेब, आयुक्त साहेब जनतेला कळू द्या असेही सांगितले आहे.

खासदार साहेब, आयुक्त साहेब आपण मोठ्या गाजावाजा करुन 30% घरपट्टी कमी करु असे आश्वासन तमाम पत्रकार बंधूच्या समोर धुळेकर जनतेला दिले होते. त्याचे काय झाले..? तूम्ही घरपट्टी 30% ने कमी का केली नाही? तूम्ही जनतेला सफशेल फसवत आहात. याचेही उत्तर तुम्हांला द्यायचे आहे. मालमत्ता कमी करण्याऐवजी तूम्ही 2019-20, 2020-21, 2021-22 या वर्षांचा सुध्दा वाढीव कर वसूल करीत आहात. कमी तर नाहीच केली परंतू इतर वर्षांची घरपट्टी वाढवून जनतेला चटके दिले आहेत.

महानगरपालिकेने नागरिकांना दिलेल्या नोटिशांना जवळपास 10 हजार लोकांनी / कुटूंबानी हरकती घेतल्या आणि एवढ्याच लोकांनी सुनावणीला उपस्थित राहून मालमत्ता कर व घरपट्टी कशी चुकीची आहे हे सप्रमाण महानगरपालिकेच्या अधिकारी, पदाधिकारी यांना सांगितले. तरी सुध्दा महानगरपालिका हुकूमशाही पध्दतीने काम करीत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, काँग्रेस व सर्व साधारण जनतेने अनेक वेळा आंदोलने, निवेदने दिली. परंतू त्याचा काही परिणाम धुळे महानगरपालिकेवर झाला नाही. एवढ्या मोठ्या संख्येने नागरिक हरकती सुनावणी घेतात याचा अर्थ असा होतो की, महानगरपालिका कुठेतरी झोलझाल करीत आहे असा आरोपी निवेदनाद्वारे केला गेला.


घराची किंवा मालमत्तेची मोजणी करतांना सरसकट लांबी, रुंदी, मोजून मालमत्ता कर आकारला. प्रत्यक्षात घरातील देवघर, पोर्च,जीना, संडास, बाथरुम, गॅलरी याला शासनाच्या नियमाप्रमाणे घरपट्टी आकराली जात नाही.

# डॉ. कलाम यांचे पुस्तक भावी पिढीसाठी प्रेरणादायी : डॉ. माशेलकर

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम हे अतिशय संवेदशील, सहृदय, शालीन, विनम्र असे व्यक्तिमत्व होते. लहान मुलांविषयी त्यांना विशेष कौतुक होते, युवकांमध्ये त्यांची मोठी लोकप्रियता होती, ते खऱ्या अर्थाने 'पिपल्स प्रेसिडेंट' होते. अशा व्यक्तिमत्वाविषयी डॉ. छाया महाजन यांनी पुस्तक लिहून मोठे समाजकार्य केले आहे. भावी पिढीसाठी हे पुस्तक प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी केले.

ख्यातनाम लेखिका डॉ. छाया महाजन यांच्या डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम या चरित्रात्मक पुस्तकाचे प्रकाशन सोमवार दि. 30 रोजी पत्रकार भवन येथे डॉ. माशेलकर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते अध्यक्षपदावरून बोलत होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांची यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. साकेत प्रकाशनचे साकेत भांड व्यासपीठावर होते. प्रमुख पाहुणे या नात्याने बोलताना प्रा. मिलिंद जोशी म्हणाले, महाजन यांचा साहित्य क्षेत्रातील प्रवास विलक्षण आहे. त्यांनी विविध विषयांवर लिखाण केले आहे. अनेकदा चाकोरीबाहेरचा विचारही त्यांनी आपल्या लेखनातून वाचकांपर्यंत पोहोचविला आहे. त्यांच्या लिखाणावर कोणत्याही विचारधारेचा पगडा दिसून येत नाही. राष्ट्रपतींविषयी सकारात्मक विचारांचा जागर करणारे लिखाण लेखिकेने या पुस्तकाच्याद्वारे केले असून डॉ. कलाम यांच्या चरित्रचिंतनाबरोबरच त्यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञानही या पुस्तकाद्वारे वाचकांसमोर येत असल्याचे जोशी यांनी नमुद केले. आपल्या लेखन प्रवासाविषयी बोलताना डॉ. छाया महाजन म्हणाल्या, समीक्षकांनी साहित्याची दखल घेतली नाही तरी मला समीक्षकापेक्षा वाचक आणि प्रकाशक महत्त्वाचा वाटतो. वाचकांनी साहित्यकृती स्वीकारल्यामुळे चाळीस पुस्तकांच्या लेखनापर्यंत प्रवास करता आल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांचे स्वागत डॉ. चेतन महाजन, डॉ. अमित महाजन, प्रतिमा भांड, गौरी महाजन, ज्योती नांदेडकर यांनी केले. प्रास्ताविक प्रतिमा भांड यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन वि. दा. पिंगळे यांनी केले तर आभार ज्योती नांदेडकर यांनी मानले.




# सावळदबारा येथील बाजार ५ फेब्रुवारी रोजी बंद

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील परब्रम्ह परमेश्वर अवतार भगवान श्री चक्रधर स्वामी यांची दांडीपौर्णिमा निमित्ताने भव्य यात्रा असल्याने दि. ३ ते ७ फेब्रुवारी यात्रा आहे. यात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या चक्रधर स्वामी यात्रेला भारत भरातून लाखो भाविक भक्त येणार असल्याचे गृहीत धरुन या ठिकाणी तयारी सुरु आहे.

यात्रेचा या समारोप कार्यक्रमाला संत महत, भक्त, भाविक गण,यांची होणारी गर्दी लक्षात घेता सावळदबारा येणारा आठवडे बाजार दि. ५ फेब्रुवारीला आठवडे बाजार बंद ठेवण्या ची दवंडी येथील ग्राम पंचायतीने आज ठिक ठिकाणी दिलेली आहे. अशी माहिती मो.आरिफ मो.लुखमान प्रभारी सरपंच सावळदबारा यांनी बोलताना सांगितले.

# मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेची गुत्तेदाराने लावली वाट !

## १ कोटी २६ लाख ५६ रुपयांच्या रस्त्याचे काम अद्यापही खोदकाम करीत अर्धवटच

आधुनिक केसरी न्यूज


**परभणी :** पूर्णा तालुक्यात मुख्यमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत ग्रामीण भागांमध्ये कोट्यावधी रुपयांच्या शासकीय निधीतून होणारी रस्त्यांची कामे कालावधी उलटल्यानंतर देखील अपूर्ण व निकृष्ट दर्जाची होत असल्यामुळे महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था परभणी या कार्यालयात कार्यरत कार्यकारी अभियंता वाघ उपविभागीय अभियंता बिचेवार कनिष्ठ अभियंता कुलकर्णी यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे निदर्शनास येत असून असाच काहीसा प्रकार पुर्णा तालुक्यातील रा.मा.२४९ धनगर टाकळी ते कंठेश्वर या कि.मी.०/०० ते कि.मी.२/७०० या एकून लांबी २.७० किलोमीटर डांबरी रस्ता व २.४० किलोमीटर सिमेंट कॉंक्रीट रस्ता ३०० मिटर या मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतील १ कोटी २६ लाख ५६ हजार रुपयांच्या शासकीय निधीतून होणाऱ्या रस्त्याच्या कामाला १८ आगस्ट २०२१ रोजी सुरुवात झाली असून हे काम पुर्ण करण्याचा कालावधी १७ फेब्रुवारी २०२३ दर्शवण्यात आला असला तरीही सदरील रस्त्याचे काम कालावधी संपण्यासाठी अवघे १९ दिवस बाकी असतांना सदरील अद्यापही २५% देखील पुर्ण झाला नसल्याचे निदर्शनास येत आहे. पुर्णा तालुक्यातील धनगर टाकळी ते कंठेश्वर या मुख्यमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत होत असलेल्या रस्त्याच्या कामाचे कंत्राटदार व्हि.टी.पाटील इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रंक्टर औरंगाबाद हे असले तरी सदरील कामावर देखरेख मात्र एका स्थानिक गुत्तेदाराची असल्यामुळे या रस्त्याची संपूर्णतः वाट लागल्याचे निदर्शनास येत असून सदरील रस्त्याचे काम अंदाजपत्रका प्रमाणे नकरता हा रस्तावरील व आसपासचे मटेरीयल जेसीबीद्वारे उकरून जागेवरच दाबण्याचा प्रकार होत असल्यामुळे या मार्गावर सातत्याने अपघात होतात. या मार्गावरून प्रवास करताना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत असून याहीपेक्षा गंभीर बाब म्हणजे कंठेश्वर बसस्थानक ते तंटामुक्ती अध्यक्ष नरहरी कदम यांच्याघरापर्यंत ३०० मिटर होत असलेल्या सिमेंट रस्त्याचे कामदेखील दर्जाहीन असल्यामुळे ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे.



# श्री शिवाजी विद्यामंदिर कळंबुशी शाळेतील विद्यार्थ्यांचे निबंध स्पर्धेत घवघवीत यश

आधुनिक केसरी न्यूज

**सिंधुदुर्ग :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या हस्ताक्षर निबंध स्पर्धेत जि.प.प्रा.कळंबुशी (श्री शिवाजी विद्यामंदिर कळंबुशी शाळा) या शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.



लाखो साहित्यिकांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणारी. भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच तथा फ्रीडम स्टोरी ऑफ इंडिया जिल्हा रत्नागिरी/सिंधुदुर्ग अंतर्गत ३ जानेवारी २०२३ रोजी झालेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्ताने सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या संस्थेच्या जिल्हाध्यक्षा ज्योती जयंत पवार"परी" यांनी कळंबुशी गावातील श्री शिवाजी विद्यामंदिर कळंबुशी शाळा नंबर एक मध्ये इयत्ता तिसरी व चौथी च्या विद्यार्थ्यांची सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित हस्ताक्षर/निबंध स्पर्धा आयोजित केली होती. त्या स्पर्धेत एकूण अकरा विद्यार्थी सहभागी होऊन स्पर्धेला उस्फुर्त प्रतिसाद दिला. या स्पर्धेत कु.शुभ्रा मिलिंद आंबवकर इयत्ता तीसरी ही प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली. तर कु.सोहम सचिन दिवाळे इयत्ता चौथी हा द्वितीय क्रमांकाचा मानकरी ठरला. त्यासोबत कु.श्रेया सतिश रांगले इयत्ता तिसरी ही तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली.तर कु.आराध्या संभाजी चव्हाण इयत्ता तीसरी, कु.निधी मंगेश फेपडे.इयत्ता चौथी, कु.आराध्या मुकेश चव्हाण.इयत्ता चौथी, कु.वेदांत विलास जड्यार इयत्ता चौथी असे चार विद्यार्थी उत्तेजनार्थ क्रमांकाचे मानकरी ठरले.

काल गुणगौरव सोहळा पार पडला. त्या सोहळ्यास भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच तथा फ्रीडम स्टोरी सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्षा/परीक्षक कु.ज्योती जयंत पवार"परी" तसेच प्रमुख पाहुणे कळंबुशी गावचे उपसरपंच आकाश चव्हाण, सुमित चव्हाण( कळंबुशी ग्राम प्रमुख ) जयप्रकाश चव्हाण, विजय चव्हाण, सुचिता जयंत पवार तसेच कळंबुशी मराठी शाळेचे शिक्षक शेषराव देशमुख, विकास घोरतळे, अंगणवाडी सेविका सुप्रिया चव्हाण. अनुष्का सचिन चव्हाण उपस्थित होते

श्री शिवाजी विद्यामंदिर कळबुंशी शाळा नं १ व ह.भ.प.श्री.आ.बा.सावंत .माध्यमिक विद्यालय नायशी हायस्कूल मध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त श्री छत्रपती शिवाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले या महामानवांची मुलांना एकूण ३२ पुस्तके वाटप केली. ज्योती पवार"परी" आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याचे कोषाध्यक्ष गौतम सांगेलकर सोबत आमचे साहित्यिक मित्र बाबू वरक उपस्थित होते. महामानवांचे विचार विद्यार्थ्यांमध्ये पेरून विद्यार्थ्यांनी यशाची उंचच उंच शिखरे गाठावीत. आणि भारताचे, राज्याचे, आपल्या जिल्ह्याचे, गावाचे, आईवडिलांचे नाव रोशन करावे या उद्देशाने ३ आणि ४ जानेवारी ला हस्ताक्षर /निबंध स्पर्धा घेऊन आज निकाल आणि पुस्तक वाटप उपक्रम राबविण्यात आला.

# वडोद बाजार ते जातेगाव रस्ता काम दर्जेदार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार ते जातेगाव रस्त्याचे काम अनेक दिवसापासून रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते अशी या रस्त्याची दुरावस्था झालेली होती त्यामुळे वडोद बाजार ला आठवडी बाजाररसाठी येणाऱ्या नागरिकांना बँक ,पोलीस स्टेशन ,सरकारी दवाखाना , शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना व इत्यादी कामासाठी नागरिकांची फार दुरवस्था होत होती मात्र काही दिवसापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून वडोद बाजार ते जातेगाव रस्त्याचे काम मजबुती करण्याकरिता सुरू झालेले असून त्यास वडोद बाजार ते जातेगाव रस्त्याचे मजबुतीकरण चे काम सार्वजनिक बांधकाम विभागाचे इंजिनिअर साहेबराव जाधव यांच्या उपस्थितीमध्ये चांगल्या पद्धतीने व दर्जेदार कॉलिटीने होत असून त्यांच्या कामाला शेतकऱ्याच्या ग्रामस्थांच्या शुभेच्छा देण्यात येत आहे वडोद बाजार ते जातेगाव, भालगाव, वाघलगाव, भोयेगाव, पिंपळगाव जातेगाव, बाबुळगाव, लोहगड नांद्रा, पाथरी डोंगरगाव या गावाला जाण्यासाठी हा मुख्य मार्ग असल्याने शेतकऱ्याची व नागरिकांची चिंता दूर झाली आहे रस्त्याचे काम चांगल्या दर्जेदार प्रमाणे सुरू असून शेतकऱ्यांमध्ये एक आनंद पाहायला मिळत आहे सार्वजनिक बांधकाम विभागाचे व ठेकेदाराचे अभिनंदन करण्यात येत आहे.



# आमदार फारुख शाह यांच्याहस्ते एमआयएम पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** एमआयएम पक्षाचे अध्यक्ष खासदार ओवेसी यांच्या आदेशाने व महाराष्ट्राचे अध्यक्ष गफ्फार कादरी यांनी आमदार फारुख शाह व जिल्हाध्यक्ष नासीर पठाण यांनी दिलेल्या जिल्हा व शहराच्या कार्यकारणीची घोषणा करण्यात आली असून यात जिल्हा महासचिव पदी आमदार फारुख शाह यांचे स्वीय सहाय्यक एजाज सय्यद यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच जिल्हा उपाध्यक्ष पदी एकबाल शाह व प्यारेलाल पिंजारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. एमआयएम पक्षाचे शहरध्यक्ष मुख्तार बिल्डर यांनी शहर उपाध्यक्ष म्हणून माजिद पठाण व शहर सचिव म्हणून मौलवी शकील व कार्यकारी अध्यक्ष म्हणून कैसर पेंटर यांची नियुक्ती कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात जाहीर केली. या पक्ष प्रवेश व कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात शेकडोच्या संख्येने एकबाल शाह, प्यारेलाल पिंजारी, शकील सउदी यांच्या समवेत कार्यकर्त्यांनी एमआयएम पक्षात



आमदार फारुख शाह यांचे शहरातील विकास कामाने प्रेरित होवून पक्षात प्रवेश केला. या कार्यक्रमाला पक्षाच्या वाढी साठी सर्वांनी मिळून प्रयतन करावे व येणाऱ्या महापालिकेच्या निवडणुकीच्या तयारीला लागावे असे आवाहन आमदार फारूक शाह यांनी केले . या मेळाव्यात नगरसेवक व जिल्हा अध्यक्ष नासीर पठाण, सईद बेग,अमीर पठाण,गनी डॉलर,सलीम शाह,सहेबाझ शाह, महीला जिल्हा अध्यक्ष दीपश्री नाईक,शहर अध्यक्ष फातेमा अन्सारी मिडिया प्रमुख हलीम समसुद्दीन व शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार



सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# वाळू माफियांची पथकास जीवे मारण्याची धमकी

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** येथून जवळच असलेल्या आमखेडा-सोनसवाडी शिवारातील पाझर तलावातील वाळू व ईतर गौण खनिज जेसीबिने उत्खनन करून ट्रॅक्टर द्वारे अवैद्य वाहतूक होत असल्याच्या माहितीवरून सोयगाव तहसील कार्यालयाचे पथक कारवाईसाठी गेले असता वाळू माफियांनी पथकातील तलाठी, कोतवाल व सुरक्षारक्षकास शिवीगाळ व लोटलाट करीत जीवे मारहाणीच्या धमक्या दील्याची घटना रविवारी (दी.२९) सकाळी घडली.

याप्रकरणी रात्री उशिरा तलाठी विष्णु छगन पवार यांच्या तक्रारीवरून तिघा वाळूमाफिया विरुद्ध विविध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.दरम्यान गुन्हे दाखल होताच आरोपी फरारी झाल्याचे समजते.

फिर्यादी तलाठी विष्णु छगन पवार तलाठी सजा सोयगाव तहसील कार्यालय सोयगाव,रा. छत्रपती नगर हर्सूल औरंगाबाद यांनी दिलेल्या तक्रारीत आरोपी हर्षल उर्फ बंटी कैलास काळे राहणार सोयगाव तालुका सोयगाव,सुशील पंढरीनाथ मंडवे राहणार गलवाडा तालुका सोयगाव ट्रॅक्टर चालक नाव गाव माहित नाही यांनी रविवारी (दि.२९) सकाळी १०.२५ वाजता आरोपीतांनी संगणमत करून त्याच्या ताब्यातील स्वराज कंपनीच्या ट्रॅक्टर (विना क्रमांक) मध्ये विनापरवाना बेकायदेशीर रित्या चोरटी वाहतूक करण्याच्या उद्देशाने वाळू भरून यातील फिर्यादी व साक्षीदार यांना पाहून ट्रॅक्टर मधील वाळू जागीच खाली केली. पथकातील शासकीय कर्मचाऱ्यांनी रॉयल्टी बाबत विचारणा केली असता रायल्टी नसल्याचे सांगून ट्रॅक्टर तहसील कार्यालय सोयगाव येथे घेऊन जाण्यास नकार दिला. तसेच हात धरून बाजूला ढकलून लोटलाट करून सरकारी कामात अडथळा निर्माण केला व ट्रॅक्टर कसे नेता पाहतो असे म्हणून जीवे मारहाणीच्या धमक्या दिल्या व ट्रॅक्टर घेऊन पळून गेले असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

त्यावरून सोयगाव पोलीस स्टेशन येथे आरोपी हर्षल उर्फ बंटी कैलास काळे ,सुशील पंढरीनाथ मंडवे व अद्यात ट्रॅक्टर चालक यांच्या विरुद्ध गुरनं २०/२०२२ भा द वि कलम ३५३,३२३,५०४,५०६, ३४ ३७९ ,५११ व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४८(८) व ८ दाखल करण्यात आले आहेत. याप्रकरणी उपविभागीय पोलीस सिल्लोड यांच्या मार्गदर्शनात सपोनि अनमोल केदार एस.एस.सुसर तपास करीत आहेत.

**वाळूमाफियांना राजकीय पाठबळ :** सोयगाव परिसर व तालुक्यात गौण खनिज माफियांकडून सुरू भर दिवसा व सुटीच्या दिवशी दिवस- रात्र करण्यात येणाऱ्या उत्खनन व वाहतुकीस सोयगाव- सिल्लोड विधानसभेचे आमदार तथा राज्यमंत्र्याचे पाठबळ असल्याने शासनाचे महसूल विभाग व पोलीस मोठी कारवाई करण्यास धजावत नसल्याचे विदारक चित्र आहे .यात शासनाचा लाखो रुपयांचा महसूल मात्र सर्रास बुडविला जात आहे .

**गुन्ह्यात एका नगरसेवकाचा समावेश :** शासकीय कारवाई गेलेल्या महसुलाच्या पथकाला शिवीगाळ व जीवे मारहाणीची धमकी देण्यांच्या या प्रकरणात विद्यमान सोयगाव नगर पंचायतीचे नगरसेवक हर्षल (बंटी) काळे यांचा समावेश आहे . ते शहरातील बी बॉईज युवकांचे अध्यक्ष आहेत .

# सावळेद्वार व श्रीक्षेत्र जाळीचा देव यात्रेला शुक्रवारपासून सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील कलियुगातील परब्रम्ह परमेश्वर अवतार भगवान श्री चक्रधर स्वामीचे सावळदबारा येथे चक्रधर स्वामींचे एकवीस दिवस वास्तव होते. याच भगवान श्री चक्रधर स्वामी यांची भव्य अशी मोठी दांडी पौणिमा दिनांक ०३/०२/२०२३ पासून यात्रेस प्रारंभ होईल व रविवार दि. ०५ फेब्रुवारी या दिवशी यात्रा साजरी करण्यात येईल. तीर्थक्षेत्र देव सावळदबारा व (जयदेवाडी) येथे सर्वज्ञ श्री चक्रधर प्रभुंच्या पदस्पर्शाने पुनित पावन झालेले स्थळ आहे. या दिवशी माघ शु. पौ १४ रात्री ९.२९ मि प्रारंभ होत असून दिनांक ५ फेब्रुवारी रात्री ११.५७ मि.पर्यंत आहे. प्रती वर्षाप्रमाणे या वर्षीही तिर्थस्थानास मंगलस्नान घालून कार्यक्रमाची सुरुवात होईल. संपुर्ण भारतातून संत महंत सद्भक्त दर्शन घेण्यासाठी यात्रेच्या निमित्ताने येथे येऊन अन्नदान, द्रव्य, वस्त्रदान करतात. तर कोणी भाविक भक्त ८५० पायऱ्या उतरून सावळेद्वार स्वामींच्या दर्शनासाठी येतात. पायऱ्यावरती पायी चालत असताना भाविक भक्त कापूर, ज्योत व श्रीपळ फोडून आपली मनोकामना पूर्ण करुन घेतात.सायंकाळी प्रभू श्री चक्रधर तथा जाळीचे बाबाचा भव्य रथ मंदिराजवळ ढोल तासाच्या गजरात पुजन करुन ठिक ८.०० वा. भाविक भक्तांच्या उपस्थिती मध्ये मोठ्या आनंदाना थाटा माटात निघेल, रात्री ११.०० वा पुन्हा मंदिराजवळ रथाचे सांगता होऊन आरती होऊन महाप्रसाद देऊन शोभा यात्रेची सांगता करण्यात येईल. संपुर्ण विश्वातील भक्तगणांचे यात्रे निमित्त सहर्ष स्वागत करण्यात येईल. समस्त पुजारी मंडळी व संत महंत ग्रामस्त श्रीक्षेत्र जाळीचा देव. श्री चक्रधरमंदिर संस्थान जाळीचा



देव व सावळदबारा पुजारी मंडळी आपल्या सेवेमध्ये पिढ्यान पिढ्या देवाची पूजा अर्चा करुन आपला उदरनिर्वाह करीत आहे. देवाची आरती, उटी, झाट लोट, दिवाबत्ती इत्यादी नियोजन करुन आपला उदरनिर्वाह करतात.तसेच भाविक भक्तांसाठी जाळीचादेव गिरडाघाट व सावळदबारा रस्ताचे नवीन डांबरीकरण करण्यात आले आहे भाविक भक्तांना आता सावळदबारा ते जाळीचादेव वाहनांसाठी सोयीचे झाले आहे.पाच ते सहा दिवस भगवान श्री चक्रधर स्वामी यांची यात्रा उत्सव चालत असतो अशी माहिती संस्थानचे पुजारी गोपीनाथ पुजारी, मुधकर पुजारी व पुरुषोत्तम पुजारी यांनी आपले ज्ञानपंख वृत्तपत्राचे सोयगांव तालुका प्रतिनिधी गोकुळसिंग राजपूत यांच्याशी बोलताना सांगितले आहे.

# पत्रकारांना अपमानास्पद वागणूक देणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करावी

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** पोलिस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी पत्रकारांना वेळोवेळी अपमानित व अरेरावीची भाषा करतात. यामुळे या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी याबाबत पत्रकारांनी उपविभागीय पोलीस अधिकारी मुकुंद आघाव पिशोर नाका येथील कार्यालयात दिले.

निवेदनात म्हटले आहे की, मागील दोन वर्षापासून पिशोर पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या सर्वच माध्यमांच्या प्रतिनिधी सोबत ठाणे सहायक पोलीस निरीक्षक कोमल शिंदे व सर्व कर्मचारी कोणत्याच घटनेची माहिती देण्यास वारंवार टाळाटाळ करतात, ठाण्यात आल्यानंतर अपमानास्पद वागणूक देतात, मोबाईलवर देखील व्यवस्थीत बोलत नाहीत. स्थानीक व ठाण्या अंतर्गत येणाच्या गावातील प्रतिनिधींना एखादी बातमी छापली तर संबंधीत ठाणे प्रमुख व विट जमादार पो. कर्मचारी अवैध धंदयावाल्या सोबत दम देतात असा त्रास वारंवार होत आहे. यामुळे वर्तमान पत्रात काम करताना मोठ्या अडचणी येत आहेत. या सोबतच ठाण्यात तीन वर्षांपासून जास्त काळ ठाण मांडून बसलेले कर्मचारीच अवैध धंदयावाल्यांना ठाण्यात



घेऊन बसतात. त्यामुळे ठाण्यात येणाऱ्या सर्व सामाण्यांना याचा त्रास होत आहे. मात्र याचे गांभीर्य ठाणे प्रमुखांना नाही, असाच प्रकार दि. २१ जानेवारी रोजी सुरंगमाळा दानपेटी फोडीची घटना घडली संबंधित माहितीसाठी चिंचोली लि. येथील लोकमत प्रतिनिधी प्रकाश देशमुख यांनी करंजखेड बीट जमादार सोपान डकले यांना मोबाईलवर फोन केला असता त्यांनी संबंधित प्रतिनिधीशी एकेरी भाषेत उल्लेख करून माहिती न देताच फोन कट केला. पुन्हा फोन केला असता फोन उचलला नाही. असे प्रकार ठाण्याअंतर्गत असलेल्या सर्व पत्रकारांसोबत वारंवार होत आहेत. यामुळे उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी या सर्व घटनेची गांभीर्याने दखल घेऊन चौकशी करावी व दोषींवर पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत कारवाई करावी नसता तालुक्यातील सर्व पत्रकार दि.०६ फेब्रुवारी रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसणार आहोत, होणाऱ्या परिणामास पोलीस प्रशासन जबाबदार राहील, असाही इशारा पत्रकारांनी दिला आहे .

# महसूलने ओम बन यांना गौरवपत्र देऊन केले सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील अंधानेर येथील ओम सुभाष बन याने 92 किलो वयागटात उत्कृष्ट प्राविण्य मिळवल्या बददल प्रजासत्ताक दिना निमित्त महसुल व इतर विभागाकडून ओमला गौरवपत्र देऊन सन्मानीत केले. यावेळी उपविभागीय अधिकारी जनार्दन विधाते उपविभागीय पोलीस अधिकारी मुकुंद आघाव तहसीलदार संजय वारकड पोलीस निरीक्ष राजीव तळेकर कृषी अधिकारी बाळराजे मुळीक नायब तहसीलदार मोनाली सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती.



# भारतीय घटनेने प्रदान केलेले कर्तव्य पार पाडणे गरजेचे : प्रसिद्ध लेखक शेषराव चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** भारतीय राज्य घटनेतील परिच्छेद ५१(इ) वर प्रभावी अंमल बजावणी व्हावी या साठी निमंत्रितांची एक व्यापक परिचर्चा व बैठक सेंटर टू प्रमोट हार्मोनी अँड ब्रदरहुड चे वतीने महाराष्ट्र गांधी स्मारक निधी समिती औरंगाबाद केंद्राच्या संयुक्त विद्यमाने गांधी भवन समर्थ नगर येथे २९जानेवारी२०२३ रोजी दुपारी प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय लेखक प्रा.डॉ. शेषराव चव्हाण यांचे अध्यक्षते खाली संपन्न झाली त्यावेळेस बोलतांना ते म्हणाले की,भारतीय घटनेने प्रदान केलेले कर्तव्य नागरिकांनी पार पाडणे गरजेचे आहे आणि या साठी सर्वांनाच त्यावर अंमल बजावणी करण्याचे आवाहन त्यांनी केले. परिच्छेद ५१(इ) धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन भारतातील सर्व जनतेमध्ये सामंजस्य व बंधुभाव वाढीला लावणे; या जबाबदारी व कर्तव्यांचे महत्त्व- भाग-मर्यादा कर्तव्ये कलम ५१-अ अंतर्गत प्रत्येक भारतीय नागरिकांनी दिलेल्या ११ संपूर्ण जबाबदारी बाबत पॉवर पॉईंट प्रेझेन्टेशनचे सविस्तर सादरीकरण सेंटर टू प्रमोट हार्मोनी अँड ब्रदरहुडचे महासचिव राजेंद्र दाते पाटील यांनी केले. पुढे विस्ताराने अभ्यासु सादरीकरण करतांना ते म्हणाले की, मूलभूत कर्तव्ये मध्ये भारतीय संविधानाचे पालन करणे आणि त्याचे आदर्श आणि संस्था राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीत आदर करणे, भारताचे सर्वभौमत्व, एकता आणि अखंड टिकवून ठेवणे,देशाचे संरक्षण करणे राष्ट्रसेवा करणे, धार्मिक, भाषिक आणि प्रादेशिक किंवा विभागीय विविधतेच्या पालीकडे भारतातील सर्व लोक सामंजस्य आणि समान बंधुभावाची भावना वाढवणे आणि विशिष्ट प्रतिष्ठेला अपमानास्पद प्रथांचा त्याग करणे, देशाच्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्धी वारशाचे मूल्य आणि जतन करणे, जंगले, तलाव, नद्या आणि वन्यजीव हे नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण आणि नागरिकांबद्दल सहानुभूती नियमन करणे, वैज्ञानिक स्वभाव, मानवतावाद आणि शिक्षण आणि सुधारणेची भावना विकसित करणे, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे, वैयक्तिक आणि सर्वांसाठी सर्वोत्कृष्ट राष्ट्र निर्मितीसाठी प्रयत्न करणे, सहा ते चौदा वर्षे वयोगटातील नागरिकांच्या पाल्याला शिक्षणाची संधी देणे, हे कर्तव्य ८६ व्या घटनादुरुस्ती कायदा, २००२ द्वारे जोडण्यात आले. या बाबतचा कृती कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे. सुत्र संचालन प्रा.डॉ. मच्छिन्द्र गोर्डे यांनी केले तर काव्यात्मक रचना सादर करत महोम्मद आयाजुद्दीन यांनी प्रास्ताविक केले तर उपस्थितांचे आभार सुधीर खैरे यांनी व्यक्त केले. या महत्वपुर्ण परिचर्चेस व बैठकीस आपल्या अनेक सुचना पुढे आल्या असुन त्यात निवृत्त न्यायाधीश डी.आर. शेळके, साथी सुभाष लोमटे, मुकुंद सोनवणे,डॉ.इकबाल मिन्ने, एम एस पठाण, शेख हमीदखान, विखार अहेमद,शेख नविद, सुरेश शिरसीकर, शेख जावेद, शेख बब्बू शफीक,योगेश बहादुरे, शेख महोम्मद माजी सैनिक, इंजि.बाबुराव रणयेवले, प्रशांत साठे,मोहीब खान, प्रा.बाबासाहेब लहाने, शेख फिरोज पठाण, सुभाष शिंदे, जफर कुरेशी, अहमद खान,सय्यद अजीम इस्माईल, प्रदीप नरवडे, इरफान पठाण, सुनील कांबळे, शेख आसिफ, शेख अफजल आदींनी मांडल्या.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.

फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in